# प्रसन्नराघवनाटक

समाकी

ह्या ग्रंथ संस्कृत मूल ग्रंथावरून

मराठी भाषेत

शिवरामशास्त्री पाळंदे

ह्यांनीं केला

तो दक्षिणाप्रैज कमिटीनें पसंत करून

मुंबई येथें

गणपत कृष्णाजी ह्यांच्या छापखान्यांत छापविला.

इसवी सन १८५९

शके १७८१

# प्रस्तावना.

ह्या नाटकाचें नांव प्रसन्नराघव. हें नाटक जयदेव ह्मणून एक पूर्वीं महा कवी होऊन गेला त्यानें केलें आहे. हें फार सुंदर आणि विद्वानांस मान्य असें आहे. ह्या कवीची कविता करण्याची शक्ति आणि वर्णन करण्याची शैली फारच थोड्या कवींला आहे. ज्यांस संस्कृताची माहितगारी कमी त्यांस ह्याची कविता पहिल्यानें कठिण वाटेल; परंतु त्यांनीं ती पुष्कळ वाचली असतां तिची गोडी लागून तिचा रस समजेल. ह्या कवीचे रचनेंत कोमल शब्द फार येतात. ह्या नाटकांत वीर, शृंगार, आणि करुण हे रस फार चांगले साधले आहेत. शब्दालंकार आणि अर्थालंकार ही पुष्कळ ठिकाणीं आहेत, परंतु अर्थालंकारांवर ह्या कवीचें लक्ष्य विशेष दिसतें. ह्या नाटकांत सीतास्वयंवरापासून रावणाचा वध करून रामचंद्र सीतेला घेऊन अयोध्येस परत आले एथपर्यंत रामचरित्र वर्णिलें आहे.

ह्या नाटकाचें हें भाषांतर मुलग्रंथाप्रमाणेंच गद्यपद्यात्मक केलें आहे; परंतु मूलांत जीं श्लोकांचीं वृत्तें आहेत त्याच वृत्तांनीं येथें श्लोक बांधले आहेत असें नाहीं. जेथें जें वृत्त साधलें तेथें तें वृत्त घेतलें आहे. ह्या ग्रंथांत श्लोक व आर्या हीं मात्र पद्यें आहेत. भाषांतर केवळ मूलाप्रमाणेंच आहे असें नाहीं. कोठें मूळचें गाळलें आहे, कोठें फिरवून लिहिलें आहे, आणि कोठें नवेंच करून घातलें आहे. जर संस्कृताप्रमाणेंच भाषांतर केलें असतें तर कित्येक स्थळीं तें मराठी वाचणारांस गोड लागलें नसते, व नीट ही वाटलें नसतें; ह्मणून फेरफार करणें अवश्य वाटून तो केला आहे.

संस्कृत भाषेची शक्ति, प्रौढी व तींतील अलंकार हे माहाराष्ट्र भाषेंत नाहींत, ह्यामुळें संस्कृतांतील रस बरोबर माहाराष्ट्र भाषेंत उतरणें कठिण आहे, तथापि यथामति मला जितका रस साधतां आला तितका साधला आहे. ह्यांत उणें असेल तें पूर्ण करणें विद्वानांकडे आहे.

मूळग्रंथांत सात अंक केले आहेत त्याप्रमाणें भाषांतरांत ही सात अंक केले आहेत.

कवितेंत जे कठिण शब्द आले आहेत, त्यांचा अर्थ खालीं लिहिला आहे. कठिण शब्द दृष्टिचुकून राहिले असतील त्याविषयीं विद्वानांनीं क्षमा करावी.

# प्रसन्नराघवनाटक.

## अंक १.

### मंगलाचरण.

### आर्या.

[१]रक्तांबुज[२]कलिकांतें निजतेजें जिंकिती प्रवालांतें ॥
ज्यांच्या अंगुलि साक्षर करिती जे ब्रह्मदेवभाळांतें॥ १ ॥
लक्ष्मीच्या ऱ्हदयीं जे कुंकुममकरी लिहावया झटती ॥
देओत कर हरीचे सुख ते सकळां दयागुणें नटती ॥२॥

### श्लोक.

जोंपर्यंत असेल चंद्र सविता सौख्यास देओ तुला ॥
तोंपर्यंत मुखानिळेंच हरिनें जो शंख हा फुंकिला ॥
[३]लीलालंघित [४]मेघनादच तसा जो[५]कुंभकर्णीं व्यथा ॥
देई राक्षसहस्तिच्या दशमुखा दिग्मंडळा व्यापिता ॥ ३ ॥
नाभी [६]कंजवरासनीं स्थितविधी चारी मुखांनीं करी ॥
स्तोत्रांतें हरिच्या हरीहि ऱ्हदयीं संतोष तेणें धरीं ॥
क्रोधानें मधुकैटभांस करुणा स्नेहें रमेतें तसा ॥
धैर्यानें विधिला तुह्मां सुख करो जो पाहणाराअसा ॥ ४ ॥

---

१ लाल कमळ. २ कळे. ३ सहज जिंकलेला. ४ मेघांचा शब्द आणि इंद्रजित. ५ रावणाचा बंधु आणि घटासारिखे कर्ण. ६ कमल.

( मंगलाचरणझाल्यानंतर )

सूत्रधार— ( चहूंकडेपाहून आनंदानें ह्मणतो ) वा! ह्या चंद्रचूडेश्वराच्या यात्रेंत सर्व विद्वान् लोक एकेठिकाणीं जमा झाले आहेत, तर आतां ह्यांकडे जाऊन आपलें नाटकचातुर्य पाहाण्याविषयीं विनंती करावी. ( पुन्हा विचार करून शहाण्यांस विनंती करणें नको.

श्लोक

आकारानेंच चतुर जाणती परमानसें ॥
सुगंधानेंच पुष्पांतें केतकीच्या[1] अली जसे ॥ ५ ॥

( पुन्हा पाहून आनंदानें ) ह्या विद्वज्जनांकडून माझा मित्र रंगतरंग नट माझ्याकडे येत आहे. ( इतक्यांत रंगतरंग नट येऊन ह्मणतो. )

नट मित्रा सूत्रधारा, हे विद्वज्जन माझ्या मुखानेंच तुला सांगत आहेत, कीं भरतराजा ( असें अर्धें वाक्य बोलतो आहे, तोंच सूत्रधार आपल्या कानांवर हात ठेवून ह्मणतो. ) शिव २ अरे, हें विपरीत काय बोलतोस! बरें, काय सांगतोस तें सांग.

न०— तूंच अगोदर मला सांग, मी विपरीत काय बोललों तें

सू०— वडील भाऊ असतांना धाकट्या भावाला राजा ह्मणणे हेंच. मी भरत धाकटा भाऊ, आणि माझा वडील भाउ गुणाराम, तेव्हां राजा अशा शब्दाचा अधिकारी तो असून मला राजा असें कसें ह्मणालास?

न०— तुझ्या गुणारामामध्यें गुण काय आहेत?

सू०— अरे, नांवावरूनच गुण समजले नाहींत काय?

---

१ भ्रमर.

न०– ( हंसून ) नांवावरून गुण समजतात काय ?

सू०– ह्यांत काय संशय ?

श्लोक

नांवावरून जाणावे थोरांचे गुण सुंदर॥
जसे सुवर्ण श्रीखंड रत्नाकर सुधाकर ॥ ६ ॥

बरें, सांगतों, ऐक. त्या गुणारामानें, रतिजनकनामक राजाच्या सभेंत हरचापारोपण नांवाचें नाटक दाखवून राजा संतुष्ट केला, मग त्या राजापासून रंगविद्याधरख्यातिरूपस्त्री मिळविली, आणखी गुण काय सांगूं ?

न०– तो तुझा भाऊ आतां कोणत्या देशांत आहे ?

सू०– कोणी एक दक्षिण देशांतला धूर्त बहुरूपी आला, आणि आपलेंच नांव गुणाराम असें सांगून रंगविद्याधरख्यातिचें हरण करून गेला. तें वर्तमान समजल्यावर गुणाराम ती परत आणण्याकरितां त्या दिशेस आतां गेला आहे. असें ऐकिलें, कीं त्यानें सुंकठनामक गायकाबरोबर स्नेह करून दक्षिणेकडील राजांच्या सभेंत नाटकयुद्धाचा उपक्रम केला आहे.

न०– तर हा मोठाच उपक्रम दिसतो.

सू०– हें नीटच आहे पहा!

श्लोक

गातीं जसें कमळदंडभुजा कवींद्र
तेसें जिचें वदनही परिपूर्ण चंद्र ॥
हें चांदिणेंच हंसणें कमळेंच डोळे
कीर्ति प्रिये[१]सम कशी त्वदर्यी न लोळे ॥ ७ ॥

बरें, तूं काय सांगतोस तें सांग ?

---

१ ( प्रिया ) आवडती स्त्री. टीप. प्रथम तीन चरणांतील विशेषणं किर्तीचीं व प्रियेचीं आहेत.

न०— श्लोक

प्रत्येक अंक रससंगत आणि शुद्ध
नव्य[1] प्रफुल्ल सुमराजि[2] समान बंध ॥
घर्मेतरांशु[3] परि वक्र असून कांत
नाट्यप्रबंध अतिमंजुल अर्थ जांत ॥ ८ ॥

सू०— ह्या श्लोकावरून कोणतें नाटक हें कसें समजेल ? (विचार करून हंसून ह्मणतो) अरे, जसें हातांतलें कंकण आरशांत पहावें, तसें मी करीत आहें. हाच श्लोक सात सात अक्षरांचीं एक एक ओळ अशा आठ ओळींत लिहिला असतां जीं ओळींच्या आरंभीं अक्षरें येतात तीं जुळून वाचलीं असतां प्रसन्नराघवनाम नाटक स्पष्ट होतें.

न०— (तोच श्लोक ह्मणून आनंदानें) अहो,

वाणिदेवीचा काय महिमा आहे बघा, कीं जिच्या प्रसादानें अशा तऱ्हेच्या विचित्रविचित्र आणि गोड उक्ती कवींच्या मुखांतून निघतात.

सू०— हेंच खरें. अरे, ह्या कवीनेंच ह्मटलें आहे.

श्लोक.

हे वाणि देवि पदरेणु तुझा उडाला ॥
तो साधुचित्तधरणींत गडोन गेला ॥
त्याचीच वेल कविता फलयुक्त झाली ॥
जेव्हां तुझ्या श्रवणपुष्पपदास[4] आली ॥ ९ ॥

(पुन्हा विचार करून) माझें मन तर कवींमध्यें आद्य

---

१ (नव्य) नुतन. २ (सुमराजि) पुष्पपंक्ति ३ चंद्र. ४ (पद) पदवी.

कवी जो वाल्मिकि ऋशी ह्याकडे ओढ घेतें, कांकीं ज्याची कवीता ब्रह्मदेवही स्वत: गातो.

न०– ब्रह्मदेव काय सर्व त्रैलोक्य गातें असें ह्मटल्यास चिंतानाहीं.

श्लोक.

श्रीरामकीर्तिरमणी रमणीयभावें ॥
हिंडावया त्रिभुवनांत अतांच जावें ॥
हें ती मनांत अणतां मुनिवाल्मिकी हा॥
भेरीसु[1] घोष घडला पहिलाच पाहा ॥ १० ॥
ज्याचा मुखेंदुरस काव्यसमुद्र झाला ॥
हे अल्प थोर कविमेघ पितात त्याला ॥
तेणेंकरून मग ते करतात वृष्टी ॥
ती हीच, जी घडतसे नव[2] काव्य सृष्टी ॥ ११ ॥

माझा चित्तचकोरपक्षी तर रामचंद्राचेच ठिकाणीं फार आनंद पावतो, कांकीं ज्याच्या कीर्तिचंद्रिकेच्या स्पर्शानें वाल्मिकि ऋशीच्या कवितासमुद्राला भर्ती आली.

सू०– असेंच आहे.

श्लोक.

चंद्रीं तसें रामचंद्रीं कांतांच्याहि दगंचलीं ॥
तोषें न मन कोणाचें नीलोत्पलसुन्दरप्रभीं ॥ १२ ॥
टाकून ऊर्ध्व अजलोक[3] निघून आली ॥
ह्या भूतळीं श्रमित फारच देवि झाली ॥
ती राम कीर्ति सुरसांत बुडोन गेली ॥
तेव्हांच दूरगमनश्रममुक्त झाली ॥ १३ ॥

न०– सर्व कवी रामचंद्राचेंच वर्णन कां बरें करतात ?

सू०– हा कवींचा दोष नव्हे.

---

१ नगाऱ्याचा नाद. २ नूतन. ३ ब्रह्मलोक.

### श्लोक

आबालवृद्ध रघुनायककीर्ति गाती ॥
ज्याचे अपार गुण कल्पतरूच होती ॥
त्या वर्णितां किमपि दोष नसे कवींचा ॥
जें चांगलें अनुसरेल तिथेंच वाचा ॥१४॥
ज्याचें बीज अनेकजन्मतप हें प्रज्ञा नवा कोंम हा ॥
दांडा पंडितलोकसंगम तसा काव्यें नवे पल्लव ॥
कीर्ती ही फुलली फुलें बहुतसीं तो हा कवित्व द्रुम ॥
श्रीरामाद्भुतसद्गुणस्तुतिफलावांचून वांझानकीं ॥१५॥

न०— कोणबरें ह्या नाटकाचा कवी ?

सू०— ( प्रीतियुक्तरागानें )

### श्लोक.

अमृताधिक गोड शांत ज्याच्या ॥
वचनांचा रस वा [१]सुलोचनांच्या ॥
अधरा हसतेंच काव्य ज्याचें ॥
जयदेव श्रुतनाम हें जयाचें ॥१६॥

### आर्या.

ज्याची प्रसू[२] सुमित्रा तात महादेव गोत्र कौंडिन्य ॥
भ्रमरापरि मन ज्याचें रामपदाब्जीं[३] च राहतें धन्य ॥ १७ ॥

न०— चंद्र ठाऊकनसणाऱ्या चकोराच्या बालकासारिखीच माझी गत झाली, कांकीं त्या कवीनेंच माझ्या हातांत आपलें नाटक देऊन मला सांगीतलें, कीं ह्याला फार जप, नाहीं तर चोर घेऊन जातील. मग मी हात जोडून असें बोललों, कीं

---

१ स्त्रिया २ माता ३ रामाच्या चरणकमळीं.

श्लोक.

कंठीं शिरीं वा ह्रदयीं [१]उदार ॥ कर्णीं तुझा नाटकरूप हार ॥
घालून मी त्यास जपेन फार ॥ नेतील ते कां मग यास चोर ॥ १८ ॥

सू०– त्या कवीच्या मनांत असली शंका कां आली ?

श्लोक

[२]सुश्लाघ्य[३]वृत्त व जिची रमणीय वाणी ॥
कांता तशीच कविता परकीय कोणी ॥
चोरून चोर जर सागरपार गेला ॥
होईल पात्र मग काय कधीं [४]शुभाला ॥ १९ ॥

न०– हेंच खरें, बरें हा कवी तर्कशास्त्रीही आहे असें ऐकतों, तेव्हां चांदिणें आणि ऊन हीं जशीं एकेठिकाणीं राहावीं तसें झालें आहे, कारण कवित्व आणि तार्किकपणा हीं दोन्हीं त्याकवीमध्यें आहेत.

सू०– ह्यांत आश्चर्य तें काय ?

श्लोक.

ज्यांचे कोमलकाव्यमौक्तिकमणी घाली सदा [५]भारती ॥
त्यांचा तर्क कठोरवक्रवचनीं हानी कशी काय ती ॥
ज्यांणीं स्त्रीकुचमंडलीं सुखभरें आरोपिलें स्वानखां ॥
त्यानीं मारुनयेत [६]मत्तकरिच्या गंडस्थळीं बाणकां ॥ २० ॥

न०– बरें, हे सभासद जातीनेंच कविताकुशल आहेत; तेव्हां ह्या कवीच्या कवितेनें आनंद पावतील काय ?

सू०– होय, अरे ह्या कवीनेंच सांगितलें आहे

---

१ उत्कृष्ट. २ वर्णनीय. ३ वर्तन, छंद. ४ कल्याणाला. ५ वाणी. ६ उन्मत्त हत्तीच्या.

## श्लोक

निज काव्यरसेंच तृप्त होती ॥
पण काव्यें परकीय साधु गाती ॥
निजपुष्परसें अळें बुडालें ॥
पण तो कुंभजळेंच आम्र डोले ॥ २१ ॥

न०— वा! ह्या कवीचें भाषण फारच सरळ आणि कोमळ आहे.

सू०— कोठें कठीणपणा व कोठें वक्रपणाही आहे.

न०— हे गुणही आनंद करणारे आहेत काय!

सू०— होय.

## श्लोक.

जो निंदी नर वक्रउक्ति कविच्या तो मंदबुद्धी खरा ॥
जैसा नीरस निंदितो युवतिच्या वक्रा कटाक्षांकुरा ॥
सारासारविचारयुक्त जन तो वक्रासही आदरी ॥
वक्राही निजमस्तकीं शशिकला गौरीश तो कां धरी ॥२२॥

( आणखीं )

अमृतजलनिधीच्या दिव्य घेऊन नीरा ॥
जलधर जर वर्षे[१]तारकाकारगारा ॥
तर मग उपमेला पात्र होतील चित्तीं ॥
क्षणकठिण कवींच्या गोड ह्या शब्दपंक्ती ॥ २३ ॥

न०— अहो, ह्या कवींच्या मनांत काय विलक्षण आनंद भरला आहे हो! त्यामुळेंच तऱ्हेतऱ्हेचे सरस आणि आनंदकारक सुभाषिताचे प्रकार उत्पन्न होत आहेत.

सू०— हें योग्यच आहे.

---

१ नक्षत्रासारिख्या गारा.

## आर्या.

×चोर कवी वेणी हा ×मयूर कुंडल सुहास्य हा ×भास ॥
कवि जन कुलगुरु, दिसतो जीचा हा +कालिदास सुविलास २४॥
×हर्षच हर्ष असे हा त्दृदयस्थित [१]पंचबाण ×बाणकवी ॥
कविता वनिता वदरे, कोणाच्या मानसीं सुख न पिकवी ॥२५॥

## श्लोक

न ब्रह्मविद्या नच राज्यलक्ष्मी ॥
तशी जशी ही कविता कवींची ॥
सर्वोत्तमीं अर्पण मात्र होतां ॥
चित्तास कन्येसम सौख्य देते ॥ २६

( पडद्यांत ) शाबासरे गायका शाबास.

सू०— हा **याज्ञवल्क्य** ऋषीचा प्रियशिष्य **दाल्भ्यायन** ऋषी इकडेच येत आहे, आणि हा शूद्राकडे पाहात नसतो, तेव्हां त्याच्या नजरेस पडणें हें नीट नव्हे; तर चल दुसरे ठिकाणीं जाऊं. ( असें बोलून नट आणि सूत्रधार निघून गेले )

( नंतर **दाल्भ्यायन** ऋषी पडद्यांतून बाहेर येऊन कांहीं अभिप्रायपूर्वक बोलतो. ) अरे, हा बोलला हें चांगलें बोलला, कांकीं हा **जनकाराजा** सर्व लोकांमध्यें जो शूर आणि सुंदर असेल त्यालाच आपली कन्या देण्यास इच्छितो, आणि ह्या नादामुळें आमच्या गुरूनीं ज्या ब्रह्मविद्येचा उपदेश केला आहे, ती व कुल परंपरेनें मिळाली जी राज्यलक्ष्मी, ह्यांकडे फारसें लक्ष्य देत नाहीं. ( कानोसा घेतल्यासारखें करून ) अरे हा आकाशांत वीणा वाजतो आहे, तेव्हां आमच्या गुरूंच्या दर्शनाला **नारदमुनी** येत आहे असें वाट-

---

१ काम + हें चिन्ह ज्या शब्दांवर आहे तितके शब्द कवींचीं नावें आहेत.

तें. ( पाहून ह्मणतो. ) विंण्याच्या शब्दासारखा शब्द ऐकून मी भ्रांतींत पडलों. अरे, हे दोन भ्रमर गुंजारव करीत आहेत ( कानोसा घेऊन आश्चर्य वाटून ह्मणतो. ) योगीश्वर याज्ञवल्क्यऋषींचें काय सामर्थ्य आहे हो! ज्याच्या कृपेनें पक्ष्यादिकांच्या भाषाही मला समजतात. बरें, हे भ्रमर परस्पर काय बोलतात तें ऐकावें. ( कानोसा घेतल्यासारखें करून ) एक बोलतो, मित्रा कलालापा, कोठून आलास ? दुसरा ह्मणतो, मित्रा मधुप्रिया, शिवाच्या मस्तकावरील गंगेंतलें प्रफुल्लित जें चंद्रविकासी कमळाचें वन तेथून आलों.

दा०– वा! ह्यांचें भाषण किती गोड व नांवेंही काय चमत्कारीक आहेत हो. ( पुन्हा कानोसा घेऊन ) बरें हा मधुप्रिय, कलालापाला काय विचारतो ?

म०– कलालापा, कांहीं नवीन वर्त्तमान आहे काय ?

क०– कांहीं आहे, आतांच बळीचा पुत्र बाणासुर शिवाची पूजा करून हें विचारीत होता.

आर्या

कैलासापेक्षां ही सांगा भूमंडळीं दृढपदार्थ ॥
जेथें दशशत मत्कर कंडूतें शमवितीलच यथार्थ ॥ २७ ॥

नंतर हंसून शिवानें त्याला असें सांगितलें.

आर्या

माझें धनुष्य आहे जनकनृपाच्या घरीं सुरेंद्र[१]नुत ॥
ज्याच्या शराग्निमध्यें पतंग झालीं तिन्ही पुरें त्वरित ॥२८॥

तें ऐकून लागलाच तें धनुष्य पाहाण्यासाठीं तो इकडेच आला. मीही त्याच्या पाठोपाठ आलों. बरें, आतां तूं कोठून आलास; आणि तुझ्या तिकडे काय नवीन वर्त्तमान झालें असेल तें सांग.

---

१ ( नुत ) स्तविलेलें

दा०— ( बरें, आतां मधुप्रिय काय वर्त्तमान सांगतों तें ऐकूं ).

म०— मी इंद्राच्या नंदन वनांतून आलों; नवीन वर्त्तमान ह्मणशील तर तेथें एक रावणाकडील राक्षस किंकाळी फोडून बोलत होता, कीं अरे नंदनवनाचे रखवालदार हो, अद्यापि रावण महाराजानीं चंद्रमौलीची पूजा केली नाहीं, आणि बागेंत तर एकही फूल दिसत नाहीं, तेव्हां फुलें कायरे झालीं ? मग त्या रखवालदारांनीं त्याला असें सांगितलें, कीं आज जनक राजाच्या कन्येचा स्वयंवर होणार आहे, तो पाहाण्याला सर्व देव तयार झाले आहेत, तेव्हां त्यांच्या विमान शोभेकडे फुलें खरचलीं. तें ऐकून हेंच वर्त्तमान रावण महाराजास नजर करावें असें मनांत आणून तो राक्षस तिकडे गेला; आणि मीही चमत्कार पाहाण्यासाठीं इकडे आलों.

दा०— ( खिन्न होऊन ह्मणतो. ) ज्यापक्षीं हें सीतास्वयंवराचें वर्त्तमान रावण आणि बाणासुर ह्यांच्या कानीं पडलें, त्यापक्षीं हें अनर्थाचें बीजच आहे. अथवा भ्रमरांच्या बोलण्याचा खरेपणा काय मानावयाचा आहे. ( विचारकरून ह्मणतो. ) खरेपणा कां नमानावा, पहा.

श्लोक

मकरंदरसासमान येतें ॥
भ्रमरांच्या वदनामधून जें तें ॥
रमणीय असोन तोष देतें ॥
[१]स्तुतिपाठासम भासतें [२]श्रुतीतें ॥ २९ ॥

( पडद्यांत ) ऋषीश्वरा, खरें जाणलेंस आह्मी दोघेही भाटच आहों. येथें स्वयंवरासाठीं देशोदेशींचे राजे मिळाले

१ बंदीजन ( भाट ) २ कानातें

आहेत, त्यांचें वर्णन करण्यासाठीं जनक महाराजानीं आ-ह्मांस आज्ञा केली आहे ( दाल्भ्यायन ह्मणतो. ) वा! भृंगा, लांकुड कोरूं लागला ह्मणजे जशीं कांहीं अक्षरें निघतात तशी ही गोष्ट झाली. भ्रमरांना जें बोललों तें ह्या भाटांना लागू झालें. असो, हा सर्व भ्रमरांच्या भाषणाचा प्रकार याज्ञवल्क्यगुरूजींना निवेदन करावा. (असें बोलून निघून जातो. ) ( नंतर ते दोघे भाट पडद्यांतून बाहेर येतात. त्यांतला एक ह्मणतो. ) मित्रा मंजीरका, अंगाला केंशराची उटी लावून हस्तिदंताच्या मंचकांवर हे राजे किती डौलानें बसले आहेत, पहा.

मं०— गड्या, नूपुरका पहा.

श्लोक

साधून नीट नृप आत्मदिशा सभेंत ॥
सिंहासनावर कसे स्थित शोभतात ॥
सीतास्वयंवरविलोकनकौतुकानें ॥
दाहीहि काय जमल्याच दिशा सुखानें ॥ ३० ॥

श्लोक

शिवधनु उचलाया इच्छिणाऱ्या नृपांची ॥
अतिचपळच वृत्ती नाचते कीं मनाची ॥
स्वकरचलितसूत्रीं नाचवी सूत्रधार ॥
अतिकुशल जशी ती बाहुलीं शीघ्र फार ॥ ३१ ॥

नू०— आपल्या बाहुदंडाकडे पाहात बसला आहे हा कोण ?

मं०— हा मल्लिकापीड नांवाचा राजा ह्याची कीर्ति भागीरथीसारखी निर्मळ आहे.

नू०— सोन्याची कडीं मागें सारून हातांकडे पाहातो हा कोण?

मं०— हा उत्तर दिशेकडला कर्पूरतिलक नांवाचा राजा.

नू०— जडावाचे अलंकार घालून त्यांकडेच पाहातो आहे हा कोण ?

मं०— अरे, हा कांचीनगरांतला वीरमाणिक्य नांवाचा राजा.

नू०— रत्नाचीं कुंडलें ज्याच्या गालांवर हालत आहेत आणि जवळच्या राजाबरोबर गोष्टी सांगत बसला आहे हा कोण ?

मं०— अरे, हा महान योद्धा मत्स्यराज राजा.

नू०— अंगाला चंदनाची उटी लावून शिवधनुष्यावर हात ठेवून बसला आहे हा कोण ?

मं०— हा समुद्रासारखा गंभीर सिंधुराज राजा
नूपुरका आतां हें पुरे, आपण प्रस्तुत कार्याला अनुसरूं. ( भोंवताली फिरून मोठ्यानें गर्जना करून ह्मणतो. ) राजेहो, ऐका,

### श्लोक

आकर्षील नृपाळ शैवधनुच्या दोरीस कर्णांतिकीं ॥
जो त्याला च वरील भूषितकटी ही जानकी सत्य कीं ॥ ३२

( पुन्हा कौतुकानें ह्मणतो. ) मित्रा, हे राजे पहा.

### श्लोक

भूपालहस्त धनुकर्षणकौतुकानें ॥
रोमांचयुक्त बघ दुप्पट आकृतीनें ॥
राजे विशाळ ह्रदयीं दिसतात सारे ॥
सीताकरग्रहणकौतुकयोगपूरें ॥ ३३ ॥

( पुन्हा आनंदानें ह्मणतो. ) हे राजे एकदम कसे उठले, आणि गर्दी झाल्यामुळें चेंगराचेंगरी किती चालली आहे ती पहा.

नू०– खरेंच, जशा अग्नीच्या ठिणग्या उडतात तसे एकमेकां- चीं भूषणें घासून सोन्याचे कण फार उडत आहेत; ते पाहून मला असें वाटतें, कीं ह्या ह्यांच्या प्रतापाग्नीच्या ठिणग्याच काय उडतात.

मं०– हंसून ह्मणतो. ह्या राजांच्या मंडळीची

श्लोक

स्पष्ट फार दिसते मज भक्ती ॥
चापभंग करण्यास न शक्ती ॥
अंजलीस रचते च न मुष्टी ॥
नम्र शीर्ष करि ना धनुयष्टी ॥ ३४ ॥

नू०– हे सगळे आरंभशूरच दिसत आहेत.

मं०– ( खेदानें ह्मणतो. )

श्लोक.

हे द्वीपांतरचे दिसीत अवघे राजे मिळाले गुणी ॥
सोन्याशीं समकांति कोमळ अशी कन्या सुकीर्तीजनीं
हे दोन्ही हि महान लाभ असतां कोणी च झालें कसें॥
चापातें न च हालवी न नमवी निर्वीर भूमी दिसे ॥३ ५॥

( पडद्यांत ) अरे, हा कोण भाटाचा सुडका निर्वीर भूमि असें बोलतो. काय, ती एक धनुष्याची कांबीट उचलायाचीना?

नू०– मित्रा, कर्कश बोलतो हा कोण आहे ?

मं०– माझ्याही परिचयाचा नाहीं; पण कोण आहेस ह्मणून मी त्याला आतां विचारतों. ( भोंवताली फिरून ह्मणतो. ) मी सर्व देश फिरलों आहें, असें असून मला ठाऊक ना- हींस असा तूं कोणरे आहेस. ( नंतर तो पुरुष पडद्याच्या बाहेर येऊन मोठ्या डौलानें इकडे तिकडे फिरून क्रोधानें बोलतो.)अरे नीचा कांहीं गांवढीं गांवें मात्र फिरून कसा मला दश ही( असें अर्धें वाक्य बोलल्यानंतर मनांत ह्मणतो, कसें जें

झांकावयाचें तेंच उघडें करावयाला लागलों. असो, कांहीं-तरी युक्ति करून हें झांकतों. मग उघडपणानें ह्मणतो. ) दश दिशांचे ठायीं ज्याची कीर्ति पसरली आहे, व ज्याचें नांव त्रिभुवनवीर अशा मला ही विहिरींतला बेडूक जसा समुद्र माहीत नाहीं ह्मणतो, त्याप्रमाणें तूं बोलतोस; तर दाखीव आतां तें कांबीट आणि कन्या कोठें आहे ती.

मं०— अगोदर हें धनुष्य पाहा मग कन्यारत्न नजरेस पडेल.

पु०— ( मोठ्या डौलानें ह्मणतो. ) मूर्खा, जोशी राशि नक्षत्रें सांगत असतात तीं तुला ठाऊक नाहींत काय? ते तर पहिल्यानें कन्या, आणि मग धनु असें सांगतात.

मं०— ( आपल्याशीं ह्मणतो. ) अरे, कसा हा बहुभाषपणा दाखवितो. असो, तर त्याच रीतीनें त्याचें निवारण करतों. ( मग उघडपणें म्हणतो. ) अरे, इतक्या शूर मंडळींत तूंच नक्षत्रविद्याकुशल आहेस.

पु०— ( रागानें ह्मणतो. ) अरे, मीच क्षत्रविद्येविषयीं अकुशल आहें काय?

मं०— तर मग कसा धनुष्य उचलल्याशिवाय कन्या पाहण्याची घाई करतोस?

पु०— ( डौलानें इकडे तिकडे फिरून ह्मणतो. ) माझाही धनुष्य उचलण्याविषयीं संशय आहे काय?

मं०— आहेच.

पु०— ( सीतेकडे दृष्टि जाऊन ह्मणतो. ) तर मलाही हा संशय आहे.

## श्लोक

मेघाविना गगनभूषण वीज काय ॥
होते कधीं कनककांतिसमानकाय ॥

गंगेशिवाय गगनीं [1]मकरीभ्रमाचा ॥
वा काय संभव घडेल नवोत्प[2]लांचा ॥ ३६ ॥

( पाहून आश्चर्यानें मनांत ह्मणतो. ) आमच्या प्रतिज्ञाभंगासाठीं ब्रह्मदेवानें विपरीत सृष्टिकौशल्य केलें, हें खचीत. तसेंच दिसतें. ( विचार करून ह्मणतो. ) बरें, ब्रह्मदेव माझा द्वेष कसा करील ?

## श्लोक

जी क्षीरसागररसें परिपुष्ट झाली ॥
ती विष्णुनाभिन[3]लिनी बहु हालवीली ॥
क्रीडासरोवरजलांत अणावयाला ॥
मी इच्छितां च विधि फार मनांत भ्याला ॥ ३७

## आर्या.

निजपदनाश घडेल च यास्तव चतुरा[4]स्य मधुरवचनांनीं ॥
प्रार्थी मला ह्मणे कीं राक्षसराजा करूं नको हानी ॥ ३८ ॥

(पुनः न्याहाळून पाहून ह्मणतो.) वाव्हा ! सारखेपणानें फसलों.

## श्लोक

सोन्याशीं समकांति वीज न अहा रामाच कोणी तरी ॥
सौधाग्रीं बसली तिची च दिसते ही गात्रयष्टी खरी ॥
नीलांभोजसमूह हा न च तसा मीनो[5]द्रमें कांपला ॥
नेत्रालोकन हें तिचें च दिसतें रम्यांगनेचें मला ॥ ३९ ॥

( न्याहाळून पाहून उघड ह्मणतो. ) खचीत सीता नामक कन्यारत्नच हें आहे. (पुनः आनंदानें ह्मणतो.)

---

१ माशाचें फिरणें २ प्रफुल्लितकमलें ३ (नलिनी) कमलिनी ४ ब्रह्मदेव ५ माशाच्याउड्यांनें

श्लोक

[1]राजीव तूं मर [2]सुधाकर तूं नखाच्या
सादृश्यतेस न च पात्र कसा मुखाच्या ॥
डोळ्यांपुढें मृग इच्या टिकणार नाहीं ॥
हे [3]खंजना शरण जा रमणीस पायीं ॥ ४० ॥

(पुन: मोठ्या स्वरेनें ह्मणतो.)

श्लोक

कदली उपमेस पात्र नाहीं ॥
करिशुंडा बघतां उणीच कांहीं ॥
त्रिजगांत उणें च साम्यतेला ॥
मृदु मांड्यांस गमे असें मनाला ॥ ४१॥

मं०— मित्रा नूपुरका, ह्या अंत:पुरांतल्या स्त्रिया कोणी एका स्त्रीच्या हातांतून कांहीं घेऊन आनंदानें पाहात आहेत, तें काय ?

नू०— मला असें वाटतें, कीं गुरुगृहापासून आलेल्या चंद्रिकेनें दिलेला चित्रपट आहे.

मं०— तो तूं चित्रांचा पट पाहिलास ?

नू०— होय.

मं०— तर सांग, त्यामध्यें काय लिहिलें आहे तें.

नू०— एक सीता आणि दुसरा कोणी काळ्या कमळांच्या पुष्पमालेप्रमाणें सुकुमार मदनासारखा सुंदर व कर्णपर्यंत शिव धनुष्य ओढणारा असा राजपुत्र लिहिला आहे.

मं०— अहो, ह्या स्त्रिया किती वेड्या आहेत ! जनकराजानें अति कठिण असा धनुष्याचा पण केला आहे, आणि ह्या तर लहान वयाच्या जांवयाची इच्छा करतात, तर मित्रा तुला ठाऊक आहे काय हें चित्र कोणी लिहिलें तें ?

---

१ कमळ २ चंद्र ३ खंजनपक्ष्या.

नू०– होय, याज्ञवल्क्य ऋषीच्या द्वितीयपत्नीनें.

मं०– ( आनंदानें ह्मणतो. ) आतां माझ्या मनाची खात्री झाली; ती देवी मैत्रेयी योगाभ्यासांत पूर्ण आणि त्रिकालज्ञानी आहे, तेव्हां मिथ्या लिहिणार नाहीं.

नू०– सर्व घडण्यासारखें आहे, परंतु हा थेर्डा पलीकडे सरेल तर.

मं०– अरे पुरुषा, तूं इकडे तिकडे काय पाहातोस? हें शिव धनुष्य आहे तर इकडेसच दृष्टि दे.

पु०– ह्यांत काय बोललास. मुष्टीही तिकडेच देतों. ( इकडे तिकडे फिरून मुगुट पडल्या सारखें दाखवून खेदयुक्त पाहात आहे तों. )

मं०– अरे दशमुख दिशांकडे पाहणें पुरे. मुगुट पडला तर पडूंदे. वेळ चालली, लवकर उचल हें शिवधनुष्य.

पु०– ( मनांत ह्मणतो. ) ह्यानें मला कसें बरें ओळखलें? अथवा भुंगा लांकूड कोरतांना जशीं अक्षरें निघतात त्याप्रमाणें ह्या शब्दाचा सारखेपणा असेल. मोठ्या डौलानें उघड ह्मणतो. )

श्लोक.

सहज च उचलून कांबटीला ॥
अळसत चढवून ही गुणाला ॥
[1]शशिधरधनु कर्षिलें बघा रे ॥
रिपुजनमन ही तसें च सारें ॥ ४२ ॥

( धनुष्याला हात लावून मनांत ह्मणतो. ) अरे, हें हालत देखील नाहीं. ( मोठ्यानें ह्मणतो. )अरे, धनुष्य हें वांकडें, तर वांकडा मार्ग सोडून सरळ जो तरवारीच्या धारेचा मार्ग तेणेंकरूनच सीतेला आणतों.

मं०– कसा रे फार बडबडतोस, पाहात नाहींस काय?

१ ( शशिधर ) शिव

### श्लोक.

अतिकोपरक्तनयनाब्ज असे ॥
भ्रुकुटी [1]कराल चढलीच दिसे ॥
उसपून तीक्ष्ण तरवार करें
बसले च शूर नृप एकसरें ॥४३॥

पु०– (तरवार उचलून चहूंकडे पाहून ह्मणतो.)

फाडून शत्रुगजमस्तक मौक्तिकांनीं.
आकाशकांति करतो [2]उडुयुक्त मानी ॥
जो प्राणघात करणार रणांगणांत ॥
तोखड्ग निर्दय पहा नृपहो सभेंत ॥४४॥

(आकाशाकडे कान देऊन ह्मणतो.) काय बोलतां,

### श्लोक.

मी एकटा च तर युद्ध कसें करावें ॥
सर्वां बरोबर असें न मनीं धरावें ॥
वाटेल जो सुलभ या नृपमंडळांत ॥
त्याच्या समोर चल ये उचलून हात ॥४५॥

अहा, काय दांडगेपणा ह्या मनुष्य किड्यांचा! तर आतां त्यांला आपलें रूप दाखवूनच भय दाखवितों. (असें मनांत बोलून डौलानें निघून जातो.) (पडद्यांतून बोलतो.)

### श्लोक.

गंगाजळीं कनकपद्मबि[3]सांकुरांच्या ॥
तद्वत् दिशागजनवीनर[4]दांकुरांच्या ॥
उन्मूलनें दवडिला शिशुभाव ज्याणीं ॥
ते हे दिसोत अवघ्यांस मदीयपाणी ॥४६॥

(नंतर आपल्या रूपानें रावण पडद्याच्या बाहेर येतो.

---

१ भयंकर २ नक्षत्र युक्त ३ (बिस) देंठ ४ (रद) दांत

नू०— मित्रा मंजीरका, पाहा चमत्कार, कीं एका मनुष्याला दाहा मस्तकें.

मं०— हा मनुष्य नव्हे, तर हा राक्षसराजा रावण आहे.

नू०— तर मित्रा, आतां मला संभाळ; सामान्य राक्षसाच्या ही समोर मनुष्य आला, तर तो त्याला खातो; मग हा तर राक्षसराजाच आहे.

मं०— अरे, भिऊं नको. सर्व वीरमंडळी भाटलोकांचा मान ठेवते; तर त्रैलोक्यांतला अद्वितीयवीर असा हा रावण आह्मांशीं कशी वाईट वर्तणूक करील.

नू०— (आनंदानें ह्मणतो.) जर असें आहे, तर निर्भय होऊन ह्याला कांहीं विचारतों. (असे ह्मणून पुढें सरतो, आणि ह्मणतो.) अरे, तूं कशासाठीं इतकीं मस्तकें बाळगलीं आहेस? ह्यांतून एक ठेवून बाकींचीं कोठें तरीं टाकून देईनास.

रा०— अरे दुष्टा, कसा [१]अप्रसंगीं शिरश्छेदवार्तेनें अशुभ सुचिवतोस? तूं भाट आहेस, ह्मणूनच तुझी उपेक्षा करतों.

मं०— (हंसून ह्मणतो.) बरें तर, प्रसंगीं शिरश्छेद वार्ताही तुला मंगलदायक आहेना?

रा०— ह्यांत काय संशय! अरे, ऐक.

श्लोक

सुरस्त्रिया ज्यावर वर्षतात ॥
कल्पद्रुमांचीं कुसुमें अनंत ॥
अशा शिवाच्या चरणीं रणींवा ॥
हाछिन्न मन्मस्तकपुंज व्हावा ॥४७॥

नू०— जर तूं असा आहेस, तर आपलें स्वरूप झांकून चोरासारखा कां आलास?

---

१ मङ्गल्यप्रसंगीं.

रा०— मूर्खा, तुला धिक्कार असो. ठाऊक नाहीं काय?

श्लोक

उचलिला शिवशैल सुखें जिहीं ॥
प्रबळ मद्भुज युक्त न मी तिहीं ॥
शिवधनुष्य उभें करणें किती ॥
द्विभुज यास्तव दाखिवली स्थिती ॥४८॥

तर सांग कोठें जानकी आहे ती?

मं०— ( खिन्न होऊन आपणाशीं ह्मणतो. )

आर्या.

मुनि याज्ञवल्क्य कुलगुरु जनक पिता भू जिची असे माता॥
ती दुर्दैवें पडते राक्षसहस्तीं अहा कशी सीता ॥४९॥

नू०— ( त्रासून ह्मणतो. ) इतक्या वीरांमध्यें असा कोणी नाहीं, कीं ह्या दांडग्याच्या आंगावर धांवून जाईल.

मं०— रागावलेल्या रावणाच्या समोर सहस्रार्जुनाशिवाय कोण दुसरा राजा जाणार आहे?

नू०— ( आनंदानें ह्मणतो. ) आपण आतां जगलों. पहा, पहा, कृतवीर्याचा पुत्र सहस्रार्जुनच हा आला.

मं०— छे, मूर्खा ! तो सहस्रार्जुन तर परशुरामानें मागेंच मारून टाकला. तो आतां कोठें आहे? तर खचीत बाणासुर असेल. अरे नूपुरका, हा बाणासुर असला तर दुसरा हा अनर्थच प्राप्त झाला. ( पुनः विचार करून ह्मणतो. )

हें झालें हें बरेंच झालें, कां कीं विषाला विषच औषध पाहिजे. ( तदनंतर बाणासुर पडद्याच्या बाहेर येऊन इकडे तिकडे फिरून डौलानें ह्मणतो. )

श्लोक

कैलास दुर्घट मुळीं उचलावयास ॥
त्याहून फार जड शैव धनुष्य यास ॥

पुष्पासमान उचलून करें धरीन ॥
हें बाहुवृंद कृतकृत्य असें करीन ॥५०॥

रा०– ( नपाहिल्यासारखें करून ह्मणतो. ) कां अजून सीता आणीत नाहींत ? (बाणासुर विचार करून मनांत ह्मणतो.) काय एथे रावण ही आला आहे. ( उघड बोलतो. ) एथें इतक्या वीरांतून एकानें ही शिवधनुष्य उचलें नाहीं ?

मं०– उचलण्या सारखेंच नाहीं.

रा०– ( नऐकल्यासारखें करून ह्मणतो. ) कां अद्यापि सीता आणीत नाहींत ? आतां माझी तरवारच तिला जबरदस्ती- नें आणील.

बा०– ( हांसून बोलतो. ) अरे, इतका शूरत्वाचा डौल मिर- वतोस, तर मग कां शिवधनुष्य उचलूनच सीता आणी- नास ?

रा०– अरे, हा कोण मूर्खपंडित आहे रे ?

### श्लोक

अतिजड शिवशैल मद्भुजांनीं ॥
सहजच उचलून लोककानीं ॥
अतिशय भरलीं सुकीर्तिरत्नें ॥
हरधनु उचलूं कशास यत्नें ॥५१॥

बा०– शक्ति नाहीं ह्मणून.

रा०– शक्ति आहे किंवा नाहीं हें दाहामुखेंच सुचिवतात.

बा०– ( हंसून ह्मणतो. ) फारतोंडें फार बोलण्याच्याच उप- योगीं, पराक्रमाला तर फार हातच पाहिजेत.

रा०– अरे, कडब्याच्या तांटासारख्या निर्जीव हजार हातांनीं कसें आपणाला शूर असें मानतोस.

बा०– ( क्रोधानें ह्मणतो. ) अरे, युद्धचातुर्यशुंठा दशकंठा

माझ्या भुजांस निर्बल असें ह्मणतोस. तुला ठाऊक नाहीं काय ?

श्लोक.

रसातळीं पिता बळी तदीय पादवंदना ॥
करावयास मानसीं त्वराच फार वाटली ॥
ह्मणून धावलों सहस्रहस्त[1]मस्तकीं धरा ॥
धरून शेषमस्तकास मोकळीक ही दिली ॥५२॥

रा०— अरे बळीच्या पोरा, रीत सोडलीस. ज्यापेक्षां खरा पराक्रमी जो मी ह्यापुढें आपल्या पराक्रमाचें खोटें वर्णन करतोस.

बा०— तूंच एक खरा पराक्रमी काय ?

रा०— ह्यांत काय संशय.

श्लोक

अत्यंत चंड भुजदंड तुला न काय ॥
कांहींच माहित अरे अगदीं मदीय ॥
वीरेंदि[2]रासदन ज्यांवर शोभतो हा ॥
कैलासशैल कळसासम नीट पाहा ॥५३॥

बा०— व्यर्थ वाक्कलह कशाला पाहिजे, तर आमचा अधिक उणेपणा हें धनुष्यच सांगेल.

मं०— अरे, बाण रावणानों, जो अद्वितीय शूर असेल त्यालाच हें सीतारत्न मिळेल; असें असतां त्याचा मनोरथ धरून तुह्मी आपल्या मनाला व्यर्थ श्रम कां देतां ?

बा०— माझा हेतु ऐक.

श्लोक.

मन शशधरचापारोपणीं सेच्छ नाहीं ॥
अणिक जनककन्या पाणिपद्मग्रहा हीं ॥

---

१ (मस्तक) अग्रभाग २ वीरलक्ष्मीचें घर

तर बहुभुजकंडूशांतता ही करावी॥
सकल नृपसमाजीं कीर्तिकन्या वरावी ॥५४॥

रा०— माझा हेतु ऐक.

श्लोक

कैलासशृंग धरलें उचलून जेव्हां॥
झालें भुजाबलपरीक्षण नीट तेव्हां॥
आतां विदेहतनये सह खेलनाची॥
इच्छा मनीं न हरकार्मुककर्षणाची॥५५॥

( पडद्यांत )

आर्या.

दैत्य निशाचर पन्नग सुर किन्नर चारणादि कोणीही॥
नमवील शिवधनुष्या यांतेच वरील मत्सुता जी ही॥५६॥

श्लोक

रा० रेरे मदीय कर हो शशिचूडचंड॥
कोदंडकर्षणयशेंढवळें करा हें॥
त्रैलोक्य मैथिल[1]सुताकुचचंदनानें॥
लिंपून आत्मतनु शुभ्र गुणास घ्यावें॥५७॥

( धनुष्य पाहून मनांत ह्मणतो. ) अरे, यत्न करूनही हें असाध्य दिसतें, तर आतां ह्याचा नाद सोडावा. ( मग मोठ्यानें ह्मणतो. ) अरे, बाणासुरा, तूंच अगोदर हें धनुष्य उचल, कां कीं तूं आतां नवीन आलास तेव्हां आह्मांला तुझा सत्कार केला पाहिजे.

बा०— तथास्तु, असें ह्मणून हिकडे तिकडे फिरतो.

रा०— ( मनांत ह्मणतो. ) अरे मना, भिऊं नको ज्याविषयीं

---

१ सीता

रावणानें हात टेंकले त्या शिवशरासनाला हा बाणासुर काय उचलणार आहे !

श्लोक.

कोणी हि शैव धनुकर्षणसाधनानें ॥
सीताकरग्रह करील यथाविधानें ॥
नेईन राक्षस पुरीं चरणा नमीन ॥
प्रार्थीन फार च इला वश मी करीन ॥५८॥

मं०— मित्रा, पहा पहा.

श्लोक

हा बाण दैत्य निजबाहुसहस्रवेगें ॥
ओढी परंतु न हले धनु दैवयोगें ॥
कामी [1]सतीमन जसें वळवूं शके ना ॥
केले जरी वचनरूप उपाय नाना ॥५९॥

रा०— ( खिन्नहोऊन मनांत ह्मणतो. ) सीता वश न होण्याचें सूचक हें वचन कानीं पडलें. ( मोठ्यानें बोलतो. ) अरे बाणासुरा, हे तुझे हजार हात कडब्याच्या ताटाप्रमाणें निः-सार आहेत कीं नाहींत ?

बा०— अरे, हें माझें बाहुमंडल पाहून देखील तीक्ष्ण भाषण सोडीत नाहींस.

रा०— तर तूं बाहुमंडलानें माझें काय करशील ?

बा०— जें सहस्रार्जुनानें केलें तेंच.

रा०— मी तुझ्या ह्या भुजवनाला आपल्या प्रतापाग्नीनें जाळून टाकतों.

बा०— मी तुझ्या प्रतापाग्नीला पांचशें धनुष्यें धरणाऱ्या हस्तरूप मेघांनीं सोडलेल्या बाणरूप जलधारांनीं शांत करतों.

१ पतिव्रतास्त्रीचें मन.

श्लोक

रा०— रे बाण पंचशत बाण खुशाल सोड ॥
त्यांची मदीय तरवार करील तोड ॥
रे पंचबाण निजबाण कठोर मार ॥
सीता मलाच वरणार उदार धीर ॥ ६० ॥

नू०— अरे, बाण रावणानों, अतिनिर्लज्जपणानें आपणच आपलें वर्णन करतां हें कायरे?

रा०— हा मूर्खा, हा रावण आपली स्तुति आपणच कां करील?

श्लोक

मंदोदरीकुटिलकोमलकेशबंधीं ॥
[1]मंदारपुष्पमकरंद पिये च छंदीं ॥
वीणासमान मधुर स्वन गानयोगें ॥
मच्छौर्यवर्णन करी भ्र[2]मराालि[3] रागें ॥ ६१ ॥

बा०— अरे, कसा हा कल्पवृक्षाचीं फुलें धारण करणाऱ्या सुंदरीजनाच्या उपभोगाच्या सौख्याचें वर्णन करतो, तर आतांच.

श्लोक

ज्याणीं शंकरशैल [4]सूच्चाशिखरें झोलाविलीं हे असे ॥
मद्बाहू [5]शतमन्युला रणतटीं जिकोत नेमें तसे ॥
माझ्या क्रीडनकाननीं [6]सुरतरुछाया करायास्तव ॥
स्वर्गोद्यान करोत ओस अवघें पाहोत मद्वैभव ॥ ६२ ॥
( असें बोलून बाणासुर निघून जातो. )

रा०— हा गेला तर जाऊंद्या, मी तर जबरदस्तीनें सीता ने-

---

१ ( मंदारपुष्प ) कल्पवृक्षाचीं फुलें. २ भ्रमरांचीपंक्ति. ३ प्रीतीनें. ४ ( सूच्च ) अत्यंत उंच ५ इंद्राला. ६ कल्पवृक्ष

त्याशिवाय दुसरीकडे जाणार नाहीं; परंतु माझ्या सेवकाचा दुःखयुक्त शब्द कानीं न पडेल तर.

मं०— मुली जानकी, आतां तुला दैव काय राखील तें खरें.

रा०— ( इतक्यांत कानोसा घेऊन ह्मणतो. ) अरे, हा कोणाचा आक्रोश कानीं पडतो. ( नीट विचार करून ह्मणतो. ) कोणाचा तरी बाण लागून मारीच राक्षस ओरडतो असें वाटतें, तर आतां अगोदर त्याला धीर दिला पाहिजे. ( असें बोलून रावणही निघून जातो. )

नू०— ( आनंदानें ह्मणतो. ) मित्रा, चांगलें झालें. व्याघ्राच्या तोंडांतून जशी हरणी सुटावी तशी ह्याच्या हातांतून जानकी सुटली.

मं०— खरें बोललास, तर चल, हा वृत्तांत जनक महाराजांस सांगूं. मग ते निघून जातात.

प्रथमांक समाप्त

# अंक २

( तदनंतर पडद्याच्याबाहेर एक तपस्वी येऊन चहूंकडे पाहून ह्मणतो. ) वा! ही बाग किती सुंदर दिसते. एथें वेलांवर हजारों पोपटांचीं पिलें बसून किलकिल करिताहेत. ( पडद्याकडे पाहून ह्मणतो. ) हा कोणी संन्यासी इकडे येत आहे; स्वामी, इकडे या, इकडे या. ( तो संन्यासी पडद्याच्याबाहेर येऊन ह्मणतो. ) कुशल आहेना ?

त०— होय; आपलेंही कुशल आहेना ?

सं०— आतां तुमच्या दर्शनानें तर अधिकच आहे.

त०— ( प्रीतीनें बोलतो. ) स्वामी, ह्या कीटकयुक्तभूमीवर जपून फिरण्यानें आपणाला श्रम झाले आहेत; तर आतां ह्या मिथिलानगरींत पांच दिवस राहून विश्रांती करावी. प्रसंगेंकरून जनकराजाचेंही दर्शन घ्यावें.

सं०— आह्मी निरिच्छ आहों, आह्माला राजदर्शनाचें प्रयोजन काय?

त०— हा सीरध्वजराजा ब्रह्मविद्येंत निष्णात आहे, त्यापक्षीं आपणासारख्यांस दर्शन घेण्यास योग्यच आहे.

सं०— अहो, राजा असून ब्रह्मवेत्ता हें खरें काय ?

त०— स्वामी, हें खरेंच आहे. देव दशकंठा ( असें अर्धें बोलल्यानंतर ) देव[1]शितिकंठाची आज्ञा ?

सं०— ( हंसून ह्मणतो. ) आतां बोलणें फिरवून रूप झांकणें पुरे. मला समजलें, तूं खचीत राक्षस आहेस.

त०— तर तूं कोण आहेस ? सांगबरें.

सं०— मी कोणी तुझ्या सारखाच आहें.

त०— तर मग ऐक, सर्व प्रधानमंडळींत श्रेष्ठ जो माल्यवान

---

१ शिव

त्यानें मला ताटकेच्या वनांत पाठविलें. त्याचे ऐकण्यांत असें आलें, कीं विश्वामित्र ऋषीनें अयोध्येचा राजा **दशरथ** ह्याकडे जाऊन **राम** आणि **लक्ष्मण** हे त्याचे दोन पुत्र आपल्या यज्ञरक्षणासाठीं मागीतले; व ऋषीची इच्छा अवश्य पूर्ण केली पाहिजे, ह्यास्तव राजानें आपले पुत्र त्याच्या हवाली केले.

सं०— मग काय झालें ?

त०— नंतर ऋषीनें त्या राजाला रत्नखचित दोन तानवडें दिलीं, आणि सांगितलें, कीं राजा, हीं तानवडें देवलोकचीं आहेत; हीं दोन्ही [1]वीरसूच्या कानीं योग्य, तेव्हां हीं **कौसल्येच्या** कानांत घालावीं. **दशरथ** राजानें ही गोष्ट मान्य केली. नंतर **रामलक्ष्मण** ह्यांस बरोबर घेऊन तो ऋषी आपल्या आश्रमास निघून गेला.

सं०— पुढें काय झालें ?

त०— तदनंतर हें वर्त्तमान **माल्यवानानें** ऐकून तीं तानवडें **रावणाची** माता जी **निकषा** तिच्याच कानांत असावीं; असा विचार करून त्यांचें हरण करण्याविषयीं **ताटकेला** सुचवावें, ह्मणून पूर्वींच एक राक्षस तिजकडे पाठविला होता. आतां **ताटकेनें** तीं तानवडें संपादिलीं असतील, असा विचार करून तीं आणण्यासाठीं मला पाठविलें आहे.

सं०— त्या **माल्यवानाला** हें सर्व वर्त्तमान कसें समजलें ?

श्लोक

वार्ता अद्भुत गंधयुक्त हि तशी उत्कृष्ट कस्तूरिका ॥
विद्या दोषविहीन हें त्रय कधीं झांकून राहील का ॥
तेलाचा पडताक्षणीं पसरतो पाण्यांत बिंदू जसा ॥
तद्वत् हें त्रयही जगीं पसरतें सिद्धांत याचा असा ॥ १ ॥

---

१ वीरमाता

त्यांतून विशेषेंकरून ह्या माल्यवानाच्या पदरीं बातमीदार लोक फार आहेत.

सं०— तर, तूं मिथिलेच्या उपवनांत कां आलास ?

त०— मी असें ऐकलें, कीं रावण मिथिलेमध्यें आला आहे, त्याचें दर्शन घेण्यासाठीं पहिल्यानें एथें आलों. आतां ताटकेच्या वनांत जाणार आहें; परंतु तूं कोण आहेस तें सांग?

सं०— जो पहिल्यानें ताटकेकडे पाठविला होता तोच मी, मिथिलेच्या उपवनांत येण्याचें कारण तुझें आणि माझें एकच आहे.

त०— तर आतां तानवडांनीं युक्त ताटकावन आहेना ?

सं०— अरे वन ताटका युक्त आहे कीं नाहीं ह्याचाच अगोदर विचार.

त०— तर मग ताटका कोठें गेली आहे ?

सं०— नगरांत.

त०— काय दशरथाच्या.

सं०— छेछे, यमाच्या.

त०— हिला यमाच्या पुरींत कोणी पोंचविलें.

सं०— रामबाणानेंच.

त०— हा राम कोण ! ( विचार करून ह्मणतो. ) दशरथाच्या दोन पुत्रांपैकीं जो वडील तो. तर आतां ते ताटकेचे पुत्र कोठें आहेत तें सांग ?

सं०— एक सुबाहू तर ताटकेलाच भेटायाला गेला. दुसरा मारीच, तोही रामबाणानें व्याकुळ होऊन जिवंत असून मेल्यासारखाच दूर जाऊन पडला आहे.

त०— हें वर्तमान रावणाला कोणीच कसें कळविलें नाहीं ?

सं०— मारीचानें आक्रोश केला तेव्हांच तें रावणाला कळलें.

त०— तर रावणाला कसा बरें राग आला नाहीं ?

सं०— सीतेच्या अभिलाषामुळें त्याला दुसरें कांहींच सुचत नाहीं.

त०— बरें, आतां रामलक्ष्मण कोठें आहेत?

सं०— विश्वामित्र त्यांस घेऊन आपल्या आश्रमापासून निघून मिथिलेची वाट चालत आहे असें ऐकतों. ( इकडे तिकडे पाहून त्रासानें ह्मणतो. ) अरे, ते रामलक्ष्मण आतां इकडेच येत आहेत, तर आतां राक्षसांचा वैरी जो राम त्याच्या पुढें राहणें उभयतांसही योग्य नव्हे. ( मग ते दोघेही निघून गेले. तदनंतर रामलक्ष्मण पडद्यांतून बाहेर येतात. )

रा०— वत्सा, लक्ष्मणा, पाहापाहा! ही बाग किती रमणीय आहे.

ल०— मुळचीच ही बाग सुंदर, तशांत आतां तर वसंतऋतु आला आहे. त्यामुळें फारच रमणीय दिसते.

रा०— ( आनंदानें ह्मणतो. ) वा! वसंतऋतूची शोभा आली का! ( विचार करून ह्मणतो. ) होय आली.

श्लोक

हे मोगरे चहुंकडे फुलले नवीन
प्राशून तन्मधु [1]अली करतात गान ॥
ही पूर्ण शिष्य मृदु दक्षिणमारुताची
कीं नाचते चपल मंजरि [2]वंजुलाची ॥ २ ॥

स्था. १८३८

श्लोक

हें रम्य फार मलयाचलशृंग याच्या
पासून पर्वतसुता[3]पतिपर्वताच्या ॥
पर्यंत भूवलय वश्य करावयाला
आज्ञा दिली स्मरनृपें मधुमारुताला ॥ ३ ॥

---

१ भ्रमर. २ बकुळीची. ३ कैलास

वसंतवायू मग तो निघाला
कीं शंकरा सर्पधरास भ्याला ॥
हळूहळू यास्तव काय येतो
माझ्या मनीं हाच विचार होतो ॥ ४ ॥

ल०– रामा, माझा तर असा तर्क चालतो, कीं.

श्लोक

फुलांच्या वर्षावें निजवनतटीं पूजित असा
लतास्त्रीनीं केला नगररमणीनीं नृपजसा ॥
बसे हा [1]सारंगीं भ्रमरवनितागानरसिकीं
वसंताचा वायू शिथिलगति अत्यंत चनकीं ॥५॥

रा०– वत्सा, आतां हें वर्णन पुरे. भगवान् विश्वामित्र ऋषी याज्ञवल्क्य ऋषीस भेटावयास गेले आहेत, तों त्यांच्या सायंकाळच्या देवपूजेला चांगलीं फुलें तोड. लक्ष्मण बरें ह्मणून फुलें तोडावयास गेला. ( राम पाहून ह्मणतो. ) वा ! एथें देवीचें देऊळही आहे. ( हात जोडून. )

आर्या

माते दयानदी तूं नयनसुधालहरिबिंदुवृष्टि कर ॥
शशिधर हररमणि तुला दोन्ही जोडून वंदितों स्वकर ॥६॥

( पुन्हा दुसरेकडे पाहून ) अरे, पाहा हें सरोवर ह्यांत कमळांवर राजहंस बसले आहेत, त्यामुळें हें किती रमणीय दिसतें; आणि हें पाहून माझे मनास किती आनंद होतो. ( पुन्हा कौतुकानें ) वा! कमलवल्लीवनांत आपली स्त्री क्रीडा करीत असतां तिला टाकून हा कलहंसचालक आम्रवृक्षाच्या खांदीवर बसला आहे! ( कानोसा घेऊन ) अरे, काय विलक्षण मनोहर शब्द आहे! ( विचार करून )

---

1 हरिणावर

खचित राजहंसाचे शब्दासारिखा मधुर हा [1]मंजीर भूषणाचा शब्द आहे. तर कोणी तरी नगरची स्त्री ह्या देवालयास येत आहे, तर आपण इकडे पाहूनये. परस्त्रीकडे पाहणें आमच्या कुळास योग्य नाहीं. ( पडद्यांत ) राजकन्ये, इकडे इकडे.

रा०— ( काय ही राजकन्या आहे? ) तर मग तिकडे पाहाण्याला चिंता नाहीं. ( पाहून आनंदकौतुकयुक्त )

आर्या

शाळिग्रामशिळेवर रेषा दिसते जशी सुवर्णाची ।।
वृक्षछायेमध्यें [2]गोरी रमणी तशीच कोणाची ।। ७ ।।

( तदनंतर, सीता आणि तिचीसखी पडद्याच्या बाहेर येतात.)सखे, पाहा पाहा, आज हें उद्यान वसंतमित्र जो मदन त्यानेंच स्वतः भूषित केलें काय ? फारच रमणीय दिसतें.

स०— सुंदरी, असेंच आहे.

रा०— अगे, सर्वांगसुंदरी असें ह्मण. खचीत हिचा,

श्लोक

बंधूकपुष्पसम हा अधरोष्ठ आहे ।।
चक्षू तसें धवलकेतककाय वा हें ।।
डाळिंबबीजसमकांति हि दंतपंक्ति
[3]आस्यापुढें [4]विकच पंकज हीनशक्ती ।।८।।
अहो काय हिचे अवयव सुंदर हे ?

श्लोक

पदांनीं उत्फुल्लारुणकमल कांतीस हरते
करांनीं लालीला नवकिसलयांच्याच धरते ।।
प्रवाळाची कांती अधररुचिनें तुच्छ करते ।।
शशीच्या कांतीतें निज हसितपूरें च हंसते ।।९।।

---

१ मासोळ्या. २ गौर, पीतवर्ण. ३ मुख. ४ विकसित

स०— राजकन्ये, हें तें चंडिकेचें देऊळ.

सी०— ( हात जोडून ) हे देवि शिवपत्नि तुला नमस्कार असो.

स०— ( हंसून ह्मणते. ) ही नमस्काराची चाल बरीच आहे.

सी०— ( प्रीतियुक्त क्रोधानें ह्मणते. ) पुरे असलें भाषण.

स०— ( हात जोडून ).

श्लोक

अत्यंतकोमलशरीर शिवांकसेवी
आशा मदीय परिपूर्ण करोच देवी ॥
माझ्या सखीस पति सुंदर तो मिळावा
ज्याचें स्वरूप बघतां [१]स्मरही पळावा ॥ १० ॥

रा०— अरे, कसा हा सखीजन हिच्या विवाहाविषयीं उत्कंठित आहे, ( विचार करून ) ही वयांतच आली आहे पहा.

श्लोक

गेला बाळपणा परंतु न कसें तारुण्य अंगी पहा ॥
गेला मूढपणा अजून न कसा चातुर्यसंचार हा ॥
स्पर्शेना वय कोणचें चहि कसें ती सुंदरीची पहा ॥
देते सौख्य तनू सुमर्म च असे हें मन्मथाचें अहा ॥ ११ ॥

स०— हे देवि, जोंपर्यंत माझी सखी खिन्न झाली नाहीं, तोंपर्यंत माझा मनोरथ पूर्ण कर.

सी०— (प्रीतियुक्त क्रोधानें ह्मणते.) कशासाठीं मी खिन्न होईन ?

स०—अगे, राजहंसकन्ये, कां खिन्न होतेस, हा तुझा कांत आंब्याच्या झाडावर दिसेनासा बसला आहे.

सी०— सखे, हत्तींच्या छाव्याच्या कंठशब्दासारखा गोड हा कोणाचा कंठशब्द ऐकावयाला येत आहे बरें ? तर तो आ-

---

१ मदन.

पण पाहूं. ( मग दोघीही इकडे तिकडे फिरतात. )

रा०— ( खिन्न होऊन ह्मणतो. ) कशी हिला वेलांनीं झांकून टाकली ? ( लतेला ह्मणतो. )

आर्या

स्तवकें स्तबक फुलांचे अधरें जिंकी नव प्रवाल अशी ॥
लतिके चपलदशीला लपवित असतां तुला न लाज कशी ॥ १२ ॥

( पुन्हा आनंदानें )

श्लोक

हिंडून ही या कदलीवनांत
संतोष देते मजला मनांत ॥
देते चकोरास अपार तृप्ती
मेघांतली चंद्रकळा जशी ती ॥ १३ ॥

( पुन्हा कदलीलाच ह्मणतो. )

आर्या

हे [1]कांचनकदलि इच्या [2]अंकाची कांति पाहिजे तुजला ॥
जर तर उपाय हा कर क्षण भर धर आडवून तूं इजला ॥ १४ ॥

सी०— सखे, सुवर्णासारखी ज्याची शरीरकांति, काकपक्षांनीं सुशोभित ज्याचे कर्ण, व विशाळ ज्याचे नेत्र. असा हा कोण आहे ? ह्याला पाहून माझ्या मनांत पुत्राप्रमाणें वात्सल्य उत्पन्न होतें.

ल०— माझ्या मनाची वृत्ति तर सुमित्रा मातेप्रमाणें हीविषयीं पवित्र आहे अशी ही कोण आहे ?

सी०— ह्या कुमाराकडे पाहातांक्षणीं ऊर्मिला मनांत येते.

स०— ( हंसून ह्मणते ) खचीत, वत्सा, मुला, अशा शब्दांने ह्याचे लाड करणारा कोणी तरी असेल, त्याला लक्षून

१ ( कांचन ) सोनें २ शरीर

माझ्या मनांत तूंही येतेस. सर्व झाला पुसतें. ( असें ह्मणून भोंवताली फिरून ) अरे राजपुत्रा, तूं एकटाच गैरमाहितीच्या बागेंतल्या जाग्यांत खेळतोस ?

ल०— छे मूढे, माझा वडील बंधु राम जवळ असतांना एकटाच असें मला ह्मणतेस ?

स०— ( संतोषानें ह्मणते. ) माझा मनोरथ पूर्ण झाला.

सी०— सखे, आपणाला एथें काय कर्तव्य आहे, तर चला आपल्या घरींच जाऊं. ( दोन पावलें चालून पुन्हा मागें फिरून ह्मणते. ) सखे, एक विसरलें, तो आम्रवृक्ष पाहावयाचा राहिला. त्यावर नेवाळीचा वेल चढावा अशी माझ्या मातेची इच्छा आहे. ( दोघी इकडे तिकडे फिरतात. )

राम०— ( आनंदानें ह्मणतो. )

## आर्या

मच्चित्तकैरवातें सुखवाया शारदी [१]पुनवराती
येते पाहा पुनरपी इकडेस चि सांवरून पदरा ती ॥१५॥

( पुन्हा न्याहाळून पाहून ह्मणतो. )

## श्लोक

धरोत तुलना इचे नयन उत्पलांची तसें
धरो न सकलेंदुच्या वदन कांतिला तें कसें ॥
पयोधर धरोत हे कमलकोरकांची तुला
तसे कुरळ केश हें तमच वाटतें कीं मला॥१६॥

स०— हा तो आम्रवृक्ष ( मग दोघीही त्याजवळ जातात )

रा०— अरे, ह्या दोघीही माझ्याजवळ येत आहेत, तर मी थोडा पाठीमागें सरतों.

---

१ पौर्णिमा

सी०– (आम्रवृक्षाची खांदी हातांत धरून कौतुकानें ह्मणते.) सखे, पाहा पाहा. हीं कोवळीं पानें नखाग्रांनीं टोंचलेलीं दिसतात; त्यापक्षीं खचीत हीं कोणी चतुरानें आपल्या हातानें सत्कारयुक्त केलीं असें वाटतें; किंवा आपल्या धनुष्यवल्लीच्या शंकेनें स्वतां मदनानेंच हातांत धरलीं असें वाटतें.

रा०– तुजविषयीं माझा तर्क तर असा चालतो.

### श्लोक

माझेंच हें धनु ह्मणूनच मन्मथानें
मध्यें तुझी तनुलता धरली करानें ॥
त्रैलोक्यवश्यकर तीन करांगुलींच्या
रेषा मिषें उमटल्या च वलित्रयीच्या ॥ १७ ॥

स०– राजकन्ये, ही नेवाळीची वेल; आणखी हें पाहा.

### आर्या

नेवाळीपुष्पाच्या मकरंदातें पितात हे भ्रमर ॥
चिरकाल वास ज्यावर तेंही त्यजितात कमलरूपघर ॥१८॥

सी०– तीच आर्या ह्मणते.

रा०– वा ! दुसऱ्यालतेचें वर्णन कशाला पाहिजे. खचीत तूंच लता आहेस.

### श्लोक

पुर्वी ऋतू शिशिर बाल्यमिषें च गेला
मागून यौवनमिषेंच वसंत आला॥
ही सुंदरस्तनमय[१]स्तबकांस ल्याली
तेणें तुझी तनुलता सुखदाच झाली ॥ १९ ॥

---

१ ( स्तबक.) गेंद

स०– राजकन्ये, ही नेवाळीची वेल स्वतां आम्रवृक्षाचें आलिंगन करण्यासाठीं पुढें सरते आहे.

सी०– ( प्रेमयुक्तक्रोधानें ह्मणते. ) अगे, तूं असें कुचकें भाषण बोलतेस, त्यापक्षीं तुझा सहवास सोडून मी दुसरेकडे जातें.

रा० आर्या

कमळाच्या नाळापरि गोरे रमणीय गाल दिसतात ॥
विकसित काळ्या कमळा डोळे पाहून काय हंसतात॥२०॥
पुष्पित अशोकपुष्पापरि लाल सुरेख हस्तकांति पहा ॥
सुतनूचीं मदललितें हसितें चित्तास मोहितात अहा ॥ २१॥

सी०– ( पाहून कौतुकानें ह्मणते. ) अगे,

श्लोक

सरोवरस्थनीलकांति[1]कंजमाळसांवळा.
महेशमस्तकीं सतेज बालचंद्र कोंवळा ॥
सुरेख आणि मन्मथास जिंकणार कोण हा
लतागृहांत [2]काकपक्षभूषित[3]श्रुती पहा ॥ २२ ॥

स०– राजकन्ये, लता पाहण्याचें कौतुक सरलें काय ?

सी०– ( न ऐकिल्यासारखें करून तोच श्लोक पंचम स्वरांत ह्मणते. )

स०– ( जवळ येऊन ह्मणते. ) हिचें लक्ष दुसरेकडे आहे असें वाटतें. बरें, कोठें इचें मन लुब्ध झालें असेल ? ( रामाकडे पाहून ह्मणते. ) हिचें चित्त ह्याकडे गुंतलें आहेसें दिसतें. ( पुन्हा सीतेला हातांत धरून ह्मणते. ) प्रीति करणाऱ्या सखी जनाचा तिरस्कार कां करतेस ? अथवा कर-

---

१ ( कंज ) कमळ २ (काकपक्ष) झुलपें ३ कान

तेस हें ही योग्यच आहे, कांकीं सांप्रतकाळीं हा तुझ्या मनांत शिरला आहे.

सी०— ( मनांत ह्मणते. ) हें हिनें कसें जाणलें. ( असें ह्मणून लाजते. )

स०— ( मनांत ह्मणते. ) ही लाजते त्यापक्षीं हिला दुसरेकडे घेऊन जावें. ( उघड ह्मणते. ) कां, अजून ही प्रीतीचा क्रोध तुझ्या मनांतून गेला नाहीं.

सी०— ( मनांत ह्मणते. ) ही क्रोधाच्या उद्देशानें बोलली, कां, हीं ह्याच्या उद्देशानें बोलली नाहीं. ( उघड बोलते. ) सखे तुझ्यावर कशी रागावेन ? माझें मन दुसरीकडे होतें, ह्मणून तुझा सत्कार घडला नाहीं.

स०— राजकन्ये, तुझें चित्त कोणीकडे बरें होतें ?

सी०— ह्या आरामाकडे.

स०— (हंसून ह्मणते. ) वा ! काय तुझें चातुर्य आहे. [1]आराम सांगून राम झांकलास.

सी०— ( लज्जायुक्त होऊन अधोमुख उभी राहते. )

रा० आर्या

वर कर कुरंगनयने नयन तुझे हरिणगर्व हरणारे ॥
होवो नभ यमुनेच्या [2]कल्लोलानींच आज भरणारें॥२३॥

स०— ( हंसून प्रेमानें ह्मणते. ) राजकन्ये, सखीजनाशीं देखील मन चोरणें पुरे, कांकीं खचीत मला समजलें ऐक.

श्लोक

जोकाकपक्षधर पद्मविशालनेत्र ॥
नीलांबुजापरि तसा सुकुमारगात्र ॥

---

१ बाग २ लाटांनीं

त्या रामनामक[1]मनोभवदिव्यदेहीं
अत्यंत लंपट तुझें मन काय नाहीं ॥२४॥

सी०— सखे, पाहा पाहा.

आर्या

रतिचरण[2]नूपुरांच्या शब्दापरि मंजुल स्वरें गातो ॥
अंब्याच्या मुकुलरसें मधुरमुख भ्रमर मत्तसा फिरतो॥२५॥

( मनांत ह्मणते. )

आर्या

प्रियमुखकमलरसातें प्या आतां नयनहो तुह्मी फार ॥
चपळपणा सोडा हा गेला प्रिय मग पुन्हा न दिसणार॥२६॥

( असें ह्मणून रामाकडे कटाक्षानें आनंदयुक्त पाहाते. )

रा०— ( न्याहाळून पाहून ह्मणतो. )

आर्या

सर्वस्व यौवनाचें भोगाचें भवन भाग्य नयनाचें ॥
सौभाग्य विलासाचें सार जगाचेंच सुफल जननाचें॥२७॥

सी०— ( मनांत पुन्हा तीच आर्या ह्मणते. )

स०— सखे राजकुमारी, पहापहा.

आर्या

विकसित निर्मल कोमल कमलदलाच्या च संशयें फसतो ॥
डोळ्यांच्या भोंतालीं भ्रमराचा कुमर हा तुझ्या फिरतो॥२८॥

सी०— ( आनंदानें मनांत ह्मणते. ) अरे नेत्रांनो, बांधल्या सारखे ह्याठिकाणीं सुखरूप राहा. ( असें ह्मणून पुन्हा रामाकडेंच पाहाते. )

रा०— ( आशायुक्त ह्मणतो. )

---

१ (मनोभव) मदन २(नूपर) तोरड्या

### श्लोक

सुधादुग्धाब्धीच्या चपल लहरी तुल्य च अशा ॥
कटाक्षांनीं आतां सुतनु मजला स्नात करते ॥
टिकेल प्रीतीचा वर समय तो हा सुखदकीं ॥

( विचार करून खेदानें ह्मणतो. )

विधात्याची सृष्टी असुखसुखसंयुक्त दिसते ॥२९॥

( इतक्यांत पडद्याच्या बाहेर एक सखी प्रवेश करून ह्मणते. ) राजकन्ये, राजपत्नींनीं मला आज्ञा केली आहे; ती अशी कीं, जानकीला लवकर घरीं आणून चमत्कारिक अलंकारांनीं तिला भूषित कर.

सी०— सखे, स्नेहानें माझ्या माता कशा वेड्या झाल्या आहेत.

स०— राजकन्ये, स्नेहेंकरून वेड्यापेक्षां वेड्या तुझ्या माता झाल्या आहेत.

सी०— कशाबरें माझ्या माता वेड्या, तें सांग ?

स०— अगे तूं मुळचीच सुंदर आहेस, आणि तुला अलंकारशोभेनें शोभा आणण्यास इच्छितात, तेंव्हां वेड्या नव्हेत काय ?

### श्लोक

चंद्रमित्र हें मुख तुझें असे दंतकांति ही चंद्रिका दिसे॥
नीलपंकजीं दूधधारशी वाटते मला दृष्टिही तशी ॥३०॥

तर चल आतां, आपल्या वाड्यांतच जाऊं. (मग त्या निघून गेल्या.)

रा०— ( खेदानें ह्मणतो. ) कशी प्रिया दूर जाऊन मला दिसेनाशी झाली ? ( पुन्हा आशायुक्त ह्मणतो. )

## आर्या

गेली परंतु पुनरपि माझ्या निववील काय नयनांस॥
नसतां दिवसास जसी रात्रीं ही चंद्रिका चकोरास ॥३१॥

ल०— हे आर्य, ही आली.

रा०— (आनंदानें ह्मणतो.) कशी प्रिया पुन्हा आली ? (पाहून ह्मणतो.) खचीत दुसरें कांहीं मनांत आणून लक्ष्मण बोलला आहे. (मोठ्यानें ह्मणतो.) वत्सा, ही आली असें बोललास ती कोण ?

ल०— श्लोक

पाहून गोधूल मुहूर्त्त चित्तीं
घेऊन तारामय हार हस्तीं ॥
स्वतां शशीतें वरण्यास आली
संध्यावधू ही[1] अतिरक्त झाली ॥ ३२ ॥

रा०— होय, खरें आहे. वत्सा ऐक.

श्लोक

हें लोकत्रयकमल प्रफुल्ल केलें
सिंधूच्या मग ऊदरांत बिंब गेलें ॥
भानूचें मुररिपुनाभिपंकजातें
बोधायास्तव च असें मनांत येतें ॥३३॥

ल०— हे आर्य, हा आकाशाचा प्रदेश किंचित् आरक्त झाला आहे.

रा०— हे वत्सा, हें असेंच आहे. आतां तर.

श्लोक

पूर्वेकडे आश्रित अंधकार ॥
जो जारिणीचा प्रिय मित्र फार ॥

---

१ लाल, प्रीतियुक्त

जी स्वैरिणींना रिपुतुल्य झाली
ती पश्चिमेला शशिकांति आली ॥३४॥

आर्या

गंगायमुनासंगमपूराचा मित्र गगनमध्यच हा ॥
तेव्हां अर्धश्यामश्वेतार्धोपलसमानकाय पहा ॥ ३५॥
( पुन्हा आनंदानें अंगुलीनें दाखवून ह्मणतो. )

आर्या

जें चक्रवाककांताचित्तीं खरशरसमान होणारें ॥
आणि चकोरवधूंच्या चंचूकपाटांस ही उघडणारें ॥३६॥
दग्ध स्मरवृक्षाच्या [1]नूत्नांकुरसदृश आणि अंकुशसें ॥
रुष्टवधूचित्तगजातें चंद्राचें सुरेख बिंब दिसे ॥ ३७ ॥

ल०— श्लोक

आकाशपंकजलतादलनीरबिंदू
किंवा पयोनिधिसुबंधुसमान इंदू ॥
जोविश्वमंडन सुखी करतो जगातें
तत्खंड सौख्ययुत कां न करील मातें ॥ ३८॥

आर्या

शिवमस्तकगंगेच्या कमळाचें नाळ विमळ हें साच ॥
कर्पूरबंधु किंवा मदनवधूपानपात्रनलिका च ॥ ३९॥

रा०— वत्सा, हें वर्णन पुरे. विश्वामित्र ऋषींच्या पूजेची वेळ झाली, ह्यास्तव चल आपण आतां फुलें घेऊन त्यांकडे जाऊं. ( मग ते निघून जातात. )

---

१ (नूत्न) नवीन.

दुसरा अंक समाप्त.

# अंक ३.

नंतर एक खुजा पडद्याच्या बाहेर येतो, आणि आपल्या शरीराकडे पाहून आश्चर्यानें ह्मणतो, वा ! मी किती तरी उंच आहें बरें ! असाच जर मी आंत गेलों, तर ह्या दरवाज्याची वरची बाजू मोडून तर पडणार नाहींना ? त्यासाठीं लऊन चालावें हें बरें. ( असें बोलून लवतो. ) इतक्यांत पडद्याच्या बाहेर एक कुब्डा येऊन ह्मणतो. मित्रा खुजा, आतां तर तूं सर्वगुणसंपन्न झालास.

खु०— कसा बरें.

कु०— तूं पहिलाच खुजा आहेस, आणि त्यांत कुब्डा ही झालास.

खु०—( क्रोधानें ह्मणतो. ) मूर्खा, अरे कसारे तूं आपल्या कुब्डेपणाचा दुसऱ्यावर आरोप करतोस, खरें ह्मणशील तर तूंच मुळचा कुब्डा आहेस; आणि मी तर आतां ह्या दरवाज्याचें शिखर मोडेल ह्मणून बळेंच कुब्डा झालों आहें.

कु०— ( हंसून ह्मणतो. ) अरे, तुझें आंग तर वीतभर उंच आहे, आणि दरवाज्याचें शिखर मोडेल ह्मणतोस हें कसें ? ( पुन्हा क्रोधानें ह्मणतो. ) अरे लबाडा, मी कुब्डा ह्मणून तुला कोणींरे सांगितलें ?

खु०— दुसरें कोण सांगणार ? पोळाच्या कोळ्यासारखा तुझ्या पाठीवर जो हा मांसाचा गोळा दिसतो त्यानेंच सांगितलें.

कु०— ( हंसून ह्मणतो. ) अरे मूर्खा, असा मांसाचा गोळा को-

र्हे असतो ? अरे, हा सौभाग्यलक्ष्मीचा खेळण्याचा चेंडू आहे.

खु०– ( शंकित होऊन ह्मणतो. ) अरे, हाळू बोल; नाहीं तर आपल्यासारखे अंत:पुरांत फिरणारे जे आहेत त्यांचा सुंदरपणा राजाचे कानीं गेला तर तो रागावेल.

कु०– अरे, भ्यावयाला नको, ह्यावेळेस राजा बागेंतल्या बंगल्यांत आहे.

खु०– छे छे! आज कोणीएक मोठा ऋषी पाहुणा येणार आहे, त्याची वाट पाहात तो बाहेरच्या मंडपांत बसला आहे.

कु०– तर आपला घात झाला.

खु०– कोणतारे ?

कु०– अरे, पूर्वीं एक याज्ञवल्क्य ह्मणून मोठा ऋषी आला होता. त्यानें उपदेश केल्यापासून राजा डोळेमिटून रात्र घालवितो. आतां पुन: ह्या दुसऱ्या ऋषीनें उपदेश केला, ह्मणजे तो अंत:पुरांत येणेंच सोडील. मग आमची गरज अर्थांतच त्याला राहाणार नाहीं.

खु०– तूं बोलतोस हें खरें; परंतु मला वाटतें, कीं हा महर्षि आमच्या राजाला उपदेश करण्यासाठीं आला नाहीं, शिवधनुष्य पाहाण्यासाठीं आला आहे.

कु०– अरे, होम करकरून त्याचे डोळे धुरकट झाले असतील; त्याला शिवधनुष्य पाहाण्याची गरज काय ? तस्मात् मला असें वाटतें, कीं हा कोणी क्षत्रिय ब्राह्मण असेल.

खु०– (हंसून ह्मणतो.) अरे कुबड्या, तुझी बुद्धि फारच सूक्ष्म आहे. कारण तूं ह्मणतोस त्याप्रमाणेंच हा खरोखरी क्षत्रिय ब्राह्मणच आहे.

कु०– तर कांहीं तरी अनर्थ होईल असें वाटतें, कारण हा

तपश्चर्या करणारा असून एथें आला आहे; आणि आपला राजा तर आळशी आहे, तेव्हां त्याचें राज्य घ्यावें ह्मणून आला आहे असें वाटतें.

खु०— अरे, असें बोलूं नको, ह्यानें तर चिरकाल तपश्चर्या करून ब्रह्मदेव संतुष्ट केला. मग ब्रह्मदेवानें आपल्या मुखें तूं क्षत्रिय नाहींस, तर ब्राह्मण आहेस, असें त्याला ह्मटलें.

कु०— अरे, तूं बुद्धिमान् असून लोकांचें जें मिथ्या भाषण त्याला खरें कसें मानतोस? जर ब्राह्मण ह्मटल्यानें क्षत्रियाचा ब्राह्मण होतो, तर मी ही तुला ब्राह्मण असें ह्मणतों ह्मणजे तूं ही ब्राह्मण होशील.

खु०— अरे, मूर्खा, तूं बैलतोंड्या आणि तो भगवान् चतुर्मुख ब्रह्मदेव हे दोघे सारखेच कायरे?

कु०— जर हा ब्राह्मण आहे तर ह्याला हरधनुष्याची चिंता कशाला पाहिजे?

खु०— त्याचें कारण सांगतों, तें ऐक. त्यापाशीं धनुर्विद्या शिकलेले त्याजवळ दोघे राजपुत्र आहेत. त्यांला तो हें धनुष्य दाखविणार असेल.

कु०— तर मग त्याचे मनांत कांहीं कपट दिसत नाहीं.

खु०— ह्यांत काय संशय?

कु०— परंतु विचारतों तें सांग, ह्या ऋषीवर मी व्यर्थ दोषाचा आरोप केला, तेणेंकरून मला पाप लागलें कीं काय?

खु०— अरे, नुसतें पाप असें कां ह्मणतोस, तुला महापाप लागलें.

कु०— मूर्खा, तुला धर्मशास्त्र माहीत नाहीं. आपल्या संबंधीजनांची थट्टा केली असतां पाप लागत नाहीं.

खु०— बरें, हा तुझा संबंधी कसा?

कु०— अरे, तुला माहित नाहीं काय? संबंध सांगतो तो ऐ·

क. ह्याचे हे दोन मुलगे आहेत, आणि आपल्या ही दोन मुली आहेत, तेव्हां ह्यावरून ह्मणतों, कीं कदाचित् हा आपला संबंधी होईल.

खु०– ( श्वास टाकून ह्मणतो. ) आमचें असें प्रारब्ध कोठून असणार.

( इतक्यांत पडद्यांत शब्द होतो. )

श्लोक

जो पद्मसुंदरविलोचन आणि रानीं
जो ताटकेस [1]असुहीन करी शरांनीं ॥
तो राम [2]सानुज बरोबर ज्या मुनीच्या
आलाच तो [3]कुशिकपुत्र निधी तपाचा ॥ १ ॥

खु०– ( आश्चर्ययुक्त आनंदानें ह्मणतो. ) अरे, जी सर्व लोकांला भय देणारी ताटका नांवाची राक्षसी ऐकत होतों, ती जर ह्यानें खरोखरी मारली असेल, तर हा हरचाप उचलील, असें दिसतें; तर चल ही आनंदाची गोष्ट राजस्त्रियांला आपण जाऊन सांगूं. ( मग ते निघून गेले. ही पुढील गोष्टीची सुचना झाली. तदनंतर रामलक्ष्मण बरोबर घेऊन विश्वामित्र ऋषी पडद्याच्या बाहेर येतो, आणि सूर्याकडे बोट दाखवून ह्मणतो. ) वत्सा रामा, पाहा.

श्लोक

हा चक्रवाकमन तुष्ट करावयास ॥
तारागणासहित तमाच गिळावयास
ही पंकजें विकसितद्युति व्हावयास
त्या वैरिकैरवबनास छळावयास ॥२॥
दि[4]क्कामिनीह्रदयकुंकुमलेपनास
निस्तेज त्या शशितनूस हंसावयास

---

१ प्राणरहित. २ धाकट्याभावासुद्धां. ३ विश्वामित्र. ४ दिशारूप स्त्रिया.

तूं जाण सर्व भुवनत्रय रक्षणास
जो पावतो उदय सूर्य खरप्रकाश ॥३ ॥

रा०— ( हात जोडून ह्मणतो. )

## आर्या

विकसी कमळवनांते शुभ्र करी निजकरीं त्रिलोकातें॥
पाळी कोककुळातें नमितों त्या मीं दिनेश देवातें ॥ ४॥

वि०—(मनांत ह्मणतो.) बरें, मी वत्सा रामाला एथें आणलें आहे; आतां हा जनक राजा आपली कन्या लवकरच ह्या रामाला देईल काय ? ( इतक्यांत लक्ष्मण बोलतो. )

ल०— हे आर्य, हें पाहा.

## श्लोक

काढून सागरांतून रविमाणिक्य नूतन॥
प्रभातसावकारानें नभो[1]हट्टांत मांडलें ॥ ५ ॥

## आर्या

जों तों [2]तन्मूल्य च कीं [3]निजलक्ष्मी त्या पुढें तडाग करी
[4]फुल्लांबुजरूपकरें अर्पी ह्या रविवरास कीं नवरी॥ ६ ॥

वि०— ( हर्षयुक्त मनांत ह्मणतो. ) अरे, ह्या वत्सा लक्ष्मणानेंच उत्तर दिलें; मुलांचीं भाषणें खरी होत असतात.

रा०— ( विश्वामित्र ऋषीला ह्मणतो. )हे भगवन्, ही राजधानी हत्ती घोड्यांनीं भरलेली असून तपोवन भूमिप्रमाणें शांत आणि पवित्र अशी कशी दिसते?

वि०— वत्सा हें आश्चर्य मानूं नको; कांकीं ज्याचा गुरु भगवान् याज्ञवल्क्य ऋषी तो जनक राजा ह्या राजधानींत राहतो.

---

१ (हट्ट) बाजार. २त्याचीकिंमत ३ आपलीशोभा ४ प्रफुल्लितकमळहस्तें

रा०— जो योगीश्वर ह्या नामानें प्रख्यात आहे तोच ऋषि काहा?
वि०— वत्सा तोच हा.

श्लोक.

दिवाकराच्या चरणप्रसादें जो बोध पावून खुशाल नांदे ॥
योगीश्वरख्यातिप[1]तिवरेला लक्ष्मीस पद्मापरि सद्म झाला॥७॥

तर चल आपण आतां राजवाड्यांत जाऊं. ( मग तिघेही जाऊं लागतात तों पडद्यांतून कोणी एक पुरुष पौरस्त्रियांना आज्ञा करतो. ) अहो पौरस्त्रियांनो,

श्लोक

टाका सडे चंदन कुंकुमाचे
मांडाच मुक्ताफळयुक्त माचे ॥
सुगंधपुष्पें उडवा अपार
करा अशी हीं नगरी तयार ॥ ८ ॥

वि०— आमच्या आगमनानें आनंद पाऊन जनकाचा उपाध्याय शतानंद हें बोलतो आहे.

( इतक्यांत शतानंद पडद्याच्या बाहेर येऊन ह्मणतो. )
हे भगवन्, ऋषीश्वरा, मी वंदन करतों.

वि०— हे वत्सा, शतानंदा, तुझ्या आयुष्याची वृद्धि असो.
श०— हे भगवन्, जनक राजा आपली वाट पाहात बसला आहे.
वि०— ( विचार करून ह्मणतो. ) काय जनकराजाची योग्यता आहे!

---

१ कुलस्त्री

### श्लोक

[1]सांग जेथें राहतात निःसपत्न तिघी जणी ॥
[2]त्रयी तशी राज्यलक्ष्मी योगविद्या असा गुणी ॥९॥

( तदनंतर जनक राजा येऊन हात जोडून पाहून ह्मणतो. ) अरे,

### आर्या.

हेमापरि निजदेहा तपोमयाग्नींत टाकिता झाला ॥
तेणे [3]वर्णोत्कर्षाप्रति पावे तो मुनीश हा आला॥ १० ॥

( जनकराजा पुढें सरून ह्मणतो. ) हे भगवन् मी आपणास प्रणाम करतों.

वि०– हे राजर्षे, हे वसुधेंद्रा सीरध्वज राजा, तुझा मनोरथ परिपूर्ण होवो. ( असा विश्वामित्रानें आशीर्वाद दिल्यानंतर ते सर्व ही यथायोग्य स्थानीं बसतात. )

ज०– हे भगवन्. ऋषीश्वरा, आतां मला इंद्र ह्मणणें हें माझ्या हलकेपणाचेंच कारण आहे.

वि०– कसें बरें ?

ज०– सांप्रत काळीं इंद्रापेक्षांही मी अधिक आहें.

### आर्या.

हे गाधितनय कल्पद्रुम ही न तसा सुरेश सुखदाता ॥
भवदीयपादवंदनविधि झाला हा जसा सुखद आतां ॥११॥

वि०– वा! काय तुझा थोरपणा वर्णावा ! तूं सहजानंदरूप जो अमृतसमुद्र त्यांत बुडालेला असून आमच्या समागमापासून उत्पन्न झाले जे सुखाचे बिंदु त्यांनाच अधिक मानतोस.

ज०– हे भगवन् राज्यकारभारामध्यें मग्न जो मी त्याला सहजानंद कोठून प्राप्त होणार ?

---

१ अव्यंग २ वेदत्रयी ३ कांतीचाउत्कर्ष, दुसराअर्थ जातीचाउत्कर्ष.

वि०— हे जनका, असें कां ह्मणतोस ?

श्लोक अर्धा

गुणगण तुमचे जे वर्णितां अंत नाहीं ॥
श्रवण कर नरेंद्रा सांगतों तेंच कांहीं ॥

अर्या

आघात [1]कार्मुकाच्या दोरीचा करतलीं जसा तीक्ष्ण ॥
कंठीं ओंकाराचा नाद तसा शोभतो, अति [2]श्लक्ष्ण ॥१२॥

आर्या.

तेज प्रतापनामक भूमीवर शोभतें अनंत जसें ॥
आत्मीयज्योति सदां व्हदयाच्या आंत शोभतें च तसें॥१३॥

आर्या

ही सिंहासनशोभा राज्यातें सांगते च कीं भव्य ॥
ज्यांच्या परमशमातें पद्मासनकांति ही तसी दिव्य ॥ १४ ॥

श्लोक अर्धा

सकल नरपतींतें हे तुह्मी मान्य जे ते
निमिकुलकुमुदांतें चंद्रसे सौख्य दाते ॥ १५ ॥

शता०— हे विश्वामित्र ऋषे, जें आपण बोललां हेंच खरें, कां-
कीं ह्या निमिकुळांतले सर्व राजे असेच आहेत.

श्लोक

वारांगनाविधृतच्यामरछत्र ज्यांत
पद्में अशाच निजराज्यसरोवरांत ॥
हे खेळतात नृपहंस यथेच्छ शांत
योगींद्र मार्गगगनांत हि हिंडतात ॥ १६ ॥

---

१ धनुष्य, २ मृदु.

[stamp]

ल०— ( शंकित होऊन ह्मणतो. ) हे ज्येष्ठबंधो, हे राजे असून ही ब्रह्मविद्येंत निष्णात आहेत, ह्यासाठीं माझें मनाला आश्चर्य वाटतें.

रा०— वत्सा, ह्यांत काय आश्चर्य आहे ?

### श्लोक

छत्रछाया क्षणसमय ही ज्यास झांकूं शकेना
तो चौऱ्यांचा जलपवनही शांत ज्यातें करीना ॥
[1]मत्तेभांचा मदमय तसा पंक जातें शिवेना
त्याज्योतीचें दृढतर असे सख्य ह्या भूभुजांना ॥ १७ ॥

वि०— हे शतानंदा, तूं ह्या राजांना राजहंस असें जें बोललास तें योग्यच बोललास; कांकीं हे सकल [2]कुवलयो[3]त्तंस आहेत, तेव्हां हे राजहंसच खरे.

ज०— हें भाषण आमचे जे पूर्वज त्यांनाच योग्य, कांकीं ते सार्वभौम होते, आणि मीतर कांहीं खेड्यांचा राजा आहें, तेव्हां मला हें कसें शोभेल ?

वि०— हे राजर्षे, असें कां बोलतोस ?

### श्लोक

समस्त नृपसंघ हा अवनिरक्षणार्ते करो
परंतु अवनीप तूं यश असें तुला बाठरो ॥
सुवर्णरुचिकन्यका निपजली जिच्या अंतरीं
जगांत पृथिवी तुला जनक त्या तिचा ही करी ॥ १८ ॥

ज०— हे भगवन्, अनेक भुवन निर्माण करण्याविषयीं निपुण असे जे आपण त्या तुमच्या चमत्कारिक भाषणाचें वर्णन काय करावें.

---

१ मत्त हत्ती. २ ( कुवलय ) भूमंडल; कमळ, ३ ( उत्तंस ) श्रेष्ठ

आर्या

विषमक्रोधें अरुणित निजदृष्टीची करून जो काडी॥
[1]तारापथभित्तीवर सुरचित्रांते अनुक्रमे काढी ॥ १९ ॥
त्यांत प्रथम रवीचें इंदूचें दोनहीं अशीं चित्रें ॥
[2]लाक्षा[3]सुधारसाने परिपूरित दोन शोभलीं पात्रें ॥२०॥

श०— हे राजर्षे, जनका, सत्य बोललास, कांकीं ह्या विश्वामित्र ऋषीचें चरित्र विचित्र आहे.

श्लोक.

त्रिशंकूस ह्या भूतळीं टाकण्यास
सुराधीशकोपें उगारी पदास ॥
तदीयक्षणीं रुष्ट झाला मुनींद्र
ह्मणे अन्य निर्मीन मी स्वर्ग इंद्र ॥२१॥

आर्या

मग इतर सुरपुराच्या निर्माणाचा प्रयत्न चालविला ॥
जों तों सुर शरणागत झाले यास्तव तसाच आटपिला॥२२॥

ल०— हे रामचंद्रा, त्रैलोक्याला संतप्त करणारें तपोनामक तेज केवढें बरें आहे ?

रा०— अरे लक्ष्मणा, तुला माहीत नाहीं काय ?

श्लोक

रोषें त्रिशंकुनृपतीस पदाभिघातें
जों लोटिला धनमदें च जयंततातें ॥
तों रक्तवर्ण मुनिदृष्टि बघून थोडी
संध्येसमान सुरसंघ करांस जोडी ॥ २३ ॥

वि०— हे जनक राजा, अनेक रत्नें जिच्या पोटांत भरलीं

---

१ तारापथ, आकाश २ लाख ३ चुना; अमृत

आहेत अशा पृथ्वीच्या गर्भापासून निघालें जें कन्यारत्न तें तुला शोभा देतेंना ?

ज०— तें कन्यारत्न तर शोभा देतेंच आहे; परंतु हे विश्वामित्रा, आपल्या प्रसादानें जामातृरत्न देखील मला शोभवील! ( इतक्यांत रामचंद्राकडे अवलोकन करून कौतुकानें ह्मणतो. ) हे ऋषीश्वरा,

### श्लोक.

हा कोण सर्वजनलोचन [1]मोददाता
जो बाळ फार दिसतो मृदुकांति आतां॥
[2]वैडूर्यरत्नकिरणापरि शोभमान
जो [3]कल्पपादप[4]नवांकुर तत्समान ॥ २४ ॥

श०— हे विश्वामित्रा, हा दुसरा कोण ?

### श्लोक

[5]गांगेयपंकजसमप्रभ तत्समीप
हा कोण बाळ दिसतो अति दिव्य रूप ॥
आसन्ननीलरुचिपंकज[6]कोरकाच्या
गुच्छा समान दिसतो नव चंपकाच्या ॥२५॥

वि०— ह्या उभयतांचीं नावें राम आणि लक्ष्मण अशीं आहेत.

ज०— वा ! हीं नावें तर कानाला अमृताप्रमाणें गोड लागलीं.

श०— ( राम लक्ष्मणांस न्याहाळून पाहून विश्वामित्रास ह्मणतो. ) हे ऋषीश्वरा,

### श्लोक.

हे सुंदराकृति कुमार असून यांचें
सत्प्रेम फार दिसतेंच परस्परांचें ॥

---

१ ( मोद ) आनंद. २ ( वैडूर्यरत्न )पाचूचाखडा ३ ( कल्पपादप ) कल्पवृक्ष. ४ ( नवांकुर ) नवाकोंम ५ ( गांगेय ) सुवर्ण ६ ( कोरक ) कमळाचाकळा

[1]नातें परस्पर असेलच तेंच ह्यांचें
जें कौस्तुभाख्य मणि आणि [2]मृगांक यांचें॥२६॥

ज०— **श्लोक.**

हे रम्यरूप इतरेतरसौन्दर्याचा
हा साहजीक दिसतो गुण शुद्ध यांचा ॥
जीवेश्वरांतरगसन्निधिसा मुलांच्या
मध्यें मुनीश दिसतो गुणसा फुलांच्या ॥२७॥

वि०— हे योगीश्वरशिष्या, जनक राजा, अशा खोल गोष्टींचा विचार तुलाच माहीत, आह्मांला तर ह्यांचें नातें मात्र ठाऊक आहे.

ज०— हे उभयतां बंधू आहेत काय ?

वि०— होय.

ज०— ( आनंदानें न्याहाळून पाहून ह्मणतो. )

**आर्या**

तनुकांतिजितें[3]दीवर, चंपक[4]कनकोत्पल[5]द्रु मृदुलांग ॥
हे बंधु रामलक्ष्मण नेत्रोत्सवकर अ[6]नंग कीं सांग ॥ २८ ॥

( पुन्हा रामचंद्राकडे अवलोकन करून मोठ्या कौतुकानें ह्मणतो. ) हे भगवन् विश्वामित्रा,

**श्लोक**

जें सच्चित्सुख जगदीशरूप तेथें
माझें हें स्थिर मन पूर्ण सौख्य घेतें ॥
तद्वत् हें त्द्दय मदीय तुष्ट रामीं
नीलाब्जापरि अमलप्रभाभिरामीं ॥२९॥

---

१ भाउपणाचे नातें २ चंद्र ३ इंदीवर काळेंकमळ. ४ कनकोत्पल सुवर्णकमळ. ५ द्रु वृक्ष. ६ अनंग मदन.

असें होतें हें काय बरें ?

वि०— ( मनांत ह्मणतो. ) सकल लोकांच्या लोचनांला आनंद देणारा जो आकाशस्थ चंद्र तो आणि शंकरशिरस्थ जो चंद्र ह्यांत भेद नाहीं, दोन्ही एकच आहेत. ( मग उघड बोलतो. ) हे राजर्षे जनक राजा, हा अतिशय सौंदर्याचा महिमा आहे.

ज०— बरें विश्वामित्रा, ह्याच्या ताताचे पदवीला कोण भाग्यवान् प्राप्त झाला आहे ?

वि०— राजा जनका, तो ह्यांचा पिता.

## श्लोक

हे चंद्राचे किरण अथवा [१]वीची गंगाजलांच्या
[२]चंद्राश्म्यांचा गिरिच अथवा ढीग हा केतकांचा ॥
ह्या भ्रांतीनें[३] सुरजनवधू ज्यांकडे पाहतात
त्या [४]यत्कीर्ति [५]प्रतिदिश अशीं नाटकें खेळतात ॥३०॥

रा०— ( लक्ष्मणाला ह्मणतो. ) हे वत्सा, सर्व निर्मळ गुण ज्यामध्यें भरले आहेत अशा आपल्या पित्याची स्तुति हा मुनि करीत आहे.

ल०— हे ज्येष्ठ बांधवा, आणखीही हा ऋषी आपल्या ताताची स्तुति करील.

वि०— हे राजा जनका, आणखीही श्रवण कर.

## आर्या

[६]ज्याच्या [७]कोदंडानें दैत्यस्त्रीभ्रूविलास संपविले ॥
मग [८]भुजबंधन इंद्रा इंद्राणीनें हंसून दृढ च दिलें ॥३१॥

---

१ लाटा. २ चंद्रकांत पाषाणांचा. ३ देवांच्यास्त्रिया. ४ ज्याचीकीर्ती. ५ सर्वदिशांचेठायीं. ६ दशरथाच्या. ७ धनुष्यानें. ८ आलिंगन.

### आर्या

जो सूर्यवंशभूषण राजा दशरथ तदीय हे बाळ ।।
मदनापरि सुंदर पण काळाचेही पराक्रमें काळ ।।३२।।

ज०— ( आनंदानें ह्मणतो. )

### श्लोक

ज्याचे हस्त समस्तशत्रुवनितानेत्रस्थ जीं काजळें
तीं त्याले च धनुर्गुणाहतिबळें घट्टे न ते सावळे ।।
ज्याच्या तीव्र कठोर [1]चापनिनदा शत्रुस्त्रिया ऐकतां
चित्रांच्या परि निश्चलस्थिति अशा झाल्या भयानें स्वतां।।३३।।

### आर्या

इंद्रादिजयश्रीसह आकर्षी [2]ज्यालतेस जो नीट ।।
बाहुयुगें [3]भूवलया सह चापवलयही धरी धीट ।।३४।।
रविवंशरत्न दशरथ राजाचे कुमर अमररूप खरे ।।
पाहून हास्यवदनें यांची हिमक[4]रविलोक कुतुक सरे ।।३५।।

ज०— ह्या दोघां पुत्राला पाहून दशरथाचीं दोन्ही नयनें शांत होतात; तस्मात तो मोठा धन्य आहे.

श०— दोन्ही दिशा देखील शांत होतात.

वि०— अरे चारी दिशा असें ह्मण.

ज०— तर मग आणखीही दोन पुत्र दशरथाला आहेत काय?

वि०— होय, रामलक्ष्मणा सारखे च भरत शत्रुघ्न नामक आणखीही दोन पुत्र आहेत.

श०— ऋष्यश्रृंग ऋषीनें जे चरूचे भाग दिले, त्यांचींच हीं फळें आहेत.

---

१ धनुष्यशब्दाला. २ धनुष्याचादोरीस. ३ भूमंडळ ४ हिमकर चंद्र

ज०– दशरथ राज्याच्या प्रारब्धाचीं हीं फळें, असें ह्मटल्या-सही चिंता नाहीं

वि०– हे जनक राजा, तूं जें बोललास तेंच खरें, आज दश-रथ राजासारखा भाग्यवान् कोणी ही नाहीं

ज०– भाग्यवान् महात्मा ही कोणी नाहीं.

वि० तें आह्मीं कसें बोलावें, तुमचा परस्परांचा महिमा तुह्मां-सच माहीत.

ज०– समुद्राच्या महत्त्वाचा अनुभव लाहानशा तळयाला अ-सतो काय ? दशरथाच्या महत्त्वाचा अनुभव मला को-ठून असणार ?

वि०– जे नम्र सर्वमान्य आणि संभावित आहेत त्यांनीं अ-सें असत्य भाषण केलें तरी त्यांस तें शोभतेंच, अथवा हें ही योग्यच आहे.

## आर्या

निर्मी राजा दशरथ चंद्रापरि रामचंद्र सुंदर हा ॥
तूं निर्मिलीच सीता सुखदात्री कुमुदिनीसमान अहा ॥३६॥

ल०– (हळूच रामचंद्राला ह्मणतो.) हे आर्य, चंद्रकुमुदिनीं-चा दृष्टांत देऊन हा विश्वामित्र ऋषी काय बोलला बरें.

रा०– (रागावलेंसें दाखवून ह्मणतो.) अरे लक्ष्मणा, पुरे अ-सलें हें व्यर्थ भाषण.

ज०– (आपल्या मनांत ह्मणतो.) विश्वामित्रानें बोलण्यांत मला कांहीं सूचना केली; परंतु त्या बोलण्यांतच चित्त स-क्त झाल्यामुळें ह्या ऋषीला हरशरासनाची विस्मृति पडली असें वाटतें. मग उघड बोलतो. हे ऋषीश्वरा, शिव धनुष्या-सारखा वांकडा आणि सुंदर असा जो आपल्या बोलण्या-चा प्रकार त्यानें शिवधनुष्याचें स्मरण झालें.

वि०– (मनांत ह्मणतो.) जनकराजा, ह्या भाषणानें शिवध-

नुष्य उचलण्याची सूचना करीत आहे. करीनाका. (मग उघड ह्मणतो.) हे राजर्षे जनका, चांगलें स्मरण दिलें. मला शिव धनुष्य पाहाण्याची उत्कंठा आहेच तर आतां तें एथें आणण्याविषयीं सेवकांला आज्ञा कर; किंवा दुसरे कशाला पाहिजेत. मी रामचंद्रालाच आज्ञा करतों.

ज०– (आश्चर्य युक्त होऊन ह्मणतो.) अद्यापि ज्याचे ओंठावर दूध दिसतें अशा सुकुमार रामचंद्राला कठोर हरकार्मुक आणण्याविषयीं आज्ञाकरतां, हा काय अनुचित व्यापार. तुह्माला ह्या धनुष्याचा वृत्तांत माहीत नाहींकाय?

श्लोक

तें चंड चाप हिमपर्वतरूप ज्याला
दोरी [1]भुजंगपति बाण [2]रमेश झाला ॥
दो[3]र्मंडलें नमविलें [4]शशिशेखराच्या
मध्यें [5]उदग्र पण सर्व धनुर्गणाच्या ॥ ३७ ॥

आर्या

त्रिपुरासुरनारींच्या नेत्रीं बाष्पाश्रुपूर देणारें ॥
शंभूचें पूर्वीं पण मग इंद्राचे दिखील होणारें ॥३८॥

वि०– मलाही तें धनुष्य माहीत आहे.

श्लोक.

सेवार्थ देवकरचामरवायुपानें
झाला सुपुष्ट गुणसर्प शरीरमानें ॥
तत्कर्षणें श्रम अपार शिवास झाला
तो वर्षतां हिमकणास [6]हिमाग गेला ॥३९॥

ज०– तर तुह्मी असें दुर्धर जें धनुष्य तें आणण्याविषयीं रामचंद्रास कशी अज्ञा करतां?

वि०– केवळ आणण्याचीच आज्ञा करीत नाहीं, तर नमवि-

१ वासुकी. २ विष्णु ३ बाहुमंडलानें ४ शिवाच्या. ५ श्रेष्ठ ६ हिमाचल

ण्याची देखील आज्ञा करितों. ( असें बोलून रामचंद्राशीं बोलतो. ) वत्सा रामा, कंबर बांध, आणि सांगतों तें कर,

### आर्या

मारीच्या उडवीं जें आणि सुबाहूस मृत्यु देणारें ॥
तें दे लक्ष्मणहस्तीं धनुष्य हें ताटकेस वधणारें ॥ ४० ॥

ज०— हे ऋषीश्वरा, जें न घडण्यासारखें तेंच कसें बोलतां?

वि०— हे जनका, तुला रामचंद्राचें सामर्थ्य ठाऊक नाहीं काय?

### श्लोक

पावून माझ्या जवळून सारी धनुष्यविद्या मग [1]यातुमारी ॥
करून माझ्या मखरक्षणातें तद्रूप देई गुरुदक्षिणातें ॥४१॥

ज०— ( विचारकरून श्वास टाकून ह्मणतो. ) हे ऋषे, तें सर्व असो, पण

### आर्या

मारीच्यादिक राक्षस ज्याच्या चरणास वंदिती सकळ ॥
एथें झाला रावण शिवगिरिचालक असून तो विफळ ॥४२॥

वि०— ह्मणून काय झालें. मी तर दुसऱ्या कोणाचें सामर्थ्य नाहीं ह्मणून च रामचंद्राला आज्ञा करतों. ( असें बोलून रामचंद्राला ह्मणतो. ) वत्सा रामा, ऊठ, आणि चंद्र शेखराचें कोदंड उचलून आह्माला आनंद दे.

ज०— ( मनांत ह्मणतो. )

### श्लोक.

ज्याचें विशुद्ध तप मान्य समस्त लोकां
आणील दुर्घट मनांत विचार तो कां ॥

---

१ राक्षस

हा राम बाळ हरकार्मुक वज्रसार

झोलावतें मन मदीय ह्मणून फार ॥ ४३ ॥

( पुन्हा पृथिवीकडे पाहून तिलाच ह्मणतो. )

## आर्या

त्वत्कन्या [1]रतिसम ही [2]मारापरि हा कुमार सुकुमार ॥

याच्या हस्तीं पडतां धनु हें होईल पुष्पसमभार ॥४४॥

श०— हे राजर्षे जनका, वेड्यासारखा पुनः पुनः विचार कशाचा करतोस ? हा महर्षि काय सांगतो त्याला अनुसर.

ज०— अनुसरलों आहेंच. (मग रामाला ह्मणतो. ) मुला, गुरूजी काय सांगतात तें कर.

तें जनकाचें वाक्य ऐकून रामचंद्र उभा राहून कंबर बांधतो आहे, तों इतक्यांत [3]प्रतिहारी येऊन जनकास ह्मणते. राजा, तुझा जय असो जय असो. कोणी एक ब्राह्मण तुझ्या दर्शनाची इच्छा धरून दरवाज्याचे बाहेर उभा आहे, तेव्हां त्याला तुझ्या जवळ आणूं काय ?

ज०— वा! हें देखील जनकाला विचारलें पाहिजे काय ?

प्र०— आज्ञेप्रमाणें करतें. ( असें बोलून त्या ब्राह्मणाला राजाजवळ घेऊन आली. )

ज०— भटजी, मी नमस्कार करतों.

ब्रा०— हे राजा, तूं सुमति हो.

ज०— (मनांत ह्मणतो.) हीं आशीर्वादाची तऱ्हा निराळीच आहे, असो ( मग उघड बोलतो. ) भटजी, ह्या आसनावर बसा.

ब्रा०— राजा, मी निरोप सांगण्यासाठीं आलों आहें.

---

१ मदनाची बायको २ मदन ३ चोपदारीण

ज०– भटजी, काय निरोप आहे?

ब्रा०– राजा ऐक.

श्लोक

ज्याच्या कीर्तिभयाट्ट[1]हासविभवें त्रैलोक्य गोरें असा
जो क्षत्रांतक जामदग्न्यपरशु क्रोधें दिसे रुद्रसा ॥
शंभूचा निजभृत्य वैरिवनिता नेत्रांतलें जो पितो
तेजें कज्जल कालकूटविष तो आज्ञा तुला सांगतो ॥ ४५ ॥

ज०– ( मनांत ह्मणतो. ) काय चमत्कार! हें गर्वाचें भाषण किती वांकडें आहे! ( असो मग उघड बोलतो. ) भटजी, जामदग्न्यपरशूची आज्ञा तरी काय आहे?

ब्रा०– सांगतों ऐक.

श्लोक

वाटेल त्या नृपसुताप्रत आत्मकन्या
दे पाव आयु चिरकाल नृपाल धन्या ॥
ह्या शैव कार्मुकविकर्षणपातकातें
केलेंस तूं तर करीन तुझ्या वधातें ॥ ४६ ॥

ज०– ( हंसून ह्मणतो. ) भटजी, माझा ही उलट निरोप त्या परशुरामपरशूला सांगा.

ब्रा०– काय सांगूं?

ज०– असें सांगा.

श्लोक.

तूं माझा बहु मित्र यास्तव मला ही बोधिली [2]वैखरी
आकर्षील धनुष्य त्याप्रतच मी देणार कन्या खरी ॥

---

१ ( आट्टहास ) खदखद हसणें २ वाणी.

हें वाटेल तुला न मान्य तर तूं निःशंक युद्धास ये
मत्कन्यापति हा धनुर्धर उभा नाहींत आह्मा भयें ॥ ४७ ॥

(हें जनकाचें बोलणें ऐकून तो ब्राह्मण निघून गेला.)

ज०— शतानंदा, ही परशुरामानें आपल्या क्रोधरूप अग्नी-ची ठिणगी फेंकली आहे.

श०— फेंकीना कां, आपल्या बाहुबलरूप सरोवरानें हा रामचंद्र अशा लाखों ठिणग्या आल्या तरी विझविण्यास समर्थ आहे.

वि०— हे जनका, चकचकीत रत्नांचे मुगूट घालून चहूंकडे हजारों बसले आहेत ते कोण?

ज०— हे ऋषीश्वरा, हे कोण आहेत ते सांगतों.

श्लोक

शंभूचें धनु पाहतां भुजबळाचा गर्व ज्यांचा पळे
नाना देशग ते नृपाळ बसले मी प्रार्थिले यामुळें ॥
कीं कांहीं दिन मी करीन तुमची पूजा अशी मानसीं
इच्छा ही म्हणतां क्षणीं नृपतिनी ती पूर्ण केली तशी ॥४८॥

वि० वत्सा रामा ह्या सर्व राजाच्या देखत आमचा मनोरथ पूर्ण कर.

( राम विश्वामित्राला नमस्कार करून त्या धनुष्याकडे निघून गेला )

ज० शतानंदा, ह्या रामचंद्राच्या बरोबर जा, कांकीं तो गैरमाहीत आहे, आणि भालदाराला सांग कीं, जानकीच्या हातांत कमळ पुष्पांची माळ देऊन, तिला स्वयंवराचे ठिकाणीं उभी कर.

श० बरें, ( असें बोलून निघून गेला. )

( इतक्यांत भालदार पडद्याच्या बाहेर येऊन ह्मणतो. )

भा०— हे जनकराजा, तुझा जय असो जय असो. तुझ्या आज्ञेप्रमाणें सर्व केलें.

वि०— (पाहून आनंदानें ह्मणतो.) कायहो रामचंद्राचा पराक्रम!

### आर्या

शिशुराघवें हराचा लीलेनें नम्र चाप जों केला॥
तों भूवलयव्यापी ज्याचा गुणघोष अंबरीं गेला ॥ ४९ ॥

ल०— हे ऋशीश्वरा, आपण ह्मणतां असेंच आणखी ही मी सांगतों.

### श्लोक

जे शैवचापगुणशब्द कुलाचलांच्या
जाऊन आंत शिरले च गुहातलांच्या ॥
त्यांच्या प्रतिध्वनिमिषें यश राघवाचें
गातात कीं दश दिशा [1]क्षितिजा[2]धवाचें ॥५०॥

ज०— लक्ष्मणा, तूं असें ह्मणतोस कीं, ह्या दिशा राघवाचें यश गातात, तर मी सांगतों तें ऐक.

### आर्या

शिवचापगुणरवानीं केली परिपूर्ण मत्प्रतिज्ञा ती ॥
आणि मनोरथ माझा केला परिपूर्ण हें दिशा गाती ॥५१॥

प्र०— ( भालदाराला ह्मणते. ) हे आर्य, हें आश्चर्य पाहा, कीं सीता आणि राम हीं दोघें शिवचापाचें आरोपण सांग करतात.

भा०— ( आश्चर्य युक्त होऊन ह्मणतो. ) कसें बरें सांगकरतात. ( मग विचार करून हंसून ह्मणतो. ) हं समजलें.

---

१ जानकी २ नवरा

श्लोक

अतिमृदुलकरांनीं चाप हा शंकराचा
दशरथतनयानें कर्षतां बाण त्याचा ॥
जनकनृपसुतेचा सिद्धझाला कटाक्ष
[१]असितजलरुहाच्या कांतिचा जो [२]विपक्ष ॥ ५२ ॥

ल०— हे भगवन् विश्वामित्रा, हें तर फारच अद्भुत झालें आहे.

श्लोक

भेदी श्रीविष्णुनिद्रा सकलनृपमहाशौर्यदर्पास मोडी
दिग्दंतिश्रोत्र फोडी निजबळविभवें कूर्मराजास झोडी ॥
श्रीरामस्तोत्रधारी प्रलय[३]घनघटागर्जना तुच्छकारी
झाला टंकार मोठा [४]पशुपतिधनु हें मोडतां तीव्र भारी ॥५३॥

प्र०— ( भालदाराला ह्मणते. )

श्लोक

जे डोंगरांच्या निजले गुहांत
त्यांतें करी जागृत जो क्षणांत ॥
जो भंगतां भर्गधनुष्य झाला
तो हा टणत्कार करी भयाला ॥ ५४ ॥

आर्या

सिंहभयानें ज्याच्या ओरडले गिरिगुहांत सडकून ॥
तच्छब्दयोग होतां फोडी ब्रह्मांड ऊर्ध्व धडकून ॥ ५५ ॥

भा०— प्रतीहारीला ह्मणतो, चमत्कार पाहा.

श्लोक

मोडी [५]चंडीशचापा निजत्दृदयतटीं जानकीदत्तमाला
घाली शृंगार वीर [६]प्रथितरस पाहा शोभती एक वेळा ॥

१ ( असित ) नील २ शत्रु ३ मेघसमुदाय. ४ शिवधनुष्य.
५ शिवधनुष्याला. ६ ( प्रथित ) प्रख्यात

साऱ्या क्षोणीपतींच्या मदनसम मनीं पाहातां रूप ज्याचें
आनंदक्रोधखेदाद्भुतगण अवघा एककाळीं च नाचें ॥ ५६ ॥

( इतक्यांत पडद्या बाहेर शतानंद येऊन ह्मणतो. )

श०— हे जनकराजा, तुला चांगलें वाटो अथवा वाईट वाटो, मीं जसें पाहिलें तसें सांगतों.

## श्लोक

ज्यावल्ली करपंकजें रघुवरें आकर्ण आकर्षितां
ज्याची भ्रू न चळे गिरीशधनु तें मोडें अपाप स्वतां ॥
कंठांतून न गर्वशब्द पडला बाहेर ज्याच्या अहा
चापाचा त्रिजगांत ही पसरला मोठा टणत्कार हा ॥५७॥

ज०— असें अमर्याद कर्म करण्यापासून कुमार रामाचें निवारण तूं कां केलें नाहीं?

श०— कसें बरें निवारण करावें?

## आर्या

राघवहस्तस्पर्शें गेलें भंगून [1]गिरीशकार्मुक तें ॥
तच्छब्दसागरांत ब्रह्मांड बुडून फार डळमळतें ॥ ५८ ॥

ज०— तर आतां लौकर जानकीरामचंद्रांच्या पाणिग्रहणाविषयीं विश्वामित्र ऋषीचें अनुमत घ्यावें.

श०—

## आर्या

मोडून शैव कार्मुक झालीं शकलेंच दोन तीं जेव्हां ॥
सीतारामकरांचा झाला संयोग निश्चयें तेव्हां ॥ ५९ ॥

तर आतां उर्मिला आणि लक्ष्मण ह्यांच्या पाणिग्रहणाविषयीं विश्वामित्र ऋषीश्वराची प्रार्थना करावी.

वि०— ( हंसून ह्मणतो. ) हें तर असो; परंतु

---

१ शिवधनुष्य

## आर्या

चारी विवाह व्हावे एक्या काळीं असाच रामाचा॥
आहे हेतु नृपाळा तूं सुज्ञ च पण विचार कर त्याचा॥६०॥

ज०— ( आनंदयुक्त होऊन ह्मणतो. ) माझ्या बंधूच्या दोघी कन्या मांडवी आणि श्रुतकीर्ति नामक आहेत, त्यांचें पाणिग्रहण भरत आणि शत्रुघ्न ह्या दोघांनीं करावें, असें आपल्या मनांत आहे काय ?

वि०— होय.

ज०— तर आपले आज्ञारूप पुष्प हें मी आपल्या मस्तकावर ठेवलें, तर मग चला आतां कार्याच्या तयारीला लागूं. (मग सर्व निघून जातात. )

तृतीयांक समाप्त.

# अंक ४

( पडद्यांत कोणी एकानें एक आर्या ह्मटली. )

### आर्या

रत्नप्रदीप जळतो जनकनृपाच्या सभेंत हा विमळ ॥
मोठा ही पवन जरी सुटला होईल ह्या पुढें विफळ ॥ १ ॥

( पुन्हा पडद्यांत शब्द होतो. ) अरे क्षत्रियानों, मार्गें सरा; आणि नजरेस पडूं नका. कां ह्मणाल तर,

### श्लोक

बालादित्यसमान दृष्टि दिसते आरक्त ज्याची अहो
ज्याची तीव्र कुठारधार रुधिरें न्हाली नृपांच्या च हो ॥
दोरी शब्द करी असें धनु करीं ज्याच्या जगत्कांपतें
श्वासांनीं जमदग्निपुत्र पहिला आला पहा रूप तें ॥ २ ॥

( तदनंतर पडद्याच्या बाहेर परशुराम येऊन, मोठ्या डौलानें इकडे तिकडे फिरून ह्मणतो. ) अरे, हा जनकराजा किती दांडगा आहे ! पहा, कीं ज्यानें हरचापारोपणेंकरून च कन्यादानाची प्रतिज्ञा केली आहे. ( नंतर आपल्या परशूकडे पाहून ह्मणतो. )

### आर्या

नृपकंठरुधिरपूरें ज्याची गेली धुऊन खर धार ॥
तो हा कुठार माझा जनकनृपें हीन विश्वकरणार ॥३॥

( पुन्हा विचार करून ह्मणतो. )

## आर्या

उदित सहस्रार्जुनभुजविपिनीं जो दीप्त [1]तुंग नृपवंशीं ॥
निमिकुलशुष्कतृणाला क्रोधाग्ने तुज करूं कसा स्पर्शी ॥४॥

( पुन्हा विचार करून ह्मणतो. ) परंतु हा मनःकल्पित जामात्याच्या भुजबळाच्या जोरावर गर्वानें दांडगेपणाचें भाषण करतो आहे, तेव्हां त्याची उपेक्षा करणें हें नीट नव्हे. बघा, आमच्या परशूला ह्यानें किती दांडगेपणाचा निरोप पाठविला आहे.

## श्लोक

तूं माझा बहु मित्र यास्तव मला ही बोधिली वैखरी
इत्यादि सर्व जनकाचें भाषण पुनः ह्मणतो. अरे,
ह्या जनकाला काय गर्व झाला आहे ? ह्याला माझ्या
परशूचा पराक्रम ठाऊक नाहीं काय ?

## श्लोक

ज्याच्या धाराप्रहारें दशशत कर हे छिन्न होतां निघाली
रक्ताची धार तेव्हां नव रविकिरणातुल्य शोभाच आली ॥
[3]फुल्लाशोकद्रु कांहा सुरपुरवनितालोचना भ्रांति देई
तो राजा कार्तवीर्य स्वकपुरवनितानेत्रशोकद्रु होई ॥ ५ ॥

( आणखी दुसरें ही )

## आर्या

ज्याणें निबद्ध केला लीलेनें नर्मदा नदीपूर ॥
आणि रणीं रावण ही केला बद्ध प्रसिद्ध जो शूर ॥६॥

## आर्या

तो कार्तवीर्य त्याचें भुजवन धाराजळीं बुडे सकळ ॥
ज्याच्या तो हा माझा धाराजळ टाकतो परशु विमळ ॥७॥

---

१ उंच २ वंश ३ फुल्लेला अशोकवृक्ष

( पाहून ह्मणतो. ) हा शतानंदाचा शिष्य, तांड्यायन हिकडे कां येत आहे ? (इतक्यांत तांड्यायन पडद्याच्या बाहेर येऊन परशुरामाला ह्मणतो.) हे भगवन्, मी नमस्कार करतों.

प०— आयुष्मान् हो. तुला मी कांहीं विचारतों तें सांग. अजून तुझ्या गुरूच्या यजमानाची हरचापारोपणाची इच्छा नाहींशी झाली कीं नाहीं ?

तां०— नाहींशी झाली.

प०— ( आनंदानें ह्मणतो. ) एकूण नाहींशी झाली.

तां०— धनुष्यासुद्धां नाहींशी झाली.

प०— ( घाबरेपणानें ह्मणतो. ) काय ह्मणालास ? धनुष्यासुद्धां नाहींशी झाली ?

तां०— होय, असेंच बोललों.

प०— बरें, आतां कसें वर्तमान झालें तें स्पष्ट सांग.

तां०— कोणा एकाच्या.

## श्लोक

प्रचंड बाहुदंडांनीं ओढितां धनु मोडलें ॥
शिवाचें [1]भृगुमार्त्तंडा तच्छब्दें विश्व कोंदलें ॥ ८ ॥

प०— ( रागानें विचारतो. ) कोणाच्या बरें ?

तां०— श्रवण कर.

## आर्या

मारीचादिक राक्षस जे कौशिकयज्ञनाशकर झाले ॥
वश ज्याच्या. ( इतकें बोलतो, तोंच परशुराम ह्मणतो. ) पुरे आतां, समजलों कोणतो. तो दुष्टशिरोमणी राक्षस राजा.

---

१ परशुरामा.

तां०– ( मनांत ह्मणतो. ) एकूण हा असें समजला, कीं रावणानें धनुष्य मोडलें.

प०– ( क्रोधानें ह्मणतो. ) ह्याहा आतांच.

श्लोक

जो कापण्यास मृदु कंठ महीपतींचे
माझा कठोरतरधार कुठार नाचे ॥
तो राक्षसेंद्रदशकंठकठोरकंठा
तोडो मिटेल मग हा सगळाच तंटा ॥ ९ ॥

विचार करून ह्मणतो. किंवा,

आर्या

जो कार्तवीर्यभुजतरुवन तोडी आणि मानसांत ह्मणे ॥
गिरिभेदक वज्राचें माझ्यापेक्षां असेंच शौर्य उणें ॥ १० ॥

आर्या

जो यमनगरद्वारच तो हा माझा कुठार ह्मणतो कीं ॥
दशकंठकंठकदलीवन हें तोडून काय यश लोकीं ॥ ११ ॥

( पुन्हा विचार करून ह्मणतो. ) जरी ही हलकी गोष्ट आहे तरी हा राक्षस अपराधी आहे; तेव्हां ह्याची उपेक्षा करणें हें योग्य नव्हें तर आतां.

आर्या

दक्षिण सागरमध्यें अष्टम कोंकण करून जाळावी ॥
मद्बाणज्वलनानें लंका विश्वांत कीर्ति मिळवावी ॥ १२ ॥

( असें बोलून मोठ्या अवसानानें चोहींकडे फिरूं लागला, तों )

तां०– ( मनांत ह्मणतो. ) आतां क्षत्रियकुळाला ईश्वर राखो.

( इतक्यांत पडद्यांतून कोणी एक हाक मारून सांगतो. ) अरे, आज्ञा धारकानों सीता आणि रामचंद्र ह्यांचा विवाह

होणार आहे, तेव्हां स्वस्तिवाचन करण्यासाठीं ब्राह्मणांस बोलावा.

प०– ( तांड्यायनाकडे फिरून क्रोधानें ह्मणतो. ) अरे ब्राह्मणाधमा, तूं रावणानें धनुष्य मोडलें असें सांगून मला फशिवलेंस; कांकीं जनकाचा जामात तर हा दुसराच कोणी दिसतो आहे.

तां०– हे भगवन् ह्यांत माझा अपराध काय? मीं अर्धें बोलतों आहें, तोंच तूं भलतेंच समजून भ्रांतींत पडलास.

प०– तर आतां सगळें सांग.

तां०– श्रवण कर.

आर्या

मारीचादिक राक्षस जे कौशिक यज्ञघातकर झाले ॥
वश ज्याच्या बाणाच्या आणि पराभव दशेस ही गेले॥ १३॥

(त्याच्याच–प्रचंड बाहुदंडांनीं ओढितां धनु मोडलें इत्यादिक श्लोक पुन्हा ह्मणून दाखवितो. )

प०– बरें, मारीचाचा पराभव करणारा असा हा कोण?

तां०– श्रवण कर.

श्लोक

जे ऋष्यशृंगचरुभागबळें कुमार
झालेच [1]पंक्तिरथराजवधूस चार ॥
हा त्यांतला प्रथम सुंदर रामनाम
जो कौशिकाख्य मुनिशिष्य उदारधामा ॥ १४ ॥

प०– ( क्षणभर विचार करून क्रोधानें ह्मणतो. )

श्लोक

दुर्धर्ष सिद्ध नरकिन्नर देवतातें ॥
तो पावला त्रिपुर भस्मदशेस जेथें ॥

१ ( पंक्तिरथ ) दशरथ

तें शंभुचाप जर बालक राघवें रे ॥
केलेंच भग्न,

तां०— ( मनांत ह्मणतो. ) बरें, हा पुढें काय बोलणार ?

प०— तर त्कुळ मत्कुठारें ॥१५॥

तां०— हा परशुराम रागावला आहे; तर हें वर्त्तमान आपल्या गुरूला जाऊन सांगावें. ( असें बोलून तो निघून गेला. )

प०— ( अवलोकन करून ह्मणतो. ) नवीन विवाहाच्या वेषावरून असा तर्क वाटतो, कीं दिसतात हे रामलक्ष्मण च असतील.

( मग आनंदानें रामचंद्राकडे न्याहाळून पाहून ह्मणतो. ) हे लोक अर्धे वेडे आहेत; कां कीं ह्याला काम असें ह्मणावयाचें, तें सोडून राम असें ह्मणतात.

( पुन्हा न्याहाळून पाहून ह्मणतो. )

## श्लोक

दो: क्रीडेनें मदनरिपु ही तुछ केला पुरारी
सौंदर्याचा अतिशय तसा मन्मथाहून भारी ॥
ज्याची ग्राशी उडपतिस ही कांती न्याची रसांनीं
केली वाटे विरचित तनु वीरशृ[1]ंग्यद्भुतांनीं ॥१६॥

( तदनंतर रामलक्ष्मण पडद्याच्या बाहेर प्रवेश करतात. )

ल०— ( पाहून कौतुकानें ह्मणतो. )

## आर्या

धरि दोरी धनु मौंजी तनु ज्याच्या तीक्ष्ण बाण दर्भ करीं ॥
परशु कमंडलु शोभे यास्तव ही वीरशांतमूर्ति खरी ॥१७॥

---

१ शृंगार

हे ज्येष्ठ बंधो, रामचंद्रा, हें पुढें ब्राह्मणक्षत्रियरूप चित्रासारखें दिसतें तें काय ?

रा०— वत्सा लक्ष्मणा, तुला ठाऊक नाहीं काय ? हा भगवान् जमदग्निपुत्र परशुराम आहे.

## आर्या

भेदी क्रौंच गिरीतें देई भूमंडळास बाणानें ॥
हटवून सागरातें वसवी कोंकण नवें स्वशक्तीनें ॥१८॥
युद्धांत षण्मुखातें जिंकी अर्जुनभुजातरुवनातें ॥
छेदी कुठार ज्याचा तो हा ज्या क्षत्रकाल जग ह्मणतें॥१९॥

ल०— तर ह्याचा स्वभाव मोठा आश्चर्यकारक दिसतो.

रा०— आश्चर्यकारकांचा मुगुटमणि असें ह्मण. हा तर,

## श्लोक

धेनुच्यापरि कश्यपास धरणी देई महा आदरें
स्त्रीवेषें वसती कितीक नृपती गेहांत ज्याच्या[1]दरें ॥
क्रौंचाद्रीस विदीर्ण षण्मुख करी शक्तिप्रहारें पहा
त्यातें विद्ध करून बाणनिचयें संतुष्ट झाला न हा ॥२०॥

( असें बोलून रामलक्ष्मण दोघे इकडे तिकडे फिरतात. )

रा०— ( हात जोडून ह्मणतो. ) हे भृगुकुलश्रेष्ठा परशुरामा, आह्मी तुला नमस्कार करतों.

प०— समरंगणीं तुझा जय असो.

रा०— हे भृगुकुलचूडामणे मी आपल्या आशीर्वादानें कृतकृत्य झालों.

प०— ( मनांत दया येऊन ह्मणतो. )

---

१ भयें.

श्लोक

जो नम्र फार सुकुमार कुमार राम
चंद्रासमान दिसतो नयनाभिराम ॥
अत्यंत कोप असल्यावर योग्य काय
( पुन्हा क्रोधानें ह्मणतो. )
मोडी गिरीशधनु यास घडो अपाय ॥२१॥

( पुन्हा दया येऊन ह्मणतो. )

आर्या

जनकसुता हीविधवा असें माझ्या न योग्य होण्यास ॥
( पुन्हा विचार करून क्रोधानें ह्मणतो. )
हा रेणूकागळ्यातें भ्याला नाहीं कुठार चिरण्यास ॥२२॥

( मग मोठ्यानें ह्मणतो. ) हे **दशरथपुत्रा**, हा माझा भाषणाचा प्रकार लौकिकरीतीप्रमाणें बाह्यात्कारी मात्र आहे.

रा०— ( हंसून ह्मणतो. ) बरें मनांत काय आहे ?

प०— श्रवण कर.

श्लोक

हें भंगिलें शिवधनुष्य ह्मणून जातें
अत्यंत गर्व चढला च तुझ्या भुजांतें ॥
छेदून त्यांस रुधिरें कठिणा कुठारा
पाजीन मी मधुसमान धरून धारा ॥२३॥

रा०— हे भगवन्, मी आपल्या स्वाधीनच आहे. जें आपण कराल तें करा ; परंतु क्रोध येण्याचें कारण काय तें मला समजलें पाहिजे.

प०— काय गर्वाची धुंदी चढली आहे! पहा, आपणच दांडगे-

पणा केला, आणि आह्मीं ही तो बोलून दाखविला; परंतु ह्याच्या लक्षांत येत नाहीं. अरे, क्रोध येण्याचें कारण काय तें अजून तरी ऐक.

### श्लोक

त्रिपुरासुरपत्नींतें वियोगव्रत बोधिलें ॥
ज्याणें त्या शंकराचें त्वां किमर्थ धनु मोडिलें ॥२४॥

रा०— हीं खोटी लोकवार्त्ता ऐकून निरपराधी जो मी त्यावर आपण व्यर्थ रागावला आहां.

प०— तर मग शिवधनुष्य स्वस्थ आहे काय ?

रा०— छे, छे.

प०— तर अपराधी नाहींस काय ?

रा०— मी काय करूं ?

### श्लोक

मी हस्तस्पर्श केला कीं नाहीं तों हरकार्मुक ॥
गेलें मोडून तत्काळ तें आपण च धार्मिक ॥२५॥

प०— वा, कसा बाणाच्या अग्राला चंदन लावून, तो बाण माझ्या ऱ्हदयावर ठेवून माझें ऱ्हदय थंड करतोस, तर आतां हें बोलणें पुरे.

( मग परशू हातांत घेऊन ह्मणतो. )

### श्लोक

हे राम शैव धनु भग्न करून पापी
झालास यास्तव कठोर कुठार कापी ॥
कंठा तुझ्या प्रथम निर्दय हा असारे
पाहोत कृत्य जनकादिक भूप सारे ॥२६॥

तर आतां युद्धास तयार हो.

रा०— आर्या

कंठीं हार करो हा निवास किंवा कुठार खरधार ॥
स्त्रीनेत्रांचा आश्रय कज्जल किंवा करो च जलपूर ॥२७॥
पाहूं सुख अथवा मुख यमदेवाचे परंतु शस्त्रास ॥
विप्रावर धरणारे आह्मीं नाहीं करोत ते त्रास ॥२८॥

प०— अरे, दुसऱ्या ब्राह्मणांसारखा मलाही नमस्कारपात्र मानतोस काय?

(पुन्हा रागानें ह्मणतो.) अरे, मी जमदग्निपुत्र तुला ठाऊक नाही काय?

श्लोक

ज्याच्या बाहुबळें षडानन पळे होऊन युद्धीं श्रमी
धाऱ्यातें वदला अरे भुज मला तोंडाप्रमाणें कमी ॥
कां केलेस ह्मणून फुंदत तसा सांबाकडे धांवला
तों त्याच्या करपंकजीं विधिशिरा पाहुन संतोषला ॥२९॥

(पुन्हा क्रोधानें ह्मणतो.) काय बोललासरे, काय बोललास? कीं आह्मी ब्राह्मणांवर शस्त्र धरीत नाहीं! क्षत्रियजातीचा अभिमान धरून ब्राह्मण जातीला तृणप्राय मानतोस; तर आतां ब्राह्मण जाति अधिक किंवा क्षत्रिय जाति अधिक ह्याचा संग्रामांत आतांच निर्णय होईल.

रा०— श्लोक

हे विप्रा न तुझ्या बरोबर अह्मां संग्रामवार्त्ता बरी
आह्मी निर्बळ सर्व ही द्विज तुह्मी आहां बळींच्या शिरीं ॥

ल०— हे परशुरामा, रामचंद्र ह्मणतो तेंच खरें.

राजांचें बळ चाप एकगुण तें हें आमचें निर्मळ

विप्रांचें उपवीत हें नवगुण प्रख्यात आहे बळ ॥३०॥

रा०— वत्सा, हा मुनि आपणास पूज्य आहे, तेव्हां त्यापुढें हें दांडगेपणाचें भाषण पुरे.

प०— त्यांत त्याचा काय दोष आहे? मीच मुळीं चुकलों.

## आर्या

तुमचा पूर्वज बसला नग्नस्त्रीमंडळांत त्या काळीं ॥
माझ्या दुष्ट कुठारें त्याची केली न त्यामुळें होळी ॥३१॥
तत्फल कीं तत्कु[1]लज क्षत्रांचीं हीं कठोर दर्पांचीं ॥
वचनें श्रवणीं माझ्या शिरतात कृपा न योग्य सर्पांची ॥३२॥

रा०— हे भगवन्, हा बालक अजून दुग्धकंठ आहे; तर त्यावर इतका कोप न करावा तर क्षमाच करावी.

प०— अरे, काय ह्मणालास हा दुग्धकंठ आहे? हा दुग्धकंठ नाहीं, खचीत हा विषकंठच आहे.

ल०— हे भगवन्, आपण नीलकंठाचे शिष्य आहां, तेव्हां क्षमा करणें हें अवश्यच आहे.

प०— (क्रोधानें ह्मणतो.) अरे विषकंठ एवढ्या नावानेंच तूं हीं माझा गुरु काय

ल०— हे भगवन्, मी ह्या अर्थानें बोललों नाहीं; तर दुसरा अर्थ मनांत आणून बोललों, तो असा कीं,

## श्लोक

किरीटारूढ झाला च बालचंद्र जरी तरी ॥
विषकंठ मनीं काय क्रोध आश्रय तो करी ॥३३॥
तेव्हां आपण त्याचेच शिष्य आहां, ह्मणून अवश्य माझी क्षमा करण्यास योग्य आहां.

१ त्याच्या कुळापासून झालेले

प०– ( आश्चर्य वाटून मनांत ह्मणतो. ) वा! काय ह्या क्षत्रियाच्या पोराचें भाषणचातुर्य आहे हो! असो, ( मग उघड बोलतो. ) लक्ष्मणाच्या भाषणाची मी क्षमा करतों; परंतु हा कठोरप्रकृति माझा कुठार क्षमा करीत नाहीं, ह्या कुठाराचा स्वभाव तुला ठाऊक नाहीं काय?

### श्लोक.

मारून सर्व अवनीपति भूमि ज्यानें
केली अराजक मदीय परश्वधानें ॥
रक्ताक्तकेश पसरून चहूंकडे रे
केली [1]त्रिवर्ण पृथिवी उभयप्रकारें ॥३४॥

( पुन्हा क्रोधानें ह्मणतो. ) कसा ह्या परशूचा स्वभाव तुला माहीत नाहीं?

### आर्या

ज्याच्या धारापातें तुटले युद्धीं नृपालबालगल ॥
[2]नीरेणुका च धरणी तद्रक्तें शोभलीच ही सकल ॥३५॥
त्या बाळांतें वरण्यास्तव जी जी स्वर्गकन्यका आली॥
तत्कर[3]पुष्करमाळारेणूंनीं भू सरेणुका झाली ॥३६॥

ल०– हे भगवन् हें मात्र खरें, कीं तुझ्या कुठारधारेच्या पराक्रमानें ही भूमि [4]नीरेणुका झाली.

प०– ( मनांत ह्मणतो. ) अरे, हा कसा भाषणांत रेणुकेचा वृत्तांत काढून मला लावून बोलतो. असो, ( मग उघड बोलतो. ) अरे क्षत्रियाच्या पोरा, तूं निरापराध आहेस तर तुझ्यावर मी कुठाराचा प्रहार करीत नाहीं; परंतु तुझा कंठ

---

१ ( वर्ण ) जाति आणि रंग २ धूलि रहित ३ ( पुष्कर ) कमळ.
४ रेणुका रहित

स्वाभाविक कठोर भाषण करणारा आहे, ह्मणून त्याला मात्र माझा कुठार कापील.

( पडद्यांत शब्द होतो. ) अरे, जमदग्निपुत्रा, तूं फार डौल करतोस, तर तुझ्या शासनासाठीं हें पहा धनुष्य घेतों.

प०— ( हंसून ह्मणतो. ) हा जनकराजा कशाला आला. ( मग उच्च स्वरानें बोलतो. ) अरे याज्ञवल्क्यशिष्या, तुला धनुष्य कशाला पाहिजे ? तूं पद्मासनाचाच आश्रय कर. ( पुन्हा हास्यपूर्वक निंदायुक्त कांहीं बोलतो. )

श्लोक

घाला स्वकंठीं कमलाक्षमाला ॥
ही युद्धवांछा धरतां कशाला ॥
आहां तुह्मी श्रोत्रिय भूप सारे ॥
ते अन्य जे जिंकिति खड्गमारें ॥ ३७ ॥

तर मला तुझ्याशीं काय कर्तव्य आहे ? पण अगोदर ह्या क्षत्रियांच्या दोन ठिणग्या आहेत ह्या विझवितों.

( पुन्हा पडद्यांत शब्द होतो. ) अरे जमदग्निपुत्रा, जमदग्नि ऋषी शांतस्वभावाचा असतां तूं त्याचा पुत्र असूनही शांतिरहित कसा झालास ?

प०— ( मनांत ह्मणतो. ) हा तर शतानंद बोलतो आहे. ( मग उघड ह्मणतो. ) अरे शतानंदा, हें शांतिनामक धन कोणत्या पित्यापासून तुला मिळालें; गौतमापासून किंवा इंद्रापासून ?

( पुन्हा पडद्यांत शब्द होतो. ) हा पाप्या निजजननीचा कंठ छेद करणाऱ्या कुलांगारा, अरे आमच्या आंगिरस कुळाची केवढी तपश्चर्या ? असें असून ही त्या कुळाला कलंक लावतोस.

प०— अरे पातक्या, कुलदूषका जारिणीपुत्रा, कशीरे भार्गव कुळाच्या पुढें आपल्या तपश्चर्येची प्रतिष्ठा दाखवितोस? लाज नाहींरे वाटत तुला.

रा०— हे भगवन्, भृगुकुल आणि आंगिरसकुल हीं दोन्ही सर्व लोकांत प्रख्यात आहेत; आणि आपण शिवशिष्य आहां, तेव्हां आपलें तप अधिक आहे, ह्यासाठीं कांहीं विनंती करतों.

## श्लोक

हे बाण बाणासन हें कुठार
ही वक्रवाणी भ्रुकुटीविकार ॥
हे क्षत्रियांचे सगळे प्रकार
तुह्मा मुनींतें तर निंद्य फार ॥३८॥

तुह्मीं मना शांत तपें करावें । [1]सितोपलांचे मणिहार ल्यावे ॥
कुशांस दंडास कमंडलूस। घ्यावें करावा [2]उटजांत वास ॥३९॥

(पुन्हा मोठ्या नम्रतेनें ह्मणतो.) आपणच हा विचार करा, कीं

## आर्या

कोठें अशुभ परश्वध कोठें हें कुल पवित्र विख्यात ॥
कोठें मोठें धनु हें कोठें स्वस्थ स्वभाव हा शांत ॥४०॥
कोठें मोठ्या समरीं सुटणारी ही क[3]राल [4]इषुमाला ॥
कोठें कुशनवपल्लव पुष्पें अथवा तशी छ[5]दनशाला ॥४१॥

प०— कसा, दुसऱ्याप्रमाणें मला ही केवळ मुनि असेंच मानतोस? पण मी जमदग्निचा पुत्र आहें बरें.

---

१ स्फटिकांचे. २ पर्ण कुटीकेंत ३ भयंकर. ४ बाणपंक्ति. ५ पर्णशाल

श्लोक

ज्या हे क्षत्रियपुत्रकंठ चिरतां वाहूं च जी लागली
रक्ताची त[1]टिनी तिच्या च मग मी स्नानास गेलों तलीं ॥
केले केंस च दर्भ मत्पितृगणा रक्तांजली अर्पितां
तोषे निंदितसे कृपायुत दिसे त्रासे हंसे तो स्वतां ॥४२॥

आतां तें कशाला पाहिजे.

श्लोक

पूर्वीं त्रिः[2]सप्तवार प्र[3]थित नृप रणीं मारले मी अपार
मारावे त्याप्रमाणें नरपति अवघे मत्त झाले च फार ॥
त्यांच्या त्या मस्तकांची सुघटित अशी काय रुद्राक्षमाला
आतां माला करून प्र[4]णति सह पहा अर्पितो भैरवाला ॥४३॥

रा० श्लोक

कोपातें त्यज हो प्रसन्न त्वदयीं ही ठेव मद्वेखरी
आयासें बहुवेळ जी मिळविली कीर्त्ति प्रतिष्ठा बरी ॥
ती कां आज गमावितोस सुचली ही बुद्धि कां घातकी
ज्याचा त्यास बरें कसा न दिसतो होणार जो घात कीं ॥४४॥

प०— कशी रें गमावीन ? ( विचार करून ह्मणतो, ) किंवा.

श्लोक

तुह्मी वाचाळ रे फार तुह्मार्शी बोलणें पुरे ॥
हिं[5]स्र बाणां तुह्मी माझ्या करा सहन सर्व रे ॥४५॥

रा०— सर्व कशाला पाहिजेत ज्यानें हरचापारोपण केलें व जो जानकीनें अर्पण केलेल्या कमलपुष्पांच्या माळेचें स्वन्हद-यीं धारण करतो आहे, तो मी एकटाच स्वन्हदयें करून सहन करीन.

---

१ नदी. २ एकवीसवेळा. ३ प्रख्यात. ४ नमस्कार ५ घातक

प०— श्लोक

तें भंगिलें चाप जुनें शिवाचें
तेणें तुझ्या गर्व मनांत नांचे ॥
तुझी कथा काय तुझ्या गुरूतें
माझ्या शरांचें भय फार होतें ॥४६॥

आर्या

दीर्घ तपें मग केला ज्याणें संतुष्ट विधि ह्मणे माग ॥
मद्बाणभयें कौशिक मागे दे विप्रतनु न नृपभोग ॥४७॥

रा०— ( मनांत ह्मणतो. ) हा आतां विश्वामित्राची ही निंदा करूं लागला; तर आतां सहन करणें हें नीट नाहीं.

( मग उघड बोलतो. ) काय बोलतोसरे ?

श्लोक

तें भंगिलें चाप जुनें शिवाचें
माझ्या मनीं गर्व ह्मणून नाचे ॥
मी काय माझ्या पण ह्या गुरूतें
तुझ्या शरांचें भय फार होतें ॥४८॥

आर्या

दीर्घ तपें मग केला ज्याणें संतुष्ट विधि ह्मणे माग ॥
त्वद्बाणभयें कौशिक मागे दे विप्रतनु न नृपभोग ॥४९॥

( पुन्हा क्षोभून ह्मणतो. ) अरे जमदग्निपुत्रा,

आर्या

तें कुलिशकठिन धनु मी केलें रे भग्न राग तुज आला ॥
करणार काय माझें तूं सिंहातें न दिक्षितो कोल्हा ॥५०॥

---

१ वज्र

नारायण देवाचें त्रिलोचनाचें धनुष्य किंवा तें ॥
माझ्या बाहुबलाच्या जाण पुढें तृणसमान जें होतें ॥५१॥

प०– ( गर्वानें ह्मणतो. ) शाबासरे क्षत्रियपुत्रा, शाबास शाबास! सूर्यापुढें काजवा जसें आपलें तेज दाखवतो, तसा तूं माझ्यापुढें आपला पराक्रम बराच दाखवतोस. काय बोलतोसरे काय बोलतोस !

रा०– हें आणखी सांगतों.

प०– चांगलें स्मरण केलेंस ?

रा०– तें कोणतें ?

प०– श्लोक

जी हालली विष्णुकराभिघातें
कंठस्थमाळा वर भृंग होते ॥
तिच्यासुगंधें अतिलुब्ध त्यांनीं
केलीच गुंजारवरूप वाणी ॥५२॥

आर्या

तच्छब्दें ज्याघोष द्विगुणित ज्याचा चहूंकडे पसरे ॥
असुरवधूतें रडवी विष्णूचें तें धनुष्य हें दुसरें ॥५३॥

रा०– आर्या

क्रीडा करी हरीच्या करकमळीं तें धनुष्य हें काय ॥
प०– हो तेंच सज्यकर घे समयीं शूरें न बोलिजे होय ॥५४॥

( राम परशुरामाच्या हातांतून तें धनुष्य घेतो. )

प०– एथें तुमच्या स्त्रिया रडतील, तर चल आतां दुसरे ठिकाणीं युद्धाला जाऊं.

ल०– ( आनंदकौतुकयुक्तहोऊन ह्मणतो. )

(स्था. १८३४)

श्लोक

शिवाच्या धनुष्यापरी भंग याचा
नहो यामुळें हस्त हा राघवाचा ॥
हळू कर्षितो चाप तें चक्रतुल्य
हरीचें कसें शोभतें जें अमूल्य ॥५५॥

( पडद्यांत शब्द होतो, कीं अहो हें कौतुक पहा. )

श्लोक

आकर्ण ओढून धनुष्य सोडी
जो बाण तो [1]विष्णुपदास फोडी ॥
जी भार्गवाची गति [2]नाकलोकीं
ती तोडिली रामशरें पहा कीं ॥५६॥

आर्या

स्वर्गस्त्रीनीं केली पुष्पांची वृष्टि तत्स्थ अलिनिकरें ॥
केलें वर्णन ज्याचें शर तो शयनार्थ [3]तूणकांत शिरे ॥५७॥

( तदनंतर राम आणि परशुराम दोघे प्रवेश करतात. )

प०– ( रामचंद्रातें न्याहाळून पाहून मनांत ह्मणतो. )

आर्या

त्रैलोक्य[4]कोकपक्षी ज्याच्या उदयें सुखी मुनिजनांचीं
मानसकमळें विकसित होतात प्रथित कीर्ति ही ज्याची ॥
तें ज्योति विश्वकारण नीलांबुजकांतिबालरूपानें
झालें परिणत दिसतें ज्याची पाहून शक्ति अनुमानें ॥५८॥

( पुन्हा विचार करून ह्मणतो. )

श्लोक

जो पूरणार्थ [5]पुरवैरिशरासनाच्या ॥
झाला च बाणमय तो परिणाम ज्याचा ॥

---

१ आकाशास २ स्वर्गलोकीं. ३ भात्यांत. ४ चक्रवाक.
५ ( पुरवैरि ) सांब

आरोपणास्तव पुन्हा घडला च त्याच्या ॥
हा बालरूप परिणाम कसा हरीचा ॥५९॥

( मग उघड बोलतो. ) वत्सा बा इकडे ये इकडे ये.

रा०– ( अधोमुख खिन्न उभा राहतो. )

प०– ( जवळ येऊन हनवटीला हात देऊन रामाचें मुख वर उचलून ह्मणतो. ) अरे खिन्न होण्याचें कारण काय ?

रा०– माझ्या हातून आपला मानभंग घडला, ह्यामुळें खेद वाटतो.

## आर्या

प०– हे देवा त्वां जो नर निजतेजें जिंकिला जरी पण तो ॥
काय न सर्व सुरांच्या मुगुटांच्या ऊर्ध्व निजपदा करतो ॥६०॥

रा०– ( हात जोडून ह्मणतो. ) हे भगवन् हें समाधानाचें भाषण आतां पुरे; परंतु मी ही अनीति केली, ह्या पापानें माझा देह मळीण झाला आहे, ह्मणून त्याला आपल्या चरणनखांचें जें किरण हेंच कोणी भागीरथीजल त्यानें धुऊन टाकतों.

## श्लोक

तीव्र केवळ च उष्णकराचें
शांत केवळ च शीतकराचें ॥
उष्ण शीत उभयात्मक जें तें
तेज वंद्यच तुझें सुखदातें ॥६१॥

( असें बोलून पायावर लोटांगण घेतो. )

प०– ( रामचंद्राला उठवून ह्मणतो. ) अरे, तूंच मुळीं सुखाचें घर, तेव्हां तुला जो आशीर्वाद द्यावा तो पुनरुक्तच होणार तथापि आमची अशी आशा आहे, कीं

आर्या

विश्वांत कीर्ति पसरो वांच हजारों [1]समा सुखें भोग ॥
त्वद्बाणभिन्न रावणमस्तक पाहून सुखि असो त्रिजग ॥६२॥

तर आतां मला जाण्याची आज्ञा दे. ( असें बोलून **परशुराम** निघून गेला. )

रा०— वत्सा **लक्ष्मणा**, **परशुराम** फार दूर गेला. चल आतां **परशुरामाच्या** वियोगानें आपलें मन खिन्न झालें आहे, तर आपल्या बंधुजनाला भेटून तो खेद दूर करूं. ( मग ते निघून गेले. )

---

१ वर्षे

चतुर्थांक समाप्त.

# अंक ५

( तदनंतर गंगा आणि यमुना पडद्याच्या बाहेर प्रवेश करतात. )

गं०— सखे यमुने, तूं खिन्न कां झाली आहेस?

य०— हे भगवति भागीरथि, खिन्न होण्याचें कारण आहे.

गं०— तें कोणतें?

य०— एक पहिलें असें, कीं माझा बंधु सुग्रीव ह्मणून आहे.

गं०— ( कौतुकयुक्त होऊन मनांत ह्मणते. ) वानरकुळांत उत्पन्न झालेला सुग्रीव हिचा बंधु कसा? ( मग विचार करून ह्मणते. ) हें योग्यच आहे; कारण ह्या दोघांचाही पिता सूर्यच आहे. ( मग उघड बोलते. ) बरें, त्या सुग्रीवाचें काय झालें?

य०— बलाढ्य आणि दुष्ट जो इंद्राचा पुत्र वाळी त्यानें त्याला मारून घरांतून घालवून दिलें, ह्मणून तो आतां कांहीं वानर घेऊन एक्या डोंगरावर राहात असतो.

गं०— बरें, हे दोघेही बंधु असून त्यांचें वैर कसें पडलें? किंवा,

### श्लोक

दोघांचा एक वस्तूच्या ठायीं जो अभिलाष तो ॥
होतोच वैरवृक्षाचा बीज हें जन सांगतो ॥ १ ॥

बरें, हें असूंदे, दुसरें काय कारण तें सांग बरें.

य०— कोणी एकेदिवशीं तपस्व्याचा वेष धारण करणारे व मूर्तिमान् मदनच काय, असे दोन तरुण पुरुष आणि एक

चंद्रमुखी स्त्री अशीं तिघें मला उतरून माझ्या दक्षिण तीरानें जाऊं लागलीं.

गं०— पुढें काय झालें.

य०— तदनंतर, त्या तिघांपैकीं जी स्त्री ती क्षणभर उभी राहून हात जोडून मला नमस्कार करून तिनें माझी प्रार्थना केली, कीं हे देवि यमुने, मी पुन्हा आपल्या कुटुंबाच्या माणसांला पाहीन, असा माझ्यावर तुझा प्रसाद असावा.

गं०— बरें, तुला कसें वाटतें?

य०— ( गंगेच्या कानांत सांगते कीं, )असें वाटतें.

गं०— छेछे, असें कधीं घडणार नाहीं. तुझ्या मनाला कांहीं तरी भ्रम झाला आहे, ह्मणून तुला भलतेंच वाटतें. ( विचार करून ह्मणते. ) किंवा प्रारब्धाची गति कोणाला समजते?

य०— जर हा वृत्तांत झाला असता, तर तुला समजल्यावांचून रहाताना. तेव्हां तूं ह्मणतेस तसेंच असेल.

गं०— हें मला कांहींच ठाऊक नाहीं. ब्रह्मलोकाहून सरस्वती आली, तिच्या समागमसुखांतच माझें मन निमग्न झालें होतें; तर चल सरयूनदी जवळच आहे; तिच्या मुखानेंच हें सर्व वर्त्तमान ऐकूं ( असें बोलून दोघीही निघण्यासाठीं तयार होतात. इतक्यांत सरयूनदी पडद्याच्या बाहेर प्रवेश करून ह्मणते.) हे देवींनों, तुह्माला मीं नमस्कार करतें.

गं०य०— हे सरयू, तुझें कल्याण असो.

गं०— (सरयूचा हात धरून ह्मणते.) सखे सरयू, तुझें अंग संतप्त कां झालें आहे?

स०— हे भगवती, तूं असें उलटें काय विचारतेस? मी तर

लज्जारूप धूलींत बुडालें आहें; तेव्हां माझा संताप कसा जाईल ?

गं०— काय असेल तें सर्व स्पष्ट सांग.

स०— श्लोक

अयोध्यापुरीं स्त्रियांचीं सहस्रें
तटीं टाकिती नित्य हीं उष्ण[1]अस्रें ॥
अशा कारणानें तनू तप्त झाली
मला दैवयोगें दशा हीच आली ॥ २ ॥

गं०— ( भिऊन विचारते बरें ), त्या स्त्रियांला रडण्याचें कारण काय ?

स०— ( गंगेच्या कानांत सांगते, कीं ) हें च कारण.

गं०— हे सर्वलोकांच्या हृदयाला आनंद करणाऱ्या हे धनुष्य-पंडिता, हे इंद्राच्या प्रियसख्या, हे रामचंद्रप्राणा!

स०— ह्या रामाबद्दल हें सर्व दुःख आहे.

( गंगा हे महाराजा दशरथा, असा आक्रोश करून मूर्छित होऊन पडते. )

य०— ( पदरानें वारा घालते, आणि ह्मणते, ) हे भगवति भागीरथि, सावध हो सावध हो. अगे ह्याच गुणांनीं हा राजा बुडाला.

गं०— ( सरयूला ह्मणते. ) सखे, हा संताप केवळ तुला एकटीला नाहीं; तर हा सर्व लोकांलाही सारखाच झाला आहे, तर आतां आपण ह्या संतापाला रामचंद्राची गोष्ट बोलून दूर करूं.

स०— ( श्वास टाकून ह्मणते. )हे भगवति भागीरथि, पाण्याचा ओलावा नाहींसा झाल्या खेरीज साळींचें शेत वाळणार नाहीं.

---

१ अश्रु.

गं०— काय असेल तें सर्व स्पष्ट सांग.

( सरयू दुःखानें स्फुंदूं लागते. )

गं०— पुरे पुरे, वणव्यानें वाळलेल्या झाडाचे खांदीवर कुऱ्हाडीचा घाय कशाला घालतेस; अथवा जें असेल तें सांग.

स०— रामचंद्राला राज्याभिषेक करण्यासाठीं दशरथराजानें निश्चय केल्यावर त्याजवळ येऊन कैकेयी प्रथमतः असें बोलली, कीं आपणास स्वर्गाचें द्वार मोकळें राहण्याकरितां राजाला प्रजापालन करणें हें जसें आवश्यक आहे तसें आपली प्रतिज्ञा पाळणें हें ही आवश्यक आहे.

गं०— ( मनांत ह्मणते. ) ह्या भाषणानेंच दुःखाची सूचना झाली. ( मग उघड बोलते. ) बरें आणखी काय कैकेयी ह्मणाली ?

## श्लोक

स०— त्वां पूर्वीं मज दोन जे वर दिले आतां मला दे च ते ॥
जावा राम वनांत रे भरत तो राजा असो भूपते ॥

गं०— ( मोठें वाईट वाटून ह्मणते. ) पुढें काय झालें ?

स०— तें ऐकून तिचें कुभाषण नृपा झाल्या मनीं यातना ॥
त्याचे पाय नमून तुष्ट ऱ्हदयें तो राम गेला वना ॥ ३ ॥

गं०— ( खिन्न होऊन ह्मणते. ) पुरे हें तुझें सांगणें. हे रघुकुला, तुझा नाश झाला.

य०— हे भगवति भागीरथि, रामचंद्र वनांत गेल्यामुळें मृग महर्षि वनदेवता इत्यादिकांस रामचंद्राचें मुखावलोकन होऊं लागलें; परंतु इतरांस मात्र तें नाहींसें झालें.

स०— हेंच खरें.

## आर्या

अस्तास चंद्र जातां केवळ ही कैरवें न मुकतात ॥
तर हीं सारीं भुवनें घोरतमःसागरांत बुडतात ॥ ४ ॥

ग०— सखे सरयू, रामचंद्रा विषयीं सीता आणि लक्ष्मण ह्यांचें मन कसें होतें तें सांग ? कारण हीं दोघें त्याच्या जवळ निरंतर असतात.

स०— त्यांची त्यावर फार भक्ति आहे.

ग० ( आनंदयुक्त होऊन मनांत ह्मणते. तर मग रामचंद्राचे बरोबर वनांत सीता आणि लक्ष्मण हीं गेलीं असें स्पष्ट झालें. ( मग उघड ह्मणते. ) हे सखे सरयू, ह्या तुझ्या भाषणानें मला आनंद वाटला; कां कीं जानकी फार लहान ह्मणून तिला क्षणभर ही वियोग सोसवणार नाहीं.

स०— तूं ह्मणतेस हेंच खरें; कां कीं रामचंद्रानें जानकीला असें सांगितलें, कीं

### आर्या

मन्मातृसेवनानें कांहीं वर्षें खुशाल लोट कशीं ॥
ऐकून वाक्य हें ती मूर्छित झालीच जानकी मृतशी ।।५।।

नंतर तिच्या सखीजनानें तिच्या डोळ्याला पाणी लावलें, थंड वारा घातला व आणखी पुष्कळ उपचार केले; परंतु ती सावध झाली नाहीं.

य०— तर मग ती पुन्हा सावध कशानें झाली ?

स० 

### आर्याअर्धा

अथवा चल शशिवदने जानकि माझ्या सवेंच विपिनांत ।।

हें रामचंद्राचें भाषण ऐकून सीता लागलीच सावध झाली.

ग०— जानकीच्या प्रेमाला हें योग्यच आहे.

य०— बरें रामलक्ष्मणांचा कांहीं संवाद झाला काय ?

स०— होय, रामचंद्रानें लक्ष्मणाला असें सांगितलें, कीं,

### श्लोक

घालीव कांहीं नयनें मिटून
निमेषसे वत्सर तूं हंसून ॥
माझ्या प्रमाणें भरतास नित्य
सेवून राहा कर शांत चित्त ॥६॥

( मग **लक्ष्मण** ही हें बोलला. )

### आर्या

त्वत्संगें चार युगें [1]यामच होतील सांगतों तुजला ॥
त्वत्संगरहित चवदा वर्षें मन्वंतरें च तीं मजला ॥७॥

गं०— बरें, कौसल्येनें **रामचंद्राला** कांहीं शिकवलें काय ?

स०— होय अरे वत्सा रामा, **सीतेला** असें अर्धं बोलते, तों च तिचे डोळे भरून आले; आणि कंठही दाटला, तरी ती असें बोलली, कीं वत्स **लक्ष्मण** रक्षण करणारा असतांना तुला **सीतेकडे** पाहाण्याची गरज नाहीं; परंतु एवढेंमात्र सांगतें, कीं **लक्ष्मण** लहान आहे, तर त्याला मात्र फार जप. कांकीं,

### श्लोकअर्धा

राज्योपभोगापेक्षां ही तूं जाला अधिक प्रिय ॥

मग **रामचंद्र** ही तिला असें ह्मणाला, कीं तरी बरें च तूं आपल्या जिवाला ही जप, असें नाहीं आणखी सांगितलेंस.

गं०— तर मग खचीत त्या दिवसापासून **रामचंद्राला** स्वाभाविक जो सुंदरपणा तोच मात्र अलंकार असेल.

स०— आणखी दुसरा ही एक होता. ज्या वेळेस **रामचंद्र कौशल्येची** जाण्याविषयीं आज्ञा घेऊं लागला त्यावेळेस **कौसल्या** रामास बोलली,

---

१ प्रहर.

श्लोक

होईल मत्स्मृति ज्याणें तें देतें मी अमोलिक ॥
असूंदे एवढें हस्तीं वत्सा रत्नांगुलीयक ॥८॥

सखे गंगे आणखी दुसरें एक तुला सांगतें; पण तूं धीर सोडूं नको.

गं०— हें पूर्वींचें सर्व ऐकलें, आणि अजून माझेविषयीं तुला भ्रांतिच आहे काय ?

स०— श्लोक

अंभोजकांतिसम कांति मुखांबुजाची
नित्य प्रसन्न दिसते च रघूत्तमाची ॥
त्याच्या शिरावर जटा वळल्या बघून
फुंदून लक्ष्मण रडे मग ओरडून ॥९॥

आर्या

सौमित्राची चर्या त्याकाळीं जी विलक्षण च झाली ॥
ती बघतां विश्वाचीं शोकें भानें निघून तीं गेलीं ॥१०॥

य०— बरें, त्या वेळेस सीतेला तिच्या संबंधी जनानें कांहीं बोध केला कीं नाहीं ?

स०— हे यमुने, तूं उलटें कसें विचारतेस ? संबंधी जनालाच सीतेनें बोध केला.

श्लोक

जावें पतीच्या सह काननांत
कुलस्त्रियांचें व्रत हें च नित्य ॥
पदांतल्या भूषणशब्दयोगें
हें काय संबंधिजनास सांगे ॥११॥

नंतर,

श्लोक

चाले राम पुढें विदेहतनया मार्गें त्वरेनें निघे
तीं आरक्तपदें तिचीं स्वजन तो सारा बिचारा बघे ॥
त्याचे लोचनवारिबिंदु गळती मुक्ताफळां सारखे
पूर्वीं शीतल उष्ण ही मग तसे म्यां तर्किले तन्मुखें ॥१२॥

गं०— हा नेत्रांतून थंड आणि कढत पाणी पडण्याचा प्रकार आनंद आणि दुःख ह्यामुळें होत असतो.

स०— संबंधीजनानें रामचंद्राला हें सांगितलें, कीं

श्लोक

आहां तुह्मीं केवल बंधु दोन
[1]विदेहकन्या तर ही लहान ॥
[2]रात्रिचरांची स्थिति दक्षिणेस
जाऊं नको तूं तर त्या दिशेस ॥१३॥

गं०— पुढें काय झालें ?

स०— दक्षिणदिशेसच राम गेला.

आर्या

सुरदुंदुभिस्वनांच्या दुप्पट गुणघोष तें धनुष्य करीं ॥
घेऊन राम गेला पौरांची नयनकमळमाळ धरी ॥१४॥

य०— देवांच्या दुंदुभींचा शब्द तेव्हां कशासाठीं झाला ?

गं०— सखे, रामचंद्र वनांत गेला, तेव्हां तो राक्षसांचा संव्हार करीलच ह्या आनंदानें देवांनीं दुंदुभी वाजविल्या. ( पुन्हा दुःखयुक्त होऊन ह्मणते. ) हे राजा दशरथा, सर्व गुण आणि संपत्ति हीं अनुकूल असून तुला एक दैव मात्र प्रतिकूळ झालें.

य०— दशरथाने रामचंद्रासारखा पुत्र तृणासारखा टाकून दि-

१ सीता २ राक्षसांची.

ला असें असतां पुनःपुनः त्याची प्रशंसा कां करतां ?

स०— शिवशिव, असें बोलूं नको.

श्लोक

कैकेयीवचनें निबद्ध नृप जो झाला पराधीनसा
ज्याच्या क्रोध तसा च मोह शिरला चित्तांत तो हा असा॥
चोरांनीं बहु मारतां कृपण हा हस्तस्थ रत्ना जसा
टाकी पुत्र तृणासमान च स्वतां प्राणास शोकें तसा ॥१५॥

य०— बरें, रामचंद्रानें वनांत जावें; आणि आपण राज्य करावें ह्याविषयीं भरताचें अनुमत होतें काय ?

स०— मातुलगृहाहून भरथ आल्यानंतर जो भरताचा आणि कैकेयीचा संवाद झाला त्यावरूनच भरताचें अनुमत होतें किंवा नव्हतें हें स्पष्ट दिसून येईल.

गं०— बरें तो कसा काय संवाद झाला ?

स०— श्लोक

कोठें तात मुला सुरेशसदनीं कां पुत्रशोकें अहा
तो त्याचा सुत कोण सांग पहिला चौघांत जो तो पहा॥
तो कोठें विपिनांत कां दशरथें आज्ञा दिली कां अशी
मद्वाक्यें तुजलाभ काय तुजला भूराज्य ही राक्षसी ॥१६॥

गं०— ( आनंदानें ह्मणते. ) वत्सा भरता, तूं रामचंद्राचा खरा बंधु आहेस.

य०— मग पुढें काय झालें ?

स०— मला तर इतकेंच माहीत आहे; परंतु त्यापुढें काय वर्त्तमान झालें तें समजण्यासाठीं माझ्या कमळाचे वनांतला एक राजहंस पक्षी मी पाठविला आहे. ( तों इतक्यांत राजहंस पक्षी येऊन ह्मणतो. ) हे देवींनों, तुह्माला मी नमस्कार करतों.

गं०स०य०– ( तिघी ही ह्मणतात. ) हे हंसा, तुझें कल्याण असो, अरे हंसा, सीता, राम, आणि लक्ष्मण ह्यांचें मार्गातील वर्तमान मुळापासून आह्माला सांग.

हं०– श्लोक

विघ्नासमान निजपौरजना निवारी
चाले पुढेंच नयसा मग ताटकारी ॥
मार्गें विभूतिसम भूमिसुता च त्याच्या
सौमित्रि ही तदनु लाभ जसा सुखाचा ॥१७॥

गं०– पुढें.

हंस– मग तीं तिघें कांहीं दूर गेल्यानंतर वाटसरु लोकांनीं त्यांला असें सांगितलें, कीं

श्लोक

पुढें मार्ग तो सारखा वालुकेचा
तृणें कोंवळीं शोभती ऊर्ध्व ज्याच्या ॥
जिचें नाम वेतस्वती ती नदी ही
पहा वाहते थंड ही दूर नाहीं ॥१८॥

आर्या

मोठें पुढें सरोवर कुमुदांनीं युक्त विमल नीरयुत
ज्यावर कलहंसांचे हंसांचे शब्द मधुर होतात ॥१९॥
ज्याची शीत छाया तो आहे वृक्ष हा पुढें जवळ
त्याच्या पुढें च ओढा ज्याचें मुक्ताफळा समान जळ ॥२०॥

गं०– असें वाटसरांनीं सांगितलें ह्मणजे वाटेचे श्रम दूर होतात.

य०– पुढें,

ह०- श्लोक.

भयाभीत पाहून सीता मृगातें
दयायुक्त झांकी स्ववस्त्रें धनूतें ॥
पतीच्या तशी आपल्या कर्णभागीं
यवाच्या धरी अंकुरा सुंदरांगी ॥२१॥

दुसरेंही.

श्लोक

ती चक्रवाकी पुलिनीं नद्यांच्या
तशी तटाकीं न सरोवरांच्या ॥
टाकीं स्वकांतास ह्मणून शीता
संतोषली कांतवियोगभीता ॥२२॥

गं०- दीनांवर अशी कृपा करणारीच माझी जानकी आहे. ( पुन्हा प्रेमयुक्त ह्मणते. ) अरे हंसा, बरें, सीता, राम, आणि लक्ष्मण ह्याचें मन पांथनीतीला अनुसरलें होतें काय?

हं०- पांथांची नीति ती कशी काय असते?

श्लोक

गं०- जो पर्यंत न ऊन तीक्ष्ण पडलें तों मार्ग उल्लंघणें
विश्रांतिस्तव राहणें मग पुन्हा तें मंदतां चालणें ॥
मार्गीं सूर्यविकासि [1]कंज मिटतां तेथें पुन्हा थांबणें
पांथाला सुखदायक प्रतिदिनीं हीं वर्णिलीं लक्षणें ॥२३॥

हं०- हे भागीरथी, ह्या नित्य प्रवास करणाऱ्यांची अशीच व्यवस्था कशी राहील?

गं०- शिवशिव, माझी जानकी तर फार सुकुमार, तेव्हां ति-

१ कमळ

ला ऊन फार लागलें असेल.

हं०— हे भागिरथी, तूं भिऊं नको.

आर्या

ऊन्ह जरी तीव्र पडे पण सीता ताप पावली नाहीं ॥

गं०— ( कौतुकानें पुसते. ) कां बरें ?

हं०— कुवलयनीलपतीच्या अंगातें निर्निमेष ती पाही ॥२४॥

गं०— सीतेनें असें करून आपलाच जीव वांचविला, असें नाहीं, तर आह्मालाही वांचविलें.

स०— आणि आपलें व आमचें रक्षण ही केलें.

हं०— श्लोक

सूर्याच्या किरणें करून पृथिवी संतप्त झाली असे
झाला दुर्गम मार्ग नीच जन ही चालावया भीतसे ॥
भूमीचे प्रियपादभूषित असे जे भाग ते जानकी
प्रेमें आर्द्रमनेंच धैर्ययुत जी ती शीत मानी न कीं ॥२५॥

य०— अरे बाबा दिनकरा, कसारे तूं आपल्या कुटुंबाविषयीं ही निर्दय झालास !

स०— अगे पृथिवी, तूं आपल्या कन्येविषयीं ही कशी निर्दय झालीस!

गं०— ( हंसून ह्मणते. ) हे सरयू, हे यमुने, तुह्मीं पृथिवीवर आणि सूर्यावर रागें भरू नका; कांकीं हीं पंचमहाभूतें ममताशून्यच आहेत.

हं० श्लोक

जेव्हां जेव्हां श्रांत होई श्रमानें
तेव्हां तेव्हां आपल्या वल्कलानें ॥
वारा घाली राम सीतामुखाला
तेणें सारा धर्म वाळून गेला ॥२६॥

श्लोक

जेव्हां जेव्हां श्रांत होई स्वकांत
तेव्हां तेव्हां जानकीचा दगंत ॥
स्नेहें लक्षी तन्मुखातें ह्मणून
घेई त्याचा क्लेश सारा हरून ॥२७॥

गं०— परस्परांचे श्रम हारक हें सीतारामांचें चरित्र विचित्र आहे.

य०— मग पुढें?

हं०— तदनंतर,

श्लोक.

विश्रांतीचें स्थळ जवळ तें शीघ्र पाहून जाते
आधीं सीता मग पतिकरीं चाप जें त्यास घेते ॥
मार्गामध्यें अनुजसहित श्रांत जो कांत झाला
त्याला घाली कि[1]सलयमरुत् शीतता व्हावयाला ॥२८॥

(पुन्हा कौतुकानें ह्मणतो.) हे यमुने, आणखी फारच सरस हें दुसरें तुला सांगतों, ऐक. ह्या रामलक्ष्मणांच्या

श्लोक

हातांतल्या पल्लवमारुतानें
सीता हरी तें जल जें श्रमानें ॥
कपोलभागीं पण शोकयोगें
जें लोचनीं तें हरण्यास भागे ॥२९॥

आणखी दुसरें ही,

आर्या

जागोजागीं सेवा सौमित्रीनें जपून जी केली ॥
दाशरथीची तेणें मार्गश्रमशांति तत्क्षणीं झाली ॥३०॥

---

१ कोंवळ्या पल्लवांचा वारा.

आर्या

क्षणही वियोग घडतां सौमित्राचा स्वनयन सजल करी॥
तेणें राघव त्याचा सकल श्रमजन्य खेद जलद हरी ॥३१॥

स०— बरें, हंसा, माझ्या वत्साला रघुराज्याचें उल्लंघन करण्यास किती दिवस लागले ?

हं०— हे सरयू, रघूंचें राज्य केवढें आहे, हें तुला ठाऊक नाहीं ?

आर्या

ज्यांच्या प्रतापलेशें जित सर्व नृपाळ वंदिती चरण ॥
त्यांचें चार समुद्रां पार असे राज्य हें मनीं आण ॥३२॥

ह्मांस उत्तर कोसल देशाचें उल्लंघन करण्यास चार दिवस लागले, आणि पुढें हे थोड्याच दिवसांत भागीरथी आणि यमुना ह्या दोन्ही नद्या उतरून पलीकडे गेले.

गं०— ( यमुनेला ह्मणते. ) सखे यमुने, जें मागें मला सांगीतलेंस, तें हें.

स०— आर्या

गंगेनें यमुनेनें निज लहरीकर कशास बाळगिले ॥
निज विपिनीं सीतेतें सांग नकां कर धरून आडविलें ॥३३॥

गं०य०— ( हंसून ह्मणतात. ) सखे सरयू, आह्मीं प्रत्यक्ष असतांना कशी आमच्या अपरोक्ष रागें भरल्यासारखें करतेस ?

य०— तदनंतर.

हं०— नर्मदा उतरून लवकरच गोदावरीतीरीं पोंचले.

य०— हाय हाय! तेथें रावणाची बहीण शूर्पनखा नामें एक उन्मत्त राक्षसी फिरत असते.

हं०— अति उन्मत असें ह्मटल्यास चिंता नाहीं; पण लक्ष्मणानें तिचें नाक कापलें आहे.

गं०— ( भय वाटून ह्मणते. ) हें वर्त्तमान समजल्यावर जन-

स्थानीं जें राक्षसांचें मंडळ होतें त्यानें काय केलें ?

हं०— हातांत भयंकर भाले, तरवारी, व धनुष्यें, घेऊन तें राक्षसांचें मंडळ रामावर धांवून गेलें.

गं०— पुढें ?

हं०— तदनंतर लक्ष्मणानें रामचंद्राला अशी विनंती केली कीं हे ज्येष्ठ बंधो, ही माझी.

आर्या

दशमुखभगिनीकोमलना[1]सारुधिरा पिऊन तरवार ॥
घोरनिशाचरकंठजरक्ताचें पान इछिते फार ॥३४॥

मग रामचंद्रानें लक्ष्मणाला असें सांगितलें, कीं वत्सा तूं ह्मणतोस तें खरें; परंतु स्त्रिया स्वभावसिद्ध भित्ऱ्या असतात, ह्यासाठीं तूं जानकीला सोडून जाऊं नको, त्या पर्ण शाळेंतच तरवार उपसून सावधपणानें तिचें रक्षण कर, आणि हा मी लवकरच असें अर्धेंच बोलून राक्षसमंडळावर धावून गेला, आणि त्यांत मिसळला.

गं०— ( भय वाटून ह्मणते. ) मग काय झालें ?

श्लोक

झाली जयप्राप्ति ह्मणून गर्जे
मुहूर्त मात्रें मग लक्ष्मणा जें ॥
तें हाकमारी.

स०— रामचंद्राचें मुख काय ?

हं०— छेछे,

स०— हे देवी, भागीरथी, आतां मला संभाळ, कां कीं हा हंस आतां राक्षसांचें मंडळ असें उत्तर देईल.

हं०— धनु राघवाचें.
मारून नक्तंचर आणि नाचे ॥३५॥

---

१ ( नासा ) नाक

स०— आतां माझ्या जीवांत जीव आला, जसें अगोदर कडकडीत ऊन्ह पडतें; परंतु मग पर्जन्याची वृष्टि मोठी होते, तसें हें हंसाचें भाषण आरंभीं दुःखदायक दिसून मग सुखदायक झालें.

हं०— तदनंतर.

यं०— हें रामचंद्राचें कृत्य पाहून मुनींनीं संतुष्ट होऊन रामलक्ष्मणांला पुष्कळ आशीर्वाद दिले. मग सुखानें कांहीं दिवस ते त्या गोदावरीच्या तीरींच राहिले.
तदनंतर एके दिवशीं.

श्लोक

माणिक्यरत्नांकितनेत्ररक्त
[1]वृक्षांतरीं वि[2]द्रुमशृंगयुक्त ॥
सुवर्णदेही वर मौक्तिकांचा
जडाव आला मृग या तऱ्हेचा ॥३६॥

गं०— ( मनांत ह्मणते. ) हा खचीत अनर्थाचा अंकुर उगवला. ( मग उघड ह्मणते. ) पुढें काय झालें ?

हं०— आर्या

त्यातें तो अनुसरला भ्रूजितमन्मथधनुष्य [3]नयनांत ॥
सीतेचा धनुर्विजितस्त्रीभ्रू नीलाब्जकांति मग कांत ॥३७॥
तदनंतर,

श्लोक

तो धावरे रामशरें कुरंग
हे लक्ष्मणा धांव ह्मणे [4]सुरंग ॥
तें वाक्य त्याचे श्रवणीं शिरून
गेलें च सीतामन घाबरून ॥३८॥

१ झाडीमध्यें २ (विद्रुम) पोंवळीं. ३ (नयनांत) कटाक्ष ४ चांगल्यारंगाचा

आर्या

धांवा धांवा सत्वर भावोजी घात वाटतो मोठा ॥
लक्ष्मण ह्मणे न पण तो जाच ह्मणे स्त्रीस्वाभाव तर खोटा ॥३९॥
रागें सचाप लक्ष्मण जातो तों एक भिक्षु मग आला
दे भिक्षा ह्मणतो तों सीता भिक्षेस घ्या ह्मणे त्याला ॥४०॥

गं०— मग काय झालें.

हं०— श्लोक.

होऊन निर्दय मृगीं शर राम सोडी
सौमित्रि ही त्वरित राघव मार्ग जोडी ॥
भिक्षेस ही यतिकरीं जनकात्मजा ती
अर्पी ह्मणे सुकृतयुक्त च मी स्वचित्तीं ॥४१॥

आर्या

हीं तीन एकाकाळीं कार्यें घडलीं तुह्मास जीं कथिलीं ॥
आकाशांत उभा मी होतों यास्तव मला तिन्ही दिसलीं ॥४२॥

स०— मग काय झालें ?

हं०— आर्या

कांचनहरिणशरीरीं शर शिरतां मी मिटून नयनांस ॥
आलों सत्वर तो हा सरयु तुला सांगण्यास इतिहास ॥४३॥
तर हे देवीनो, मी फार दमलों आहें, तेव्हां मला अमळसा पाण्यांत पडूं द्या.

गं०— आर्या

चिरकाळ रम्यशुचिजलविकसितपंकज सरीं च तूं नांद ॥
स्त्रीचरणनूपुरांच्या पेक्षां होऊ तुझा मधुर शब्द ॥४४॥
( हें आशीर्वादवाक्य ऐकून हंस नमस्कार करून निघून-गेला. )

गं०— हे सखे सरयु, हें सीता रामलक्ष्मणांचें वर्त्तमान ऐकून माझें मन घाबरें झालें आहे.

स०— हे भगवति गंगे, तूं घाबरूं नको, कांकीं, तूं जो हंसाला आशीर्वाद दिला आहेस त्यांत त्वां नूपुरशब्दाचा उच्चार केला, त्र्येणेंकरून मला स्मरण झालें. कोणतें ह्मणशील तर सांगतें ऐक, जेव्हां जानकी अरण्यांत जाण्याविषयीं तयार झाली, तेव्हां तिला सर्व पतिव्रता स्त्रियांत श्रेष्ठ जी वसिष्ठ पत्नी अरुंधती; ती आपल्या हातांत दोन नूपुरें घेऊन असें ह्मणाली.

## आर्या

हे रत्नजडित दोन्ही नूपुर पायांत घाल गुण यांचा ॥
दिन एक ही न व्हावा वियोग रमणीस आत्मकांताचा ॥४५॥

गं०— आतां कांहीं मला भरवसा आला; कांकीं ती माझी सखी वसिष्ठ पत्नी अरुंधती कधीं खोटें सांगावयाची नाहीं; तर चल ये, हा वृत्तांत रघुकुलाविषयीं वत्सल जो सागर त्याला सांगूं. (मग त्या जातात.) (गंगा विस्मित होऊन ह्मणते.) वा! प्रवाहाच्या शीघ्र वेगानें एका क्षणांत फार दूर आलों. पहा, हा समुद्र गोदावरी नदीशीं कांहीं भाषण करीत जवळच बसला आहे.

तदनंतर गोदावरी नदी आणि समुद्र हे पडद्याच्या बाहेर प्रवेश करतात.

सागर, (गोदावरीस ह्मणतो.) मग पुढें काय झालें?

गं०— एथें ही राहिलेल्या वृत्तांताचें वर्णन व्हावयाचें आहे काय?

य०— होय, जें हंसापासून समजलें नाहीं तें गोदावरीच्या मुखानें ऐकायाचेंच आहे.

गो०— तदनंतर.

श्लोक

जो कांचनांग मृग रामशरें निवाला
मारीच राक्षस च तो निमिषांत झाला ॥
तो भिक्षु ही [1]समणिकुंडलयुक्तकर्ण
झाला दशास्य र[2]जनीचरराज तूर्ण ॥४६॥

गं०— अरेरे, घात झाला. ( पुन्हा विचार करून ह्मणते. ) अरुंधतीनें दिलेलीं दोन नूपुरें सीतिच्या पायांत आहेत, तीं तिचें रक्षण करतील.

सा०— बरें, माझ्या सुनेला त्या राक्षसाचा स्पर्श तर झाला नाहींना ?

गो०— नाहीं झाला.

सा०— कां नाहीं झाला ?

गो०— स्पर्श न होण्याचें कारण सांगतें.

आर्या

अत्रिस्त्री अनसूया पतिव्रता जानकीशरीरास ॥
लावी उटी ह्मणे न च राक्षस तुजला करो करस्पर्श ॥४७॥
हस्तस्पर्श कराया ह्मणून रावण झटे पण उटीचा ॥
महिमा हा कीं करितां हस्त पुढें तत्क्षणीं जळे त्याचा॥४८॥

सा०— अत्रि ऋषीची पत्नी जी अनसूया तिचें हें तपसामर्थ्य केवढें बरें !

गो०— मग रावणानें तर वरुणानें कांहीं मसलत करण्यासाठीं एक नवा मेघ बोलावला होता; तो हातांत धरून तद्द्वारा जानकीला स्पर्श केलाच. मग

श्लोक

हे शूरा करुणानिधे रघुपते हे रामचंद्रा कशी
ही आतां करतोस निष्करुणसा माझी उपेक्षा अशी ॥

---

१ ( समणि ) रत्नजडित, २ रावण.

हे नानाविध ती विलाप करितां घेऊन गेला नभीं
सीतेला दशकंठ ज्यास ह्रदयीं वाटे न कांहीं च भी ॥४९॥

सा०— अगे गंगे, आमचें दैव फुटकें, पण अरुंधतीचें हीं भाषण मिथ्या होईल काय ?

ग०— छेछे.

सा०— ( खिन्न होऊन ह्मणतो. ) पुढें काय झालें ?

गो०— तदनंतर डोंगराच्या शिखरावर राहणारा पक्षिराज जटायु मार्गांत आडवा होऊन रावणाला हें बोलला.

## आर्या

शंकरशिरस्थ रेषा चंद्राची सांग कोण चोरील
तद्वत् गरुडा सन्निध सर्प कसा अमृतकलश नेईल ॥५०॥
हे दुष्टा, रामाची स्त्री सीता चोरण्यास तूं चोर ॥
झालास सिद्ध पण हा जटायुपक्षी करील तुज ठार ॥५१॥

गं०— त्या नूपुरांचाच हा गुण असावा.

सा०— ( सानंद होऊन ह्मणतो. ) मग पुढें काय झालें ?

गो०— तदनंतर.

## श्लोक

वज्रापेक्षां अतितिखट जीं त्या नखांनीं विदारी
लंकेशाची सकल तनु ती रक्त वर्षेच भारी ॥
झाली मोठी कनकमय जो दुर्दशा त्या रथाची
गेली नाहीं पण जनकजालाभवांछा मनाची ॥५२॥

सा०— पुढें काय ?

गो०— मग त्या जटायूचीं तिखट नखें आणि रावणाची तरवार ह्यांच्या भयंकर युद्धप्रसंगांत रावणाच्या हस्तगत झालेली सीता भयानें घाबरली असतां

### श्लोक

सीतेचा चरणांतला निसटला रत्नाढ्य जो नूपुर
आक्रंदे करुणास्वरें मग पडे येऊन पृथ्वीवर ॥

गं०– आतां तर आह्मी निराश झालों.

गो० हे दुष्टा पळ एक तूं ठर पहा मेलास हें बोलतां
जो पक्षीश जटायु खड्गहत तो भूमीस आला स्वतां ॥५३॥

सा०– हे मुली जानकी, आतां खचीत रावणानें तुला नेली.
( असें बोलून मूर्च्छा येऊन पडतो. )

गंगा ( जवळ येऊन लुगड्याच्या पदरानें वारा घालीत घालीत ह्मणते. ) अरे रघुकुलवत्सला सागरा, सावध हो, सावध हो, ( नंतर सागर सावध होऊन ह्मणतो. ) एथें तूं केव्हां आलीस ?

गं०– नुकतीच आलें. यमुना आणि सरयू ह्या ही दोघी आल्या आहेत.

सा०– तर मग तुह्मी सर्व ही मला भेटलां, हें बरें झालें, हा मी तर शोकाच्या वेगानें मृत प्राय झालों आहें.

गं०– धैर्य सोडूं नको; कांकीं बहुत करून.

### आर्या

संपत्ति ही खळाला आल्या पण शेवटीं न सुख देती ॥
आल्या विपत्ति ही पण साधूला शेवटीं सुखद होती ॥५४॥

स०– सखे गोदावरी, बरें तें सीतेच्या पायांतलें नूपुर पडलें त्याचें पुढें काय झालें हें तुला ठाऊक आहे काय ?

गो०– होय, मला एक्या वनदेवतेनें सांगितलें कीं तें नूपुर घेऊन कोणी एक वानर ऋष्यमूक पर्वताकडे गेला.

सा०– बरें, रामचंद्राचा वृत्तांत कसा काय झाला ?

गो०– रामचंद्र सीतेच्या वियोगानें विव्हळ होऊन लक्ष्मणा-

नें जरी निवारण केलें तरी दक्षिण दिशेस गेला.

( पडद्यांत शब्द होतो. ) सखे यमुने तुझें कल्याण झालें.

य०— सुर्यांनीं टोचलेल्या माझ्या नखांला आळित्याच्या रसानें रंगविणारी ही कोण ?

( इतक्यांत तुंगभद्रा नदी पडद्याच्या बाहेर प्रवेश करून ह्मणते. ) हे नदीनाथा सागरा, तुझा जय असो, जय असो.

सा०— यमुनेचें कल्याण झालें ह्मणालीस तें कसें ?

तुं०— यमुनेचा बंधु जो सुग्रीव त्याला राज्यपदप्राप्ति झाली ह्मणून.

य०— आतां एका शरीराच्या बाजूला चंदनरसाची उटी आणि एका बाजूला सूर्याचे कडक ऊन्ह असी माझी अवस्था झाली आहे.

सा०— बरें, वाळी राज्यकरीत असतां राज्यलक्ष्मी सुग्रीवाला कशी मिळाली ?

तुं०— आतां वाळीची गोष्ट कशाला पाहिजे ?

सा०— कां बरे ?

तुं०— सीतेच्या पायांतलें जें नूपुर पडलें होतें, तें मारुतीनें रामचंद्राला दाखविलें, तेणेंकरून रामचंद्रास विश्वास आला. मग मारुतीनें सुग्रीवाची आणि रामाची मैत्री करून दिली, आणि आपण रामाचा दास होऊन त्याच्या हातून हें करविलें.

### श्लोक.

तो कांचनाचा मृग मारला जसा
वाळी शरानें वधिला क्षणें तसा ॥
रामें स्वहस्तें अभिषिक्त सत्वर
सुग्रीव केला मग वानरेश्वर ॥५५॥

रजि. १८३८

## आर्या

वधिला स्वमित्र वाळी ह्मणून रावण मनीं सशोक रडे ॥
निजकुलवरिष्ठ राघव यास्तव आदित्य मान्यतेस चढे ॥५६॥

सा०— मग पुढें काय झालें ?

तुं०— श्लोक

रामाची रमणी तुह्मी त्रिभुवनीं शोधा निघा रत्नशी
सुग्रीवें स्वमुखें करून च दिली आज्ञा कपींतें अशी ॥
तेव्हां वानर अंगदप्रमुख ही [1]वातात्मजें युक्त ते
गेले चार दिशेकडे जनकजाशोधार्थ एक्या मतें ॥५७॥

सा०— आतां माझ्या जीवांत जीव आला.

गो०— तुझ्या एकट्याच्याच जीवांत जीव आला असें नाहीं; तर ह्या सर्व जीवमात्राच्या जीवांत जीव आला.

सा०— तूं ह्मणतेस हेंच खरें, कांकीं सर्वांच्या मनाला रामचंद्राविषयीं प्रेम सारखेंच आहे. बरें ह्यावरूनच पहा, कीं. ( गोदा आणि तुंगभद्रा ह्या नद्यांला ह्मणतो. )

## श्लोक

[2]भगीरथसुता तशी र[3]विसुता च मी सागर
प्रसिद्ध सरयू जिला जवळ तें अयोध्यापुर ॥
ह्मणून जर आमचा रघुकुळाकडे पक्ष हा
तुह्मांस तर कां दया उपजते मनीं हें पहा ॥५८॥

( आकाशाकडे पाहून आश्चर्यानें ह्मणतो )

## आर्या

केले विपक्षसारे पर्वत वज्रें सपक्ष एक गिरी ॥
मैनाकाभिध तो ही बुडून माझ्या जळीं निवास करी ॥५९॥

---

१ मारुतीनें. २ भागीरथी. ३ यमुना.

हा कोण फार मोठा विंध्याचल वा हिमाद्रि वा अन्य ॥
जातो लंघून मला यास्तव दिसतो मला महा धन्य ॥ ६० ॥

तर चल बरें, हा कोण आहे हें नीट पाहूं. ( मग सर्व निघून जातात. )

पांचवा अंक समाप्त

# अंक ६

( तदनंतर राम लक्ष्मण पडद्याच्या बाहेर येतात

रा० श्लोक

सौमित्रा चल ये बसूं तरुतळीं कां सूर्य हा जाळतो
रात्रीं सूर्य कसा शशीच बघतो तारापथीं[1] खेळतो ॥
वत्सा हे तुजला कसें समजलें हा [2]एणधारी न कीं
कोठें एणविलोचना शशिमुखी प्राणप्रिया जानकी ॥ १ ॥

( पुन्हा अवलोकन करून खिन्न होऊन ह्मणतो. ) अ-रे मीं फसलों. हा तर आकाशांतला रोहिणीचा कांत चं-द्रच आहे. ( मग चंद्राला ह्मणतो. )

आर्या

हे चंद्रा कुमुदांचे बांधव विश्वप्रकाशकर आणि ॥
किरण तुझे तूं मजला कोठें ती सांग जानकी रमणी ॥ २ ॥
व्यर्थ तुला हें वदलों तूं रात्रिचर तुला मृग सहाय ॥
यास्तव रावणसम तूं चोराच्या मानसीं दया काय ॥३॥

ल०— ( मनांत ह्मणतो. ) अरे, शोकानें रामाचें मन चंचल झालें आहे, तर आतां मीं त्याला दुसरीकडे नेतों.

ल०— हे रामचंद्रा हा इकडे आपलें तोंड उघडून चकोर प-क्षी चंद्राचे किरण पितो आहे तो पहा.

रा०— ( चकोराला ह्मणतो. ) अरे चकोरा, तूं.

---

१ आकाशांत. २ रिणधारी.

### श्लोक

आणून सीतामुखदे मला तें
ज्याची प्रभा स्त्रीसह शांत चित्तें ॥
त्यालास टाकून निशाकरातें
पावीव माझें मन शांततेतें ॥४॥

ल०— आणखी इकडे शरदृतूमुळें कृश झालेली आणि चंद्राच्या किरणासारख्या लाहान लाहान लाटांनीं शोभणारी नदी आहे ती पाहा.

रा०— ( पाहून तिला ह्मणतो. ) हे नदी.

### आर्या

लाटा तुझ्या जळाच्या सीतेच्या नेत्रलहरिसम दिसती
प्रतिदिवशीं कृशतेतें सीता ही पावते तुझ्या सम ती ॥५॥
तुजला तिजला अंतर इतकें हें मात्र वाटतें मजला ॥
प्रकृतीनें शीतल तूं सीता संताप पावते अबला ॥६॥

ल०— हा इकडे प्रफुल्लित काळ्या कमळाच्या आंत भ्रमर आपल्या स्त्रीला घेऊन बसला आहे. हा पहा.

रा०— ( पाहून त्या भ्रमराला ह्मणतो. ) अरे भ्रमरा,

### श्लोक

जें कर्णशोभि नलिनद्वय नील होतें ॥
गेलीं जिची नयनकांति पिऊन त्यातें ॥
तूं जाणलेंस कमलद्वय गंधयोगें ॥
झाली प्रिये सह तुझी स्थिति त्यांत[1] रंगें ॥७॥

### आर्या

केलेस उच्च गुंजारव कर्णोत्पलयुगीं जिच्या भ्रमरा ॥
त्या माझ्या कांतेचें मुख कोठें सांग तूं च मित्र खरा ॥८॥

---

१ आनंदानें

ल०– ( मनांत भिऊन ह्मणतो. ) बरें, ह्या पक्ष्यांकडे तर राम पाहाणार नाहींना ?

रा०– ( त्यासच पाहून ह्मणतो. )अरे हा पक्षी कोण आहे ?

श्लोक

जाचें पहा ह्रदय कुंकुमरेणुरक्त
बाहेर आणि करुणापरिपूर्ण आंत ॥
कांता नदीपरतटीं करते विलाप
पाहून तीस नवळे च तिच्या समीप ॥९॥

( विचार करून ह्मणतो. ) हा खचीत आपल्या प्रियस्त्रीच्या वियोगानें चिरकाळ दुःखी हतभाग्य असा चक्रवाक पक्षी आहे.

ल०– अरेरे रामानें ह्या पक्षाकडे पाहिलें हें वाईट झालें.

रा०– ह्या चक्रवाकाला आणि मला स्त्रीवियोगदुःख समानच आहे; तेव्हां हा चक्रवाक आणि मीं सारखेच आहों; किंवा ह्याची आणि माझी बरोबरी कशी होईल ?

श्लोक

हा चंद्राचा उदय घडतां स्त्रीवियोगास भोगी
होतां मित्रोदय मग पुन्हा होतसे स्त्रीप्रसंगीं ॥
माझें गेलें अधिक शत हें चंद्रसूर्योदयांचें
नाहीं झाला पण जनकजासंग हें दैव ज्याचें ॥१०॥

ल०– हे रामचंद्रा, कळ्यांनीं भरलेल्या कमळांच्या वेलींत जाणाऱ्या ह्या कलहंसाकडे पाहा.

रा०– ( पाहून ह्मणतो. )

आर्या

निजनखकंपितकमलस्तन भोंतालीं जिचा भ्रमर करिती ॥
गुंजारव पण जागृत होईना चंद्रचरणताडित ती ॥११॥

कलहंस हा निजस्त्री नलिनीची दुर्दशा बघून मनीं ॥
दुःखित बसून तेथें पुन्हा पुन्हा ती विलोकितो नयनीं ॥१२॥
( विचार करून ह्मणतो. ) अशा पक्ष्याच्या मनांत देखील आपल्या स्त्रीविषयीं दया उत्पन्न होते, पण स्वभावाचाच निर्दय जो राम त्याला आपल्या स्त्रीची दया येत नाहीं.

ल०— ( मनांत ह्मणतो. ) ह्या रामचंद्राच्या मनांत हें सीतारूप इंद्रजाळ कसें शिरलें आहे.

( पडद्यांत ) अरे मित्रा, रत्नशेखरा, फार दिवसांनीं भेटलास.

ल०— (ऐकून ह्मणतो. ) हें काय आहे. ( पुन्हा पडद्यांत ) मित्रा, चंपकापीडा, भेटीला फार दिवस झाले खरे. मी तर चित्ररूपनामक दैत्यापाशीं इंद्रजालविद्या शिकण्यासाठीं इतके दिवस लंकेंतच राहिलों होतों.

ल०— हा वाटसरांचा संवाद आहे. ( पुन्हा पडद्यांत ) मित्र रत्नशेखरा, ती आपली इंद्रजालविद्या मला तूं दाखविशील काय ? ( पुन्हा, पडद्यांत ) मित्रा, चंपकापीडा,

## श्लोक

[1]गीर्वाण दैत्य गज [2]पन्नग किन्नरांचें ॥
गंधर्व यक्ष पितृ सिद्ध नरादिकांचें ॥
वाटेल जें चरित तूं मज तेंच सांग ॥
मी दाखवीन तुजला तर तेंच[3] सांग ॥१३॥

किंवा दुसरें कशाला पाहिजे; लंकेंतच कांहीं चमत्कारिक नवीन चरित्र पाहिलें आहे; तेंच तुला दाखवितों.

ल०— रामचंद्रा, हा तमाशा यत्न केल्याशिवाय नजरेस पडतो आहे, तर इकडे लक्ष्य दे.

रा०— ( तें ऐकून ह्मणतो. )

१ ( गीर्वाण ) देव २ ( पन्नग ) साप ३ अंगसहित

श्लोक

तुझीं चरणनूपुरें मधुर फार तीं वाजती
ह्मणूनच [1]मराल ते [2]रव करावया लाजती ॥
अशाच बघ [3]गौतमी[4]पुलिनभूमिभागांकडे
विदेहतनये तुझा प्रियच राम जेथें रडे ॥१४॥

ल०- हे रामचंद्रा, ऐथें सीता कोठें आहे, आणि गोदावरी नदी ही कोठें आहे?

रा०- ( विचार करून ह्मणतो. ) माझ्या बुद्धीला मोह झाला त्यानें मी फसलों. ( पुन्हा विचार करून ह्मणतो. ) अथवा ह्या मोहानें माझें मोठें कार्य केलें.

श्लोक

गोदावरीतीरतपोवनांत
सौमित्रिसीतायुत मी सुखांत ॥
घालीविली जीं क्षणशीं दिनें तीं
झालीं पुन्हा आज दिनेंच चित्तीं ॥ १५ ॥

( पुन्हा मोठ्या आशेनें ह्मणतो. ) बरें, पुन्हा असें घडेल काय?

आर्या

वचनामृतें तिचीं तीं मीं कर्णांनीं पिईन काय पुन्हा ॥
जीं गोदेच्या तीरीं देती माझ्या अपूर्व सौख्य मना ॥१६॥

( पडद्यांत ) तुला सुख देण्यासाठीं

आर्या

गोदानदी तुझ्यावर तरंगचामर तसें धवल कमल ॥
हें छत्र स्वकरानें धरते रघुकुलनिशाकरा विमल ॥ १७ ॥

रा०- ( आनंदानें ह्मणतो. ) हें माझ्या प्रियेचेंच भाषण खरें; कांकीं,

---

[1] हंस. [2] शब्द. [3] ( गौतमी ) गोदावरी [4] ( पुलिन ) तीर

### श्लोक

जिची परिमिताक्षरा सरस कोमला वैखरी
भयें बहुत सुंदर प्रगट होतसे [1]माधुरी ॥
जसा मधुर पंचम स्वर सुखार्थ वीणा करी
तसा स्वर इचा ह्मणून जनकात्मजा ही खरी ॥ १८ ॥

बरें, ही माझी प्रिया पुन्हा कशी आली?

( पाहून ह्मणतो. ) जसें चांदणें दिसून चंद्र दिसू नये; तसें प्रियेचें भाषण ऐकू आलें; परंतु प्रिया कोठें दिसत नाहीं.

( तदनंतर जानकी पडद्याच्या बाहेर प्रवेश करते. )

रा०– ( मोठ्या त्वरेनें प्राण प्रिया आली ह्मणून तीजवळ जाण्यास इच्छितो. )

ल०– ( रामचंद्राचा हात धरून ह्मणतो. ) हे रामचंद्रा, इतकी त्वरा कां? ही खरोखरी सीता नव्हे, तर हा गारोड्याचा खेळ चालला आहे.

रा०– ( नीट पाहून ह्मणतो. ) अरे, हें ठिकाण कोणतें आहे? कांकीं,

### आर्या

एकया करें धरी ही अशोकशाखेस अन्य करकमळें ॥
सूर्योष्णतप्त कोमल गालातें झांकिते कुदैवबळें ॥ १९ ॥
कांचीरहितनितंबा वर वेणी लोळते तसें नयनीं ॥
अश्रूदक बहु भरलें बघतां इजला शिरे च दुःख मनीं ॥ २० ॥

( पुन्हा न्याहाळून पाहून ह्मणतो. ) अरे, अशोकवृक्षाच्या खांदीला धरून ही निजली आहे.

---

1 माधुर्य

## श्लोक

इंदीवराची दिसते कळी जशी
विलोचनें हीं दिसती जिचीं तशीं ॥
ही मल्लिका[1]मित्र च अंगसंस्थिति
शैथिल्यभावाप्रत पावली च ती ॥ २१ ॥

( पुन्हा विचार करून ह्मणतो. ) खचीत कांहीं तरी शुभसूचक इला स्वप्न पडलें आहे असें वाटतें, कांकीं,

## आर्या

पोंळ्यांशीं समकांति स्फुरतो अधरोष्ठ भाषणासहित ॥
आंनदाश्रुचे ही गळती मुक्ताफळांसदृश [2]पृषत ॥ २२ ॥

सी०– ( डोळे उघडून जागी होऊन ह्मणते. ) शिवशिव, माझा जीव ठिकाणावर नाहीं. कांकीं, **गोदावरी** कोठें आणि नीलकमलासारखा श्यामकांति **राम** कोठें, आणि लंका कोठें. अरेरे! एक **राम** मात्र जीचें जीवित, अशी जी मी **सीता** ती मात्र आहे. ( असें बोलून मुर्छित पडते. )

रा०– ( पृथिवीला ह्मणतो. ) हे वसुधे,

## आर्या

सीताख्य रत्न गर्भीं झालें निष्पन्न या मुळें तुजला ॥
ह्मणतात रत्नगर्भा हें सार्थक नाम वाटतें मजला ॥ २३ ॥
लोळे मांडीवर ती पाहून तिला किमर्थ झालीस ॥
नाहीं दुभंग योग्य च हें तूं सर्वंसहा च आहेस ॥ २४ ॥

तर आतां ह्या **सीते**ला सावध करण्याविषयीं एकदां पृथिवीचीच प्रार्थना करावी. ( पुन्हा ह्मणतो. ) प्रार्थना करून फळ काय ?

---

१ मोगऱ्याची वेल २ बिंदु

## आर्या

निजकन्या ही सीता पण तिजला [1]मेदिनी न बोधील ॥
निजबालकीं हि करुणा कठिनप्रकृतीस काय निपजेल ॥२५॥
तर आतां ह्या अशोक वृक्षाची प्रार्थना करावी.

## श्लोक

अशोकाच्या वृक्षा जनक तनया ही [2]तव सखी
दयाळो तूं आतां निजरस[3]निषेकें कर सुखी ॥
इला तन्नेत्रांच्या घनसलिलसेकें प्रतिदिनीं
अळें होतें पूर्ण स्मरसि न तुझें कां निजमनीं ॥ २६ ॥

अरे, हा अशोक वृक्ष तर ऐकतच नाहीं, तस्मात हा माजोरी आहे असो, बरें सीतेच्या सख्या ही एथें कोणी दिसत नाहींत. ( इतक्यांत त्रिजटा राक्षसी पडद्या बाहेर येऊन ह्मणते. ) हे जानकी सावध हो.

सी०— ( सावध होऊन ह्मणते. ) वा ! माझी सखी त्रिजटा राक्षसी एथें आली आहे !

त्रि०— सीते ह्या तुझ्या मुखचर्येवरून मला असें वाटतें, कीं तुला कांहीं तरी चांगलें स्वप्न पडलें आहे.

सी०— हे त्रिजटे मीं स्वप्न असें पाहिलें, कीं कोणी एक सुवासिनी स्त्री येऊन ती आपल्या एक्या हातांत पांढरें छत्र आणि एक्या हातांत पांढरी चौरी घेऊन रामचंद्राची सेवा करीत होती.

त्रि०— तर हें स्वप्न शुभसूचक आहे.

सी०— सखे त्रिजटे, तूं ह्मणतेस तें खरें, परंतु माझें मन रात्रदिवस रामचंद्राचेंच चिंतन करतें ह्मणून असें स्वप्नांत पाहिले, तेव्हां माझा ह्या स्वप्नावर विश्वास कसा पटेल ?

---

१ पृथ्वी. २ तुझी ३ निषेकसिंपडणे

त्रि०— तूं काय हें चिंता स्वप्न मनातेस ? चिंता स्वप्न ही अचुं-बिताच्या अनुभवाविषयीं पडत नाहीं.

सी०— अचूंबित तें काय ?

त्रि०— ज्या गोष्टीचा संभव देखील नाहीं तें.

सी०— हा कांहीं नेम नाहीं ज्या गोष्टीचा संभव नसतो ती ही गोष्ट घडून येते. पहा, मला जनककन्येला रामचंद्राचा वियोग घडावा असा संभव होता काय ? आतां ह्या स्वप्ना-मुळें मला सुख होणार ते काय ? ज्या पेक्षां रामचंद्रानेंच माझी उपेक्षा केली, त्यापेक्षां ह्या जीवाची देखील मी गरज बाळगीत नाहीं.

रा०— शिवशिव, अगे प्रिये, तूं माझ्या ऱ्हदयांत असून ही माझें मन कसें आहे, हें तुला ठाऊक नाहीं काय ?

सी०— जसा शिवाच्या मुगुटावरच्या चंद्रकलेला कलंक लावावा, तशी च ही गोष्ट कीं मी रामचंद्राला दोष लावतें. तर खचीत हें माझें वर्त्तमान रामचंद्राला ठाऊकच नसेल.

रा०— आतां हें नीट बोललीस.

सी०— ( विचार करून ह्मणते. ) बरें, माझ्या पायांतलें नूपुर गळू-न पडलें होतें त्यानें तरी कसें हें माझें वर्तमान रामचंद्राला सां-गितलें नाहीं, किंवा दैव फिरलें ह्या मुळें तें ही मुकेंच झालें असेल. ( पडद्यांत शब्द झाला. ) अरे लंकेंतले लोक हो, सावध असा, कां ह्मणाल तर.

## श्लोक

हा कोट उंच पण वानर एक त्याला
लंघून शूर बलवान् नगरींत आला ॥

( हें ऐकून सगळे घाबरतात. ) ( पुन्हा पडद्यांत शब्द होतो. ) अरे लंकेंतल्या लोकानों, तुह्मी कांहीं भिऊं नका.

जो अक्षनामक कुमार दशाननाचा
हा चालला प्रबल संमुख शीघ्र त्याच्या ॥२७॥

सी०— ही भूमि आणि हें अशोकवन कां बरें कांपूं लागलें ?

त्रि०— ( विचार करून सांगते. )

श्लोक

ज्या चंद्राच्या किरणनिचयें दीप्त [1]कंदर्प झाला
जो स्पर्शायास्तव झटतसे सर्वदां त्वत्त[2]नूला ॥
तूं रामस्त्री तुज वश करायास निर्लज्ज येतो
तो लंकेचा पति जनकजे त्या मुळें कंप होतो ॥२८॥

( सीता घाबरते. ) ( तदनंतर रावण पडद्याच्या बाहेर येतो. )

( सीता रावणाकडे पाठ करून बसते. )

रा०— अगे जानकी,

श्लोक

कामज्वरें तप्त मदीय देहा
आलिंगनें तूं कर शांत पाहा ॥
हा विश्वविख्यात असून सीते
प्रार्थी तुला सेवकतुल्य गीतें ॥ २९ ॥

आर्या

ऐरावतदंताग्रीं टकरा मारून त्दृदय हें घटलें ॥
ज्याचें तो मी रावण तेणें वाईट काय तुज ह्मटलें ॥३०॥

सी०— ( न ऐकल्यासारखें करून ह्मणते. ) बरें, रामचंद्राचा मुखचंद्र माझ्या नजरेस पडेल काय ?

त्रि०— अगे हा रावण बडबड करतो इकडे मन नसलें तरी नसूंदे, पण कान तरी असूंदे.

---

१ मदन. २ तुझ्याशरीराला

राम०— शाबास त्रिजटे शाबास, कीं रावण बडबड करतो असेंच ह्मणालीस.

रा० **श्लोक**

करावा संतुष्ट त्रिनयन असा हेतु धरला
मनीं म्यां केलें हीं तप बहुत तो शंकर मला ॥
वरातें देईना वरद असतां यास्तव नऊ
शिरें केलीं छिन्न प्रथम खर खड्गें अति मऊ ॥३१॥

**श्लोक**

तोडावें दशमास तों वरद तो धांवून आला करें
माझा खड्ग धरी ह्मणे दशमुखा आतां तप[1]स्या पुरे ॥
देतों ते वर जे हवेत तुजला शीर्षें नऊ हीं दिलीं
तें एकुन नऊ शिरें लववुनीं त्याच्या पदीं अर्पिलीं ॥३२॥

**आर्या**

शिवचरणीं न नमे जें तें हें शिर दशम आज बघ नमतें ॥
माझें त्वत्पदपद्मीं यास्तव तूं वश्य हो मला सीते ॥३३॥

सी० **श्लोक**

सुगंधलोभें वर गुंजतात
ज्यांच्या सदां भृंग अहा करांत ॥
घेऊन त्या केसरमंजरीतें
तो शोभवी राम मम श्रुतीतें॥३४॥

**आर्या**

ते मत्कर्ण कसे हे फुटले नाहींत दुर्वचें याच्या ॥
अथवा असाच आहे स्वभाव विख्यात गर्भकुटिलांचा ॥३५॥

रा०— अगे जानकी, तूं एकदां प्रेमदर्शनें माझ्या कडे अवलोकन तरी कर, ह्मणजे तितक्यानेंच मी कृतकृत्य होईन.

---

१ तप

सी०— अरे चोरा, परस्त्रीशीं असें भाषण करणें ह्या हलकेपणाचें तर तुला भय नाहींच; परंतु रामाला देखील कसा भीत नाहीस.

रा०— अगे, हा राम कोणता ? जाला लोक दाशरथीराम असें ह्मणतात, तो काय ? ( हंसून ह्मणतो. )

श्लोक

ज्याणें खड्ग करीं धरून वश हें त्रैलोक्य केलें बरें
त्याचें काय करील काम असला तो वीर्यवान् ही शरें ॥
हे सीते मजला त्वदर्थ इषुनीं मारो सुखें राम तो
जाऊ प्राण परंतु आज मजला आलिंग हें मागतों ॥३६॥

सी०— (तोच श्लोक ह्मणून ह्मणते. ) बोललास हें मात्र खरें.

रा०— ( मनांत ह्मणतो. ) बरें, मी बोलतांना चुकलों काय ? ( मग राम आणि काम हीं पदें बदलून तोच श्लोक पुन्हा ह्मणूनबोलतो. ) अगे जानकी, माझ्याकडे एकदां तरी प्रेमानें पहा.

सी०— आर्याअर्धी

हे लंकेशा तुजला सत्य विलोकील जानकी तेव्हां ॥

रा०— ( मोठ्या आशेनें ह्मणतो. ) अगे जानकी, बरें तूं केव्हां माझ्या कडे पाहाणार आहेस ती वेळ तरी मला सांग मी ह्मणशील तर,

श्लोक

[1]मंदोदरीला हि परित्यजीन
सोडीन राज्यास पदीं नमेन ॥
तुझ्या कशाला बहु जल्पनाही ॥
त्वदर्थ तोडीन शिरेंहि दाही ॥३७॥

---

१ रावणाचीस्त्री.

सी० आर्या अर्धी

खद्योताच्या तेजें पावेल विकास पद्मिनी जेव्हां ॥३८॥

रा०– ( रागानें ह्मणतो. ) हा दुष्टे, सूर्य आणि काजवा ह्यांचें जें अंतर तेंच रामरावणांचें अंतर असें ह्मणतेस काय ? तर आतां तुला ठार मारतों. ( असें बोलून तरवार उपसतो. )

राम०– ( करुणा येऊन ह्मणतो. )

आर्या

हा जानकि काय तुझी आतां करणार हा दशा अधम ॥
( पुन्हा विचार करून ह्मणतो. )
तें दैव जळो जाचा दारुण हा होतसे च परिणाम ॥३९॥
( पुन्हा क्रोधानें ह्मणतो. )
हा दुष्टा राक्षसकुलनीचा मेलास तूं असें जाण ॥
( पुन्हा घाबरेपणानें ह्मणतो. )
बा सौमित्रा सत्वर हा च समय जा धनुष्य तूं आण॥४०॥

ल०– हे आर्य, हा गारोड्याचा खेळ पाहून व्यर्थ कां भ्रमांत पडतोस.

रा०– अगे जानकी हा माझा उपसलेला खड्ग कृष्ण सर्पच आहे. तुला हा डसणार, तर आतां तरी मला आलिंगन देण्याचें कबूल कर.

सी० श्लोक

आतां आग्रह सोड हा निशिचरा कां व्यर्थ हीं भाषणें
न स्पर्शेल कधीं च जाण तिसरा कंठास माझ्या [1]पणें ॥
एक स्पर्श करील राम कर जो नीलांबुजश्याम तो
किंवा खड्ग तुझा दयारहित हा स्पर्शावया इछितो ॥४१॥

रा०– आतां फुकट वेळ घालिवण्यांत हांशील नाहीं, तर आतां

१ प्रतिज्ञेनें.

च ह्या सीतेच्या कंठरुधिराचा नैवेद्य कालीका देवीला समर्पण करावा. ( असें बोलून तरवारीच्या धारेवर हात फिरवितो. )

राम०– शिव शिव;

श्लोक

धाता निर्दय काय हो पसरला अंधेर कीं सागरीं
गेलें विश्व बुडून अन्य युग हें आलें कसें अंतरीं ॥
जेथें [1]नीलपयोजहार च वसे त्या जानकीच्या अहा
कंठीं रावण खड्ग हा पडतसे आश्चर्य मोठें पहा ॥४२॥

( पुन्हा विचार करून ह्मणतो. ) शिव शिव, मला असें वाटतें, कीं

आर्या

चंद्रतनूतें डसतो दंतानीं दुष्ट राहु खड्ग न हा ॥
नवचंदनवल्लीतें दावानल जाळितो च काय अहा ॥४३॥
उन्मत्त तुडवितो कीं कमळाची माळ वा समूळ गज ॥
उपटी कमळलतेतें निजशुंडाग्रें करून निर्लज्ज ॥४४॥

सी० आर्या

मौक्तिकचूर्णसम तुझें धाराजळ शीत तूं मला शांत ॥
कर खड्गा रामाचा विरहानल जाळितो च त्त्हदयांत ॥४४॥

रा०– अरे, कोण आहेरे? लवकर कपालपात्र माझ्या हातीं आणून दे, ह्मणजे सीतेचें कंठरक्त त्यामध्यें धरतों. ( असें बोलून हातपसरतो. इतक्यांत त्याच्या हातांत शिर येऊन पडतें. ) वा! हें कपालमात्र माझ्या हातीं कोणी आणून दिलें. ( पाहून आश्चर्यानें ह्मणतो ) अरे, हें कपालपात्र नव्हे; हें मुरगळून उपटलेलें कोणाचें तरी शिर आहे. ( वि-

---

१ निळ्या कमळाची माळ.

चार करून ह्मणतो. ) अरे, हें कोणाचें बरें शिर असावें ? खचीत माझ्या अक्षनामक पुत्राचेंच हें शिर आहे. ( असें ह्मणून मूर्छितहोऊन पडतो. )

त्रि०— अरे, लंकेश्वरा, सावध हो.

रा०— ( सावध होऊन ह्मणतो. ) अरे, त्या दुष्ट वानराचेंच हें कृत्य. तर आतां अगोदर त्याचाच प्राण घ्यावा. ( असें बोलून निघून जातो. )

रामलक्ष्मण ( आनंदानें ह्मणतात. ) वा, काय हा कथा संदर्भ जुळला आहे. ( त्रिजटा सीतेला आलिंगन करून ह्मणते. ) सखे जानकी, तुझें पुण्य मोठें ह्मणून जगलीस.

सी०— पाप मोठें असें ह्मण.

त्रि०— कां बरें ?

सी०— रामचंद्राच्या वियोगाग्नीला शांत करणारी जी तरवारींची धार तिनें माझी उपेक्षा केली; तेव्हां हें पाप कसें नव्हे. हा जीव तरी कशाला पाहिजे. तूं आतां लांकडें रचून मोठा अग्नि प्रदीप्त कर, ह्मणजे त्या अग्नीमध्यें हीं माझीं अंगें शांत होतील.

त्रि०— शिवशिव ! अगे असें बोलूं नको, लवकरच तुझा अंगांचा.

## आर्या

[1]चंद्रप्रभासुरंजित[2]मरकतपाषाण तत्स[3]दृशशील
चंदनरसलिप्त अशा रामोरीं ताप शांत करशील ॥४६॥

सी०— सखे त्रिजटे, हे आतां समजुतीचें बोलणे पुरे, खरोखरीच

---

१ चांदण्यानें चकचकणारा. २ पाचूचा खडा. ३ त्यासारखा आहे स्वभाव ज्याचा

मीं अग्निप्रवेशाचा निश्चय केला आहे, तर तूं एक अग्नी-
चा निखारा घेऊन ये.

रा०— हर ! हर ! कशी बरें, वाघाच्या तोंडांतून सुटलेली हर-
णी पारध्याच्या जाळ्यांत सांपडावी अशी सीतेची गत झा-
ली.

त्रि०— ( जाऊन आल्यासारखें करून ह्मणते. ) सखे सीते, ए-
थें अग्नि मिळणें कठीण आहे.

रा०— ( आनंदानें ह्मणतो. ) शाबास, त्रिजटे आज रामाचे
प्राण तूं वांचविले.

सी०— ( अशोकवृक्षाला ह्मणते. )

## श्लोक

अशोकाच्या वृक्षा सदय कर चित्तास मजला
उदारत्वें दे रे द[1]हनकणिका एक विमला ॥
वियोगाच्या तापास्तव किसलयाच्या च कपटें
न कीं अग्निज्वाला प्रकट करिशी तूं वद हटें ॥४७॥

( पाहून आनंदानें ह्मणते. ) सखे त्रिजटे, हा अशोकाच्या
झाडावरून एक अग्नीचा निखारा पडला. ( असें बोलून ज-
वळ जाऊन तो घेण्यास इछिते. )

रा०— अरे, कसा अशोक ही मला शोकदायक झाला !

ल०— हे आर्य, झाडाच्या शेंड्यावरून विस्तव पडणें हें मला
खरें वाटत नाहीं.

रा०— आर्याअर्धी

दुर्दैवें रामाच्या वत्सा घडणार काय बा नाहीं ॥

( सीता तो निखारा हातांत उचलून घेते. )

---

१ अग्नीची ठिणगी.

श्लोक

सीताकराब्जीं अरुणाब्जकोरका
समान तूं शीतल हो च पावका ॥
तुला असें हें घडणें कठीणरे
तूं कृष्णवर्त्मा अससीच हें खरें ॥ ४८ ॥

सी०— काय हो माझ्या पातकानें हा अग्नि ही शांत झाला. (मग न्याहाळून पाहून आश्चर्यानें ह्मणते.) अगे त्रिजटे, हा निखारा नव्हे तर हें माणिक आहे.

त्रि०— अगे सीते, पुण्यवानांला अग्नि ही रत्न होतें; अशी जी ह्मण आहे ती आज खरी झाली.

सी०— (पुन्हा पाहून ह्मणते.) वा! ही तर रत्नमुद्रिका आहे ही एथें कशी आली?

श्लोक

जी शैशवावधि मनोरम रामचंद्र
हस्तांगुली दृढ धरी सुभगा सुवृत्ता ॥
सीता च काय दुसरी मणिमुद्रिका ही
लंकापुरींत शिरली रघुनाथमुक्ता ॥ ४९ ॥

(पुन्हा मोठ्या सत्कारानें त्या मुद्रिकेवर आपलीं कोमळ बोटें फिरवून ह्मणते.) अगे मुद्रिके, बरें, रामलक्ष्मण खुशाल आहेत ना?

(तदनंतर, हनुमान् पडद्याच्या बाहेर येऊन ह्मणतो.) हे देवि, राम लक्ष्मण खुशाल आहेत बरें.

सी०— अरे बाबा, तूं कोण आहेस?

ह०— आर्या

तारापतिसेवक मी रामाचा दूत पुत्र पवनाचा ॥
राक्षस अपार वधिले म्यां केला ध्वंस रावणवनाचा ॥५०॥

---

१ (कोरक) कळा २ लाहानपणापासून. ३ नाश

झाला वधार्थ रावण तयार सीते तुझ्या मधां जेव्हां ॥
तत्पुत्र अक्षनामक त्याचें शिर तत्करीं दिलें तेव्हां ॥ ५१ ॥

रा०— माझें प्रारब्ध चांगलें ह्मणून मारुतीनें हें कृत्य केलें.

ल०— ( हंसून ह्मणतो. ) वा हें [1]संविधान किती चमत्कारिक आहे ?

सी०— अरे हनुमंता, तारापति जो ह्मणालास तो कोण बरें ?

ह०— श्लोक

वालीनामक शौर्यराशि कपि जो प्रख्यात त्याचा असे
वैरी भास्करपुत्र रामचरणां सप्रेम सेवीतसे ॥
सुग्रीवाख्य कपीश्वर प्रथित जो तो जाण तारापती
किष्किंधेंत वसे समस्त कपि ते त्याचीं पदें सेविती ॥ ५२ ॥

सी०— बरें, रामचंद्र मनुष्य आणि सुग्रीव वानर, तेव्हां ह्यांचें सख्य कोणी करून दिलें ?

ह०— श्रीरामचंद्राच्या बाणानेंच उभयतांचें सख्य करून दिलें

श्लोक

श्रीरामबाणें वधिला च वाळी
त्याची स्थिति [2]स्वर्वनितांत केली ॥
तारा तसें वानरराज्य सारें ॥
सुग्रीव मित्रास दिलें विचारें ॥ ५३ ॥

सी०— बरें, हतभाग्य जी मी तिच्या शोकानें रामचंद्र कांहीं अशक्त झाला आहे काय ?

ह०— कांहीं असें कां ह्मणतेस ? आतां ह्मणशील तर

आर्या

तो कृष्णपक्षशशिसा प्रतिदिवशीं होतसे कृश च राम.

सी०— शिवशिव.

---

१ संबंध २ स्वर्गाच्या स्त्रियांत

ह०— शत्रुक्षयकरणारें देहीं त्याच्या वसे विपुल धाम ॥ ५४ ॥

सी०— आतां थोडा जीवांत जीव आला.

ह०— हे देवी सीते, राम प्रभूनें जें तुला सांगितलें आहे, तें ऐक.

### श्लोक

मला चंद्र ही सूर्यसा ताप देतो
जलें पूर्ण ही मेघ [1]दावाग्नि होतो ॥
नदी वात ही सर्पफू[2]त्कारतुल्य
लता मोगऱ्याची जसें बाणशल्य ॥ ५५ ॥

### आर्या

कुवलयवन हें भाले होती करितात विव्हळ प्राण ॥
झालें तुझ्या वियोगें मजला विपरीत विश्व हें जाण ॥५६॥

### आर्या

कोणाला सांगावें हें दुःसह दुःख कोण नाशील ॥
माहीत काय इतरां अन्योन्य प्रेम आणि समशील॥५७॥
जाणत होतें माझें मन एक परंतु तें तुझ्या मागें ॥
आलें रमलें एथें यास्तव मजवर नको भरूं रागें ॥५८॥

सी०— ( तें ऐकून लाजते. )

त्रि०—सखे सीते, तूं ही कांहीं रामचंद्राला उलट निरोप सांग, आणि कांहीं तरी खूणदे.

सी०— अरे हनूमंता, हा माझा उलट निरोप रामचंद्राला सांग.

### श्लोक.

ही वाहते संतत अश्रुधार ॥
तेणें असे व्याकुळ दृष्टि फार ॥

---

१ अरण्यांतील अग्नि २ सापाच्यां फुसकाऱ्याप्रमाणें

तुझ्या मुखेंदूस परंतु इच्छी
प्राशावया जेवि जळास मच्छी ॥ ५९ ॥

( मग चूडारत्न काढून हनूमंताच्या हातांत देते, आणि त्या चूडारत्नाला ह्मणते. )

आर्या

चूडारत्ना तुजला रात्रिचर दृष्टिदोष हा झाला ॥
पण रामचंद्रतीर्थीं स्नानानें दूर कर च तूं त्याला ॥६०॥

ह०– हे देवि, माझ्या मनाला रामचंद्राचें चरणदर्शन घेण्याची त्वरा फार झाली आहे, तर मला जाण्याविषयीं आज्ञा असावी.

सी०– ( डोळ्यास पाणी आणते, आणि ह्मणते. ) अरे बाबा हनूमंता, आतां तूं गेलास ह्मणजे पुन्हा रामचंद्राचें वर्तमान मला कोण सांगेल ?

ह०– हे देवि, बरें स्मरण केलेंस; मी जेव्हां इकडे आलों तेव्हां रामचंद्रानें मला असें सांगितलें कीं, तूं जानकीला हें सांग.

श्लोक

आतां हा हनुमान् तुला म[1]मकथा सांगेल हें प्रार्थितों.
कांहीं काळ धरून धीर न रडे मीं सत्य हें सांगतों ॥
कीं आतां दुसरा नको मम कथा सांगावयातें तुला
र[2]क्षःस्त्रीरुदितें च लक्ष्मणधनुष्टंकार सांगो मला ॥ ६१ ॥

( पड्यांत )

श्लोक

दुष्टा अरे वानर जातिनीचा
आला पहा बंधु वडील त्याचा ॥

---

१ माझी २ ( रक्ष ) राक्षस

त्या रावणाच्या प्रिय अक्षपुत्रा
मारून कोठें पळशी अमित्रा ॥ ६२ ॥

आर्या

रावणराजाज्ञेनें हस्तीं शरचाप शीघ्र घेऊन ॥
हा मे[1]घनाद आला तुजला मारावयास नेमून ॥ ६३ ॥

ह०— हे देवि, ज्या कार्याला आलों, तें कार्य झालें, आतां व्यर्थ वेळ घालिवण्यांत हांशील नाहीं तर मी आतां निरोप मागतों, आणि हा नमस्कार करतों.

सी०— अरे वायुपुत्रा, ह्या राक्षसपुरींतून आणि समुद्रावरून निर्विघ्न जा.

ह०— हा देवीचा प्रसाद शिरसा मान्यकेला. ( असें बोलून निघून जातो. )

सी०— सखे त्रिजटे, तूं आकाशांत उभीराहून ह्या वायुपुत्राचें वर्तमान काय होतें तें पहा.

त्रि०— बरें आहे. ( असें बोलून ती पाहात बसते. )

( पडद्यांत )

आर्या

इंद्रजितें मुक्त असे जे शर ते झेलिले पवनतनयें ॥
( सर्वही आनंद पावतात. ) ( पुन्हा पडद्यांत )
बांधून त्यास त्याचें पेटविलें पुच्छ राक्षसें अनयें ॥ ६४ ॥
( सर्वही खिन्न होतात. ) ( पुन्हा पडद्यांत )
त्याणें निज उड्डाणें लंकापुर जाळिलें क्षणांत पहा ॥
( सर्वही आनंदखेदयुक्त होतात. ) ( पुन्हा पडद्यांत )
निजपुच्छवन्हि विझवी सागरनीरांत लेश दग्ध न हा ॥ ६५ ॥
( सर्वही आनंद पावतात. ) ( पुन्हा पडद्यांत )
हें तर फारच अद्भुत झालें. पहा, हा मारुति

---

१ इंद्रजित

### श्लोक

चढून [1]वेलाचलशृंगशीर्षी
उडून आकाशतलास कर्षी ॥
वेगें उलंघून पयोनिधीला
पलीकडे हा निमिषांत गेला ॥६६॥

सी०— ( पडद्याकडे पाहून ह्मणते. ) सखे त्रिजटे खालीं उतरलीस का? तूं चांगलें वर्त्तमान सांगितलेंस ह्मणून तुला आतां मी कडकडून भेटतें.

( असें बोलून निघून जाते. )

रा०— हे प्रिये, मला येऊं दे अंमळ थांब.

ल०— हे आर्य, हा गारोड्यानें लंकेतला खेळ दाखविला. त्या खेळांतली सीता पाहून पुन्हा पुन्हा भ्रमांत काय पडतोस?

रा०— तर फार चांगली गोष्ट झाली, कीं मारुती येण्यापूर्वींच त्याचें चरित्र आपणाला समजलें. ( पडद्यांत ) हे रघुनाथा, पहा.

### आर्या

ताडून दधिमुखातें म[2]धुविपिनीं फारवेळ मधु प्याला ॥
त्वत्पाददर्शनार्थी नीलांगदयुक्त वायुसुत आला ॥ ६७ ॥

रा०— वत्सा लक्ष्मणा, हें ऐकलेंस नां? तर चल हा मारुति कार्य करून आला आहे ह्याला सामोरे जाऊं. ( मग ते निघून जातात. )

### साहवा अंक समाप्त.

---

१ ( वेलाचल ) वेलाचलनामक पर्वत २ मधुनामक बागेंत

# अंक ७

( नंतर पडद्याच्या बाहेर पुलस्त्य ऋषीचा शिष्य येऊन चहूंकडे पाहून ह्मणतो.) अरे मला एथील माहीतगारी नाहीं; तर आतां बिभीषणाचा वाडा कोणाला विचारावा बरें ? (पुन्हा पाहून ह्मणतो. ) अरे, जो रावणाचा मातामह व प्रधान माल्यवान त्याचा चाकर हा दिसतो आहे, तर ह्यालाच विचारावें. ( मग मोठ्यानें ह्मणतो. ) अरे करालका, इकडे ये, इकडे ये. ( करालक पडद्याच्या बाहेर येऊन ह्मणतो. ) हे ऋषे, मी तुला नमस्कार करतों.

ऋ०— तुझें कल्याण असो. बरें, करालका, बिभीषणाचा वाडा कोठें आहे? त्याची मला खूण सांग.

क०— कशाला ?

ऋ०— त्या बिभीषणाला कांहीं निरोप सांगण्यासाठीं माझ्या गुरूनें मला पाठविलें आहे .

क०— तुझ्या गुरूचें नांव काय ?

ऋ०— पुलस्त्य ऋषि.

क०— मुळीं बिभीषणच एथें कोठें आहे ?

ऋ०— अरे, हें काय बोलतोस ! एथें नाहीं, तर बिभीषण कोठें गेला ?

क०— एकदां बिभीषण हातांत पत्र घेऊन रावणाला नमस्कार करीत होता; इतक्यांत तें पत्र रावणानें घेऊन वाचून पाहिलें तों त्यांत अभिप्राय असा होता, कीं.

### आर्या

परिणामीं सुख व्हावें ही इच्छा ज्यांस ते चतुर्थीच्या ॥
चंद्रकलेपरि सज्जन विलोकिती नच मुखा परस्त्रीच्या ॥१॥

ऋ०— राजाजवळ विनंति करण्याविषयीं बिभीषणाचें काय चातुर्य हो! बरें, पुढें काय झालें?

क०— मग रावण हंसून असें बोलला, कीं हें कोणा तरी भित्र्याचें भाषण आहे, प्रसिद्धच आहे, कीं

### श्लोक

परस्त्रियांच्या ऱ्हदयीं ॥ शत्रूंच्या गजमस्तकीं ॥
पडतात न भीरूंच्या ॥ दृष्टिशा शरवृष्टिही ॥ २ ॥

मग बिभीषणाला वाईट वाटून थोडा रागही आला, आणि तो रावणाला असें ह्मणाला कीं.

### श्लोक.

मोठी कीर्ति [1]सुरापगा पसरली लोकत्रयीं निर्मला
रामस्त्रीअभिलाष कां दशमुखा चित्तीं तुझ्या मातला ॥
जें विस्तीर्ण पुलस्त्यवंशयश हें लोकत्रयीं चंद्रसें
तूं झालास कलंकसा शिव शिव त्याला असें हें दिसे ॥३॥

ऋ०— ( आश्चर्य युक्त होऊन ह्मणतो. ) बरें, पुढें काय झालें?

क०— नंतर.

### आर्या

क्रोधें रक्तविलोचन रावण उचलून तीव्र खड्ग करीं ॥
जो नीतिज्ञ बिभीषण त्याच्या ऱ्हदयीं पदप्रहार करी. ॥४॥

ऋ०— शिव, शिव, खचीत.

---

१ ( सुरापगा ) गंगा.

## आर्या

क्रोधें दशाननानें नीतिज्ञ बिभीषणास मात्र नहा ॥
लताप्रहार केला तर निज विभवास ही असें च पहा ॥५॥

ऋ०— बरें, पुढें काय झालें ?

क०— मग कांहीं राक्षस बरोबर घेऊन रावणाचा परित्याग करून बिभीषण रामचंद्राला शरण गेला.

ऋ०— ( मनांत ह्मणतो. ) एकूण पुलस्त्य ऋषीच्या उपदेशाचें रहस्य होतें, तें बिभीषणानें पूर्वींच जाणलें. ( मग उघड विचारतो. ) बरें, आतां तूं काय करणार आहेस ?

क०— मला रावणाच्या माल्यवान् प्रधानानें अशी आज्ञा केली आहे, कीं सीता वश होत नाहीं त्यामुळें रावण विव्हळ झाला आहे; तर त्याच्या मनाला चैन पडण्यासाठीं एका चितार्‍यानें एक चित्रांचा पट तयार केला आहे, तो रावणाला नेऊन दाखीव, तर मी तो पट त्यास नेऊन दाखविणार आहें.

ऋ०— ( विचार करून ह्मणतो. ) रावणाचा शत्रु तर लंकेच्या जवळ येऊन पोंचला, आणि माल्यवान् प्रधान तर हा उपचार करण्याला पाहतो, तर ही गोष्ट प्रस्तुत कार्याला उपयोगींच असेल ! ( पद्यांत )

## श्लोक

चंद्राचीच करा सहाण वर हा घांसा अरे चंदन
चंद्राच्याच करा करा जलद रे बांधून चौरी घन ॥
पाण्याचे कण शोभती कमलिनीपत्रस्थ त्यांचा करा
पद्माच्या बिस तंतुनीं ग्रथितही रे हार मोठी त्वरा ॥६॥

ऋ०— ( उपहास पूर्वक मनांत ह्मणतो. ) ह्या प्रसंगीं रावणाचा हा शीतोपचार तयार होत आहे; परंतु ह्यांत सीतेचें कार्य चांगलें होईल. ( मग उघड ह्मणतो. ) सीता वश न

झाल्यामुळें रावणाच्या अंगाची आग झाली आहे ती शांत करण्यासाठीं राक्षसांला थंड पदार्थांची सिद्धता करण्याची ही आज्ञा होत आहे काय?

क०— केवळ राक्षसांलाच नाहीं; तर देवांला ही झाली आहे. सांप्रत काळीं तर

## आर्या

चंदनलेपन करितो निजकिरणांनींच चंद्र भयचकित ॥
[1]तालव्यजनकरानें वारा घाली वसंतऋतुवात ॥ ७ ॥
नलिनीदलशय्येतें रचितो तो वरुण जो सदां सनय ॥
यापरि सुर सारे ही लंकेशातेंच सेविती सभय ॥ ८ ॥

ऋ०— ( मनांत ह्मणतो. ) हा राक्षस उगीच गप्पा मारतो आहे.

क०— ( पडद्याकडे पाहून ह्मणतो. ) हे ऋषे, हा प्रहस्त प्रधान राजवाड्यांत जातो आहे, तर हा चित्रपट मी त्याच्याच हवालीं करतों, तूं ही आपल्या कार्याला जा. ( मग दोघेही निघून जातात. ) ( तदनंतर रावण आणि चित्रांचा पट हातांत घेऊन प्रहस्त हे दोघे पडद्याच्या बाहेर येतात. )

रा०— ( मनांत ह्मणतो. )

## श्लोक

ती [2]बाणयष्टि मम कीं मकरध्वजाची
झाली प्रविष्ट ह्र्दयीं तनु जानकीची ॥
अत्यंत सुंदर जिचें मुख ती न राजी
होते मला गति कशी घडणार माझी ॥९॥

( मग विचार करून ह्मणतो. ) जशी जनस्थानीं रामाच्या जवळ होती, तशीच कृश आणि मळीण अजून ही आहे;

---

१ ताडाचा पंखा ज्यानें युक्त जो कर त्यानें २ बाणाचीकाठी

परंतु जात्याच सुंदर त्यामुळें माझे नेत्र ओढून घेते हें योग्यच आहे.

## आर्या

ष्याले चंद्रकलेची कांति दिवाकर[1]गभस्ति सर्व जरी ॥
मळकट असून नेत्रां बघतां सानंद ती न काय करी ॥१०॥

प्र०— महाराज, हें चित्र पाहा ह्मणजे मनाला आनंद होईल.

रा०— एथें हें काय लिहिलें आहे?

प्र०— एथें ह्या गर्जना करणारा समुद्र लिहिला आहे. त्यांतलेच हे मासे आणि कांसवें इत्यादिक जलचर दिसतआहेत, आणि त्याच्याच ह्या मोठ मोठ्या भयंकर लाटा उसळत आहेत.

रा०— (समुद्राकडे पाहून ह्मणतो.) बरें समुद्राच्या उत्तरतीरीं तमालवृक्षांच्या झाडीमध्यें हजारों इंद्रधनुष्यांसारखें चित्रविचित्र दिसतें, हें काय आहे?

प्र०— हें सुग्रीव संरक्षित वानरमंडल आहे.

रा०— (हंसून ह्मणतो.) अरे वालिसंरक्षित असें ह्मणावयाचें, असो मला, त्याशीं काय करावयाचें आहे. बरें हे दोघे धनुर्धारी दिसतात हे कोण?

प्र०— हे राम लक्ष्मण आहेत. ह्या दोघांपैकीं वडील भाऊ जो राम त्याच्या बाणानें वाळी मरण पावला ह्मणून सुग्रीव हल्लीं वानरांचा अधिपति झाला आहे.

रा०— (न ऐकल्या सारखें करून ह्मणतो.) बरें, फार रोड असून सुंदर आणि समुद्राच्या कांठीं निजलेला आहे तो कोण?

प्र०— हा लंकेंत येण्यासाठीं आलेला राम आहे. समुद्रह्याचा कुलगुरु ह्मणून त्याजवळ लंकेंत येण्याचा मार्ग मागावयासाठीं तो दर्भ पसरून निजला आहे.

---

१ (गभस्ति) किरण

रा०— ( हंसून ह्मणतो. ) तर आह्माला जिंकून जानकीला ह्याच रीतीनें हा नेणार काय ?

प्र०— इकडे नजर करा, जेव्हां समुद्र वाट देईना, तेव्हां रामाला राग येऊन त्यानें एक बाण सोडला, त्याबाणाच्या अग्नीनें हा समुद्र तापून त्यांतले मासे कांसवें इत्यादि जलजंतु तडफडूं लागले आहेत.

रा०— ज्यांला हे वानर मोठ्या सत्कारानें ज्येष्ठ तपस्व्याच्या जवळ आणताहेत, हे दोघे कोण ?

प्र०— हा एक तर समुद्र आहे, आणि दुसरा तर महाराजांचा ( असें अर्धें बोलल्यानंतर ह्मणतो. ) किंवा बंधूशीं वैर करणाऱ्याचें नाव कशाला पाहिजे ?

रा०— एकूण हा बिभीषण, हा आह्मांशीं वैर करून रामाचा आश्रय करितो आहे; करो.

श्लोक

राक्षसांच्याहि मुगुटीं ज्याचे चरण रत्नसे ॥
त्या माझ्या चरणाच्याही दर्शना योग्य तो नसे ॥ ११॥

प्र०— महाराज, हेंच खरें.

रा०— तें राहूंदे; पण ह्या दोन ओळी लिहिल्या आहेत, हें, काय आहे ?

प्र०— समुद्र आणि बिभीषण ह्या दोघांला लक्ष्मणानें सांगितलेला मजकूर ह्या ओळींत आहे.

रा०— त्यांतून एक वाच बरें.

प्र०— ( वाचूं लागतो. )

श्लोक

भीतीतें त्यज सागरा तुज न हा श्रीरामकोपानल
प्राशी त्यास पिण्यास देववनितानेत्रस्छ आहे जल ॥

ह्या खेळांत तुझ्या जळांत मकरी स्वछंद लंकेश्वर ॥
स्रीगंड[1]स्थल[2]पत्रभंग[3]मकरीनाशील याचा शर. ॥१२॥

रा०— दुसरी वाच.

प्र०— ( वाचतो. )

## श्लोक

तूं आलास बिभीषणा शरण हें जाणून चित्तीं पहा
लंकाराज्य तुला समर्पण करी श्रीराम आतांच हा ॥
सुग्रीवा कपिराज्यदानकरते जामीन ज्याचे कर
ह्या कृत्यास तसेच साक्षि अवघे आहों आह्मी [4]किंकर ॥१३॥

रा०— अहो ह्या धाकट्या तपस्व्याच्या बोलण्याचा कोरडा डौल किती आहे ! हें राहूंदे, पण हें समुद्रामध्यें काय दिसतें आहे ?

प्र०— हा वानरांनीं डोंगरांवरचे मोठमोठाले दगड आणून बांधलेला सेतु आहे.

रा०— अहो हा चितारी फार कुशल आहे; कारण ह्यानें हें सर्व खोटें असून खऱ्या सारखें लिहिलें आहे.

प्र०— अजून ही आपणाला हें खोटेंच वाटतें काय ?

( पडद्यांत मोठा गलबला होतो. )

रा०— हें काय आहे ?

प्र० 

## श्लोक

गर्विष्ठ उन्मत्त बलाढ्य जे असे
त्या वानरांचा रव घोर हा असे ॥
पर्जन्यकाळीं नव मेघ गर्जती
ते वानरानां उपमान शोभती ॥ १४ ॥

---

१ ( गंडस्थल ) गाल २ ( पत्रभंग ) वेल ३ ( मकरी ) मासे ४ दास

तर आतां भ्यालें पाहिजे, आणि हें अरिष्ट टळण्याचा यत्न केला पाहिजे.

रा०— अरे, ह्यांत भ्यावयाचें तें काय, आणि ह्याचें निवारण करणें तें काय ?

आर्या

मंदोदरीपदींचा नूपुरमणिशब्द जेंवि अति मधुर ॥
त्यापरि कपिकोलाहल मच्चित्ता तोषवीच हा [1]प्रचुर ॥१५॥

( इतक्यांत मंदोदरी पडद्याच्या बाहेर येऊन ह्मणते ) महाराजांचा जय असो.

रा०— अगे प्रिये, येथें बसावें. ( मंदोदरी बसून अधोमुख होते. )

आर्या

ज्यावर कुरळे केश स्मितयोगें चंद्रबिंब तुच्छ करी ॥
कमळांच्या कांतीतें निजदर्शनेंच जें सुरेख धरी ॥१६॥
ज्याचें दर्शन घ्याया देवांचा ही झटे सदां [2]सार्थ ॥
कां करतेस अधःकृत माझ्या परि सुमुखि त्या मुखा व्यर्थ॥१७॥

प्र०— महाराज, ही वानरांची गर्जना ऐकून मनाला चिंता प्राप्त झाली आहे, ह्यासाठीं बाईसाहेब अधोमुख झाल्या, असें मला वाटतें.

रा०— अरे त्यांत चिंता करण्या सारखें काय आहे ?

श्लोक

हे अंगदादि कपि सर्व जरी मिळाले
माझ्या पुढें [3]हरिपुढें मृग जेंवि आले ॥
सुग्रीव हा नृप असे कपिमंडळाचा
माझ्यापुढें वद पराक्रम काय त्याचा ॥ १८॥

१ पुष्कळ. २ समुदाय ३ सिंहापुढें.

मं०— महाराज, मला दुःख होण्याचें आणखी हीं एक कारण आहे. आज मी महाराजांचा शकूनपाहाण्यासाठीं अरण्यांत एक्या डोंगरावर राहाणाऱ्या भिल्लिणीकडे दासी पाठविली होती, तेथें भिल्लिणीच्या घराजवळ एक सिंहाचा बाळक बसला होता, त्याकडे पाहून ती भिल्लीण कांहीं बोलली; तें माझ्या दासीनें ऐकिलें.

## आर्या

[1]नागपराजयमात्रें व्हावें गर्विष्ट तूं न तिळमात्र ॥
शरभ[2]पतत्री आला जो विजयाचा सदां असें पात्र ॥१९॥

रा०— ह्यांत खेद होण्याचें कारण कांहींच दिसत नाहीं, आणि आह्मी शकुनादिक गोष्टी मुळीं खऱ्या मानीतच नाहीं.

प्र०— महाराज, एखाद्या वेळेस त्याही खऱ्या होतात.

रा०— अः त्यांत कांहीं अर्थ नाहीं. भित्रे लोक शकुनावर विश्वास ठेवितात.

( इतक्यांत पडद्यांत )

## श्लोक

ऐकून शब्द रघुनाथधनुर्गुणाचा
रोमांचयुक्त तनु हा गण राक्षसांचा ॥
खड्गेंकरून कपिकंठ चिरी अनेक
त्यांचा कपींस पडला न्हदयांत धाक ॥ २० ॥

रा०— ( आनंदानें ह्मणतो. ) एकूण युद्धांत वानरांपेक्षां राक्षसांचा पराक्रम विशेष आहे.

( पुन्हा पडद्यांत )

---

१ हत्ती २ पक्षी

### श्लोक

रामाची हि पुढें सरे कपिचमू [1]रात्रिचरांच्या दळीं
जी पाडी अवघे निशाचर बळी मारुनि या भूतळीं ॥
सूर्याची उदयप्रभा तम जशी निःशेष नाशीतसे
झालें त्यापरि एकही न समरीं सप्राण कोणी दिसे ॥२१॥

रा०– ( त्रासून ह्मणतो. ) अरे वानरांचा उत्कर्ष झाला काय? ( मग मोठ्यानें गर्जना करून ह्मणतो. ) अरे, एथें कोण आहेरे ? जा, मी सांगतों तसें कर.

### आर्या

जो कुंभकर्ण निद्रित त्यातें जागृत करून सांगावें ॥
कीं रामसमर तूं कर इंद्रजितें लक्ष्मणासह लढावें ॥२२॥

( पडद्यांत ) महाराजांची आज्ञा होण्याच्या पूर्वींच माल्यवान प्रधानानें महाराजांचा मनांतला अभिप्राय जाणून ही तजवीज केली आहे आतां तर,

### श्लोक

हा कुंभकर्ण लढतो रघुनायकाशीं
ज्याचा प्रताप जगतांत असे विकाशी ॥
जो मेघनादहि तसा [2]तव पुत्र शूर
तो लक्ष्मणासह लढे समरांत धीर ॥ २३ ॥

( पडद्यांत )

### आर्या

निजदंष्ट्रावज्रानें समरीं वानरगिरींस जो फोडी ॥
युद्धीं वानरवणवा विझवाया शरजलास जो सोडी ॥ २४ ॥
हा वीर कुंभकर्ण प्रसिद्ध तो मेघनाद दोघांचीं ॥

---

१ राक्षस २ तुझा

रा०— (खिन्न होऊन ह्मणतो.) बरें, हा पुढें काय सांगतो बरें·

दशरथ[1]तनयाग्नीच्या स्पर्शें झाली दशा पतंगाची ॥२५॥

( मंदोदरी आणि रावण मूर्च्छित होऊन पडतात. )

प्र०— महाराज, सावध व्हा सावध व्हा.

रा०— ( सावध होऊन ह्मणतो. ) प्रिये मंदोदरी सावध हो.

मं०— ( सावध होऊन ह्मणते. ) महाराज आतां मला सांभाळा; मी शोक समुद्रांत बुडालें आहें.

रा०— अगे मंदोदरी तूं भिऊं नको, ही माझी तरवारच तुझा शोक दूर करील.

(पुन्हा उठून हातांत तरवार घेऊन ह्मणतो.) पहा आतां ही माझी तरवार.

## आर्या

उन्मत्त [2]सुरगजांचे मस्तक फोडून मौक्तिकें उडवी ॥
जी ती राक्षसनेत्रां आनंदाब्धींत ही पहा बुडवी ॥ २६ ॥

(असें बोलून प्रहस्त प्रधानाला बरोबर घेऊन निघून जातो. )

मं०— वा: काय चमत्कार पहा हा, विद्याधर आणि ही त्याची स्त्री विद्याधरी हीं दोघें हा युद्धसमारंभ पाहून आश्चर्ययुक्त होऊन कांहीं विचार करीत बसलीं आहेत. आसो, मी महाराजांस जयप्राप्ति व्हावी ह्मणून आपल्या कुलदेवतेची पूजा करण्याला जातें. ( असें बोलून मंदोदरी ही निघून जाते.

वि०स्त्री०— हातावर रोमांच उभारले आहेत, असा हा वानर सैन्यांत कोण चालला आहे ?

वि०— हा युद्धासाठीं रावण चालला आहे.

---

१ (तनय) पुत्र २ (सुर) देव

वि० स्त्री– बरें, हा त्याच्या समोर काजळाच्या डोंगरासारखा काळा वानर येत आहे, हा कोण ?

वि०– हा लढाई करणारा नीळ नामक वानर आहे.
(पाहून चकित होऊन ह्मणतो.) अहो.

श्लोक

नीला[1]चलाचा शिखरप्रहार
वक्षस्थलीं नीळ करी सुघोर ॥
त्यातें प्रियस्त्रीकृतपंकजाचा
प्रहार मानी पति राक्षसांचा ॥ २७ ॥

(पुन्हा कौतुकानें ह्मणतो.) पहा पहा.

आर्या

हा नील दशमुखाच्या हस्ताब्जीं भ्रमरतुल्य शुद्ध दिसे॥
दाहीं मुगुटांवर ही फिरतां जो इंद्रनीलमणि भासे ॥२८॥

वि० स्त्री– रावणाशीं फार झटून युद्ध करतो, हा कोण बरें ?

वि०– हा रामाचा पक्षपाती बिभीषण आहे. (पुन्हा खिन्न होऊन ह्मणतो.) अरेरे !

आर्या

क्रूरें बिभीषणावर लंकेशें शक्ति सोडिली क्रूर ॥
निजकांतेपरि लक्ष्मण तिजला ह्रदयीं धरी महाशूर ॥२९॥

वि० स्त्री– शिव शिव !

श्लोक

सर्वांगावर बाण वर्षत असे हा रावणाच्या जसा
अंकीं मूर्छित लक्ष्मणावर पहा नेत्रांबु वर्षे तसा ॥
दृष्टीतें सुखशोकचंचल अशा त्या वानरांच्या करी
सीताकांत समर्थ वीर करुणा दोन्ही रसां आदरी॥३०॥

---

१ (अचल) पर्वत

वि०स्त्री— अरेरे! मग काय झालें?

वि०— (पाहून ह्मणतो.) रामाचे बाण सोसवेनात ह्मणून रावण तर पळूनच गेला.

(पडद्यांत)

श्लोक

बा लक्ष्मणा उघड लोचनपंकजें रे
पावो न एक समयींच विनाश सारें ॥
हें सूर्यवंशनृपभाग्य व राघवाचें
जीवित्व आणि नयनांजन ऊर्मिलेचें ॥ ३१ ॥

वि०— अरेरे आपल्या धाकट्या भावाकरितां हा रामाचा विलाप आहे.

(पडद्यांत) महाराज, सावध व्हा, सावध व्हा.

वि०— सुग्रीव रामाला बोध करून सावध करतो आहे, तर आतां त्याला राम काय ह्मणतो तें ऐकूं.

(पडद्यांत) मित्रा सुग्रीवा, बोध करून माझी समजूत करतोस काय! मी आतां सावध कसा होईन बरें?

श्लोक

अहो राघवानों अशी [1]पौरवाणी
सुधेसारखी ऐकिली जी स्वकर्णीं ॥
अरे राघवा ही विषाशीं समान
कसा राम ऐकेल सौमित्रिहीन ॥ ३२ ॥

आणखी सांगतों, ऐक.

आर्या

वंदीन सुमित्रेच्या चरणा मीं एकटा असा जेव्हां ॥
लक्ष्मण दृष्टि नपडतां तन्मातेची दशा कशी तेव्हां ॥ ३३ ॥

---

१ लोकांचीवाणी

शिवशिव कठिणमनाचा जगला यास्तवच अल्पकाळ जरी॥
वत्सा शिवाय रे हा राम कसा निजपुरीं प्रवेश करी ॥३४॥

वि०– अरेरे, ही तर केवळ करुणासमुद्रालाच भर्ती आली आहे. ( विचार करून ह्मणतो. ) बरें, ह्याचा परिहार कशानें होईल ?

( पुन्हा ह्मणतो. ) परिहाराची गोष्ट बोलावयालाच नको कांकीं प्रारब्धच उलटें झालें आहे.

वि०स्त्री– अगदींच उलटें झालें आहे असें ह्मणा, कां ह्मणाल तर पहा इकडे हा एक वानर रावणाकडे फितून हातांत मोठा दगड घेऊन रामाच्या समोर चालला आहे.

वि०– ( कानावर हात ठेवून ह्मणतो. ) शिवशिव अगे असें भलतेंच बोलूंनको, हा तर

### श्लोक

महौषधींचा आधार गंधमादन भूधर ॥
घेऊन लक्ष्मणप्राणत्राणा मारुति येतसे ॥ ३५ ॥

( पुन्हा पाहून आनंदानें ह्मणतो. )

### आर्या

दिव्यौषधिगंधानें लक्ष्मण उघडून नेत्रकमलांतें ॥
चढवून धनु पुन्हा ही पूर्णमनोरथ करीच रामातें ॥३६॥

वि०स्त्री– रामा बरोबर लढण्याच्या हेतूनें पुनः रावण येत आहे.

वि०– प्रिये, तर मग आतां लक्ष देऊन पाहा, कांकीं, हे दोघेही वीर बरोबरीचे लढणारे आहेत.

वि०स्त्री– रामचंद्र तर त्रैलोक्यांत अद्वितीय वीर असा गाजतो आहे, आणि रावणाचा तर पराभव पुष्कळांनीं केला आहे; तेव्हां त्यांची बरोबरी कशी होईल ?

वि०– प्रिये, तूं रावणाला ओळखत नाहींस काय ?

श्लोक

स्वर्गस्त्रियांच्या ऱ्हदया वरील
नें कुंकुमाचें घन बिंदुजाल॥
तें रावणाच्या व्यतिरिक्त कोण
पुशी जरी खड्ग रणप्रवीण॥३७॥

श्लोक

ज्याचें हास्य [1]सुरेभगंडविगलन्मुक्ताफळें भासती ॥
वातें वृक्ष जसे तसेच सुर ते ज्या पाहतां कांपती ॥
संग्रामांत सु[2]रेशकीर्ति बुडवी तो खड्ग ज्याच्या करीं
तो हा रावण रामचंद्रस[3]मरीं वांछा स्वचित्तींधरी ॥३८॥

( आणखी हीं )

आर्या

राक्षससेनारक्षकरावणवक्षस्छलीं सुरेश करी ॥
वज्रप्रहार पण तो मानी पुष्पप्रहार सुरवैरी ॥३९॥
आकाश[4]सरीं शोभे ज्याच्या करपंकजोर्ध्वकैलास ॥
शशिशेखरसहित तसा कमळवनावर दिसे जसा हंस ॥४०॥

( पडद्यांत )

श्लोक

लीलेनें हरपर्वता उपटिती लोकत्रया गांजिती
लंकादुःखनिवारिती सुरवधू बंदींत जे घालिती ॥
सीतेच्या ऱ्हदयस्थकुंकुमरसा जे आपणा वांछिती
ते हे रावणहस्त सर्व विजयी रात्रंदिवा खेळती ॥४१॥

( पुन्हा पडद्यांत )

---

१ देवांच्याहत्तींच्या गंडस्थलापासून गळणारी मोतें २ (सुरेश) इंद्र ३ (समर) युद्ध ४ आकाशरूपसरावरांत

### श्लोक

लीलेनें हरचाप जे उचलिती त्रैलोक्य आनंदिती
लंकासौख्यविदारिती सुरवधूबंदीस जे तोडिती ।।
सीतेच्या ऱ्हदयस्थकुंकुमरसें आनंद जे पावती
ते हे राघवहस्त सर्व विजयी रात्रंदिवा खेळती ।।४२।।

वि०— हे खचीत राक्षस आणि वानर आपल्या यजमानांचेंच वर्णन करीत आहेत.

वि०स्त्री— रावण तर रथामध्यें बसला आहे, आणि रामचंद्र भूमीवर उभा आहे तर हें युद्ध कसें जमेल ?

वि०— प्रियें, पहा पहा, हा [1]मातलीनें इंद्राचा रथ आणला. राम ही त्यांत बसतो आहे.

(पडद्यांत) अरे कसा तूं

### आर्या

खर मारीच तसा तो वाळी हे ज्या पथास अनुसरले ॥
त्याच पथा अनुसरसी दुष्टा तूं आयु कीं तुझें सरलें ।।४३।।

वि०— हें रामाचें मर्मभेदक भाषण ऐकून रावण काय बोलतो तें आपण ऐकूं.

(पुन्हा पडद्यांत)

### आर्या

खर सामान्यच राक्षस वाळी वानर कुरंग मारीच ।।
मारून त्यां प्रयत्नें ऱ्हदयीं संतोषलास भारीच ॥४४॥
दशमुखनामक आला हा पाहा सुरगजारि [2]पंचमुख ।।
लीलेनें च तुझाही प्राण हरायास रुष्ट तीक्ष्णनख ॥४५॥

किंवा

---

१ इंद्राचा सारथी. २ (पंचमुख) सिंह

श्लोक

कालीवाहनसिंहकेश[1]निवहें जो दिव्य चौरी करी
तद्वातें श्रमजन्यघर्मकण[2] जे देहस्थ त्यांतें हरी ॥
तो हा रावण सर्व लोकविजयी युद्धार्थ आला असे
त्याचें सिंहसमान शौर्य ह्मणणें हें कीर्त्तिदातें नसे ॥४६॥

वि०— अगे रावणाच्या बोलण्यानें लक्ष्मण रागावून कांहीं बोलणार आहे असें वाटतें.

( पडद्यांत ) तूं पंचमुख अस कीं दशमुख अस; त्याचीं कांहीं आह्माला गरज नाहीं, पण आतां मात्र सांगतों तें ऐक.

श्लोक

हे राक्षसा टाक मदास आणी
बिभीषणाच्या परि जोड पाणी ॥
नमून रामांघ्रिसरोजभृंग
हो हाच आतां सुखद प्रसंग ॥ ४७ ॥

( अथवा )

आर्या

आकर्णकृष्ट चापा पासून शराग्नि राघवें मुक्त ॥
त्यावर पतंगसा पड ह्मणजे होशील पापनिर्मुक्त ॥४८॥

वि०— पहा, पहा, ह्या रावणरूप संध्याकालानें बाणरूप अंधकार पसरला.

वि०— अगे, इकडे पहा, रामचंद्रानें बाणरूप किरण पसरून तो अंधकार नाहींसा केला.

( पुन्हा कौतुकानें ह्मणतो, ) पहा रावणानें मोठें अस्त्र टाकलें; परंतु तें अस्त्र आपल्या दिव्यास्त्रानें उ-

१ ( निवह ) समुदाय २ श्रमानें आलेले घामाचेबिंदु

डवून तसेंच त्याचें धनुष्य ही मोडून हा राम त्याला
कांहीं बोलणार असें वाटतें.

( पड्यांत )

### श्लोक

झाला धनुर्भंग ह्मणून भीती
धरूं नको तूं तिलमात्र चित्तीं ॥
द्वितीय शस्त्रास धरून हातीं
युद्धास ये ही रणशूररीती ॥ ४९ ॥

वि०– आतां **रावण** काय उत्तर देतो, तें ऐकावें.

( पड्यांत )

### आर्या

रावणभुजचंदनवनवासी हा खड्गकृष्णसर्प न कीं ॥
तूं ऐकिलास शत्रुप्राण पितो जो सदां तिन्हीं लोकीं ॥५०॥

वि०– अरे, **रावणाचा** खड्ग तर **रामचंद्रानें** बाण मारून सहज च तोडून टाकला, आणि आतां काय बोलेल, तें बोलो.

( पड्यांत ) अरे, हा **रावण** तर आतां खिन्न झालेला दिसतो.

वि०– आतां **रावण** काय उत्तर देतो, तें ऐकूं.

( पड्यांत ) आजच मी खिन्न झालों काय ?

ऐकरे ऐक.

### श्लोक

हे दाही हि दिशांस मत्कर पहा दाहा च विध्वंसिती
बाकीचे दशहस्त भार च मला चित्तीं असे भासती ॥
तो आराध्य च शंभु सागरजलीं निद्रा करी विष्णु तो
आतां काय करूं अहर्निश अशा चित्तें मुळें खिन्न तो ॥५१॥

वि०स्त्री– आतां बोलणें मात्र शिलक राहिलें आहे.

वि०– असें कां ह्मणतेस ? अजून देखील.

श्लोक

धनुष्य खड्गादिक शस्त्रभार
तो भंगता क्रुद्ध दशास्य फार ॥
स्वमस्तकें राघवबाण[1]जालें
जीं छेदिलीं त्यांसह खेळ खेळे ॥५२॥

श्लोक

ांनीं एकांनीं गगनगत झेली निज शिरें
ांनीं अन्यांनीं त्वरित उडवी ऊर्ध्व इतरें ॥
ा या योगानें सफळ करितो विंश[2]ति करां
ी लंकेशाची समर करण्याची बघ तऱ्हा ॥५३॥
ुन्हा आश्चर्य वाटून ह्मणतो. )

आर्या

ाशरांनीं रावण मस्तक तुटती पुन्हा नवे येती ॥
ाहून पुरंद[3]रह्रदयीं आनंद खेद सह उठती ॥५४॥
रुत्पत्तिशिरांची पाहून मनांत राम संतोषे ॥
तोडाया सत्वर बाणांची वृष्टि करितसे रोषें ॥५५॥
वणाचीं मस्तकें पुष्कळ वेळां तुटलीं, तरी पुन्हा न-
ीं उत्पन्न होतात; त्यापक्षीं त्यानें बंदींत घातलेल्या
ा सुटून त्यांचें मुख नजरेस पडणें कठीण आहे.

वि०— अगे, तूं खेद करूंनको, अद्यापि रामचंद्र रावणा बरोबर रागानें कोठें लढतो आहे. हा उगीच खेळतखेळत लढण्याचा प्रकार चालला आहे. ( पुन्हा विचार करून चमत्कार वाटून ह्मणतो. ) पहा, पहा,

श्लोक

केलीं छिन्न जरी दशाननशिरें हीं राघवाच्या शरीं
तीं येतात पुन्हा नवीं अमृत कीं याच्या वसे अंतरीं ॥

---

१ ( जाल ) समुदाय २ वीस ३ ( पुरंदर ) इंद्र

हा माझा निजभक्त यास्तव शिवें जी मस्तकस्छा कळा
चंद्राची खरडून एक तुकडा कीं रावणाला दिला ॥५६॥

(पुन्हा आश्चर्य वाटून हंसून ह्मणतो.) ह्या रावणाची मनोवृत्ति किती चमत्कारिक आहे!

### आर्या

छेदी मस्तक राघव जों जों भेदी न रावणोरातें ॥
तों तों ह्रदयीं याच्या सीतासंभोगवासना शिरते ॥५७॥

(पडद्यांत)

### आर्या

कां खेळतोस रामा मर्मी शर एक मार जीव हर ॥
पूर्णमनोरथ आह्मां कर कीर्तीनें जगत्त्रयास भर ॥५८॥

वि०— रावणाला मारण्याविषयीं रामाला देव त्वरा करीत आहेत. तें ऐकून आतां रावण काय बोलेल तें ऐकूं. (पडद्यांत) अरे, माझ्या भुजानों, मीं सांगतों तसें करा.

### श्लोक

टाकून शंकरशिरस्थ कळा शशीची
रत्नें हरा सकलदिक्पतिमस्तकींचीं ॥
तीं हीं करो जनकजा कटिभूषणातें
गावो [1]तदीय [2]सुरवें मम विक्रमातें ॥५९॥

वि०— (हंसून ह्मणतो.) अरे लंकेश्वरा, आतां आपल्या भुजांलाच त्यापक्षीं आज्ञा केली, त्यापक्षीं तूं मोठा समयचतुर आहेस; कांकीं, आतां भुजांशिवाय दुसरा परिवार राहिलाच नाहीं. (पाहून ह्मणतो.) अरे, हा रामचंद्र रावणाच्या बोलण्यानें किंचित् रागावल्यासारखा दिसतो. (पुन्हा ह्मणतो.) शिव शिव! काळाची गति किती दुर्धर आहे हो!

---

१ त्याच्या २ चांगल्याशब्दानें

आर्या

विस्तीर्ण पुष्पशयनीं निजला जो चंद्रकांतप[1]र्यंकीं ॥
तो हा दशमुख रामक्रोधें लोळे धुळींत भूम्यंकीं ॥ ६०॥

वि०स्त्री— ( संतोषानें ह्मणते. ) तर मग आतां लौकरच रामचं-द्राची आणि सीतेची भेट होईल.

वि०— ह्यांत काय संशय. ( पाहून ह्मणतो. ) अगे ही पहा.

आर्या

दीप्तहुताशनकुंडीं शिरोन बाहेर जानकी आली ॥
तेजस्वी अधिक दिसे प्रात:काळीं जशी [2]रविकराली ॥६१॥

वि०स्त्री— पहा, पहा, हा रामचंद्र युद्धभूमी सोडून दुसरीकडे जात आहे.

वि०— तर चल, ही आनंदाची गोष्ट इंद्राणीला सांगूं. ( तीं निघून जातात. ) नंतर राम सीता लक्ष्मण सुग्रीव आणि बिभीषण हे पांच पडद्याच्या बाहेर येतात.

रा०— हा सूर्य अस्ताचलावर गेला.

ल०— पश्चिम समुद्राच्या तीरीं ही गेला, आणि चहूंकडे का-ळोख पडला, तो पाहून मला असें वाटतें, कीं.

आर्या

सागरजळांत पडतां अंबरगत रत्न[3]दिकास्त्रिया रडती ॥
त्यांच्या नेत्राश्रूंच्या धारा कज्जलविमिश्र कीं पडती ॥६२॥

अथवा

आर्या

कस्तूरीरसरंगें सारावेलें काय नभ दिशास्त्रीनीं ॥
कीं येता च अम्हावर व्हावा संतुष्ट चंद्रकांत मनीं ॥६३॥

---

१ (पर्यंक) पलंग २ सूर्यकिरणपंक्ति ३ दिशाह्याच कोणीस्त्रिया

किंवा आर्या

पश्चिमदिशा हरी तें आकाशसरोवर[1]स्थरविकमल ॥
आधारशून्य पसरे तत्रस्थच काय हें भ्रमरजाल ॥६४॥

रा०— सूर्यास्त होण्या बरोबर अंधकारानें विश्वव्यापून टाकण्यास आरंभ केला.

बि०— पूर्वेकडे चंद्राच्या किरणांनीं तो अंधकार पिण्याचा आरंभ केला आहे.

आर्या

हे क्षीरसागराच्या लहरीपरि गौर चंद्रकर दिसती ॥
यांच्या स्पर्शें कुमुदें चकोरपक्षी हि हे पहा हंसती ॥६५॥

बि०— आर्या

रडवी वियो[2]गिनीतें कढवी चित्तांत चक्रवाकांतें ॥
तो हा सुधांशु जो निजकिरणांनीं शांतवी त्रिलोकातें ॥६६॥

(रामचंद्राकडे पाहून सीतेला ह्मणतो.)

श्लोक.

सीते तुझा वदनचंद्र असे सुरेख
पाहून त्यास त्दृदयस्थ निवेच शोक ॥
आकाशचंद्र मृगलाच्छन साम्यतेला
याच्या कसा सुवदने वद सोड भीला ॥६७॥

(सीता लाजल्यासारखें करते, आणि पाहून आनंदानें ह्मणते.) अरे, हा मान्स्वतीचा मान खंडण करणारा चंद्र उदय पावला काय !

सु०— रामचंद्रा, हें चंद्राचें चांदणें कांहीं आपल्या कीर्तीपेक्षां अधिक नाहीं, आपल्या कीर्तीनें तर [3]समुद्रवलयांकित पृथिवी शुभ्र करून टाकिली आहे.

---

१ आकाश हेंच कोणी सरोवर त्यामध्यें असणारें सूर्य हेंच कोणी कमळ २ जिला पतीचावियोग झालाआहे त्यास्त्रीला. ३ समुद्रानेंवेष्टित

रा०— हें असें तुच्छ भाषण काय बोलावें !

बि०— महाराज, सुग्रीव बोलला, कीं पृथिवी शुभ्र करून टाकिली, तर हें भाषण तुच्छच खरें कांकीं, आपल्या कीर्तीनें त्रैलोक्य शुभ्र करून टाकिलें आहे.

रा०— अरे लंकेश्वरा, तुझीही वाळीसारखीच दशा झाली.

ल०— ( सीतेला ह्मणतो. )

### श्लोक

लंघून चालला चंद्र
आकाशास दिसे तसा ॥
लंघी सुग्रीवसचिव
हनूमान् सागरा जसा ॥ ६८ ॥

सी०— अरे लक्ष्मणा, तो हनूमान आतां कोठें गेला?

ल०— मातोश्री, आह्मी लौकरच तुझ्या भेटीला येतों हें भरताला कळविण्यासाठीं रामचंद्रांनीं त्याला अयोध्येस पाठविलें आहे.

सी०— तर मग आपणाला अयोध्येस जाण्याला अजून किती अवकाश आहे? (रामचंद्र बिभीषणाच्या मुखाकडे पाहतो.) ( बिभीषण जाऊन आल्यासारखें करून ह्मणतो. ) महाराज हें पुष्पक विमान तयार आहे; आतां ह्यांत बसावें. ( मग सगळे त्या पुष्पक विमानांत बसतात. ) ( रामचंद्र पाहून कौतुकानें ह्मणतो. ) अरे त्रैलाक्यांतला अद्वितीय वीर जो रावण त्यानें, जें कुबेरापासून आणलें तेंच हें पुष्पक विमान काय?

ल०— ( रागाऊन ह्मणतो. ) त्याला वाळीनें आणि सहस्रार्जुनानें युद्धांत जिंकिलें असून त्रैलोक्यांतला अद्वितीय वीर असें कसें ह्मणतां?

ग०– ( हंसून ह्मणतो. ) वत्सा, बोललों हें खरेंच बोललों.

ल०– मला हें खरें कसें वाटेल? माझ्या ऐकण्यांत असें आहे, कीं

### श्लोक

खाकेंत घालून दशाननाला
सुस्नात चारी जलधींत झाला ॥
दाबी गळे वानरराज जेव्हां
तो ओरडे रावण फार तेव्हां ॥६९॥

### श्लोक

सहस्रबाहू नृप कार्तवीर्य
त्याच्या पुढें काय दशास्यशौर्य ॥
बंदींत घालून दशाननातें
ठेवी असें हें यश विश्व गातें ॥७०॥

रा०– तूं ह्मणतोस त्याप्रमाणें वाळी आणि सहस्रार्जुन राजा ह्या उभयतांनीं रावणाचा पराभव केला; परंतु रावणाचें सामर्थ्य मोठें कसें तें ऐक.

### आर्या

उचली कैलासातें जिंकी समरांगणीं कुबेरातें ॥
हें कृत्यरावणाच्या वांचून नसाध्य अन्य शूरातें ॥७१॥

ल०– हे आर्य,

### श्लोक

हा वेग मोठा बघ पुष्पकाचा
तसा जसा वेग असे मनाचा ॥

आलों जरी दूर बसून यांत
वाटे न कांहीं श्रम मानसांत ॥ ७२ ॥

रा०— ( पाहून ह्मणतो. ) वत्सा, तूं ह्मणतोस असेंच खरें.

श्लोक

उल्लंघून समुद्र दंडकवना टाकून ती नर्मदा
उल्लंघून नदी तशी च यमुना ज्या वारिपूर्णा सदा ॥
जेथें सुंदर मोर नृत्य करिती गाती तसें सुस्वर
आलों आपण सर्व एक निमिषें त्या चित्रकूटावर ॥७३॥

सी०— ( पाठीमागें पाहून ह्मणते. ) हे देवि यमुने, तूं माझ्यावर प्रसाद खरोखरी केला, ह्मणूनच आज पुन्हा कुटुंबाचीं माणसें नजरेस पडण्याचा दिवस आला.

रा०— अरे लक्ष्मणा, जेथें श्वापदें निर्वैर राहतात तो हा भरद्वाज ऋषीचा आश्रम; पहा.

ल०— हें सत्य आहे, एथें तर.

आर्या

आकर्षिती करांनीं करिशावक सिंहकेसरां एक ॥
स्तनपानातें करिती सिंहीच्या इतर कायहें कुतुक ॥ ७४॥

आर्या

होते कंडू शांत व्याघ्रनखांनीं च ही तर मृगांची ॥
मोराच्या चंचुपुटीं सर्पहि त्यजितात कांत अंगाची ॥७५॥

रा०— अरे प्रातःकाल झाला. आतां चक्रवाकांचें वियोग दुःख नाहींसें होईल, पहा

श्लोक

गेले पश्चिमसागरीं च अवघे शी[1]तद्युतीचे कर
ते हे केतकधूलिधू[2]सररु[3]ची झाले जराजर्जर ॥

---

१ चंद्र २ ( धुसर ) मलकट ३ ( रुची ) कांति

सूर्याचे कर पंकजें विकसिती प्राचीस आलिंगिती
आणि ध्वांत[1] पिती जगीं पसरती सर्वांस आनंदिती ॥ ७६ ॥

ल०— आर्या

होतो उदय रवीचा झाला संयोग चक्रवाकांचा ॥
कमलवनावर होतो भ्रमरांचा शब्द आणि हंसांचा ॥ ७७ ॥

बि— श्लोक

सूर्याच्या उदयें गेलें तम देशांतराप्रती ॥
अनेक कार्यें घडतो वर्णाया न पुरे मती ॥७८॥

रा०— प्रिये जानकी, हा सूर्योदय झाला तरी तुझ्या मुखचंद्राचें तेज कमी झालें नाहीं.

सी०— हा कमलिनीनाथाचा उदय झाला काय ?

रा०— अगे जानकी, पहा.

आर्या

फिरती जिच्या तरंगावर हंसांचीं कुळें सरव विमळ ॥
ती ही प्रख्यात नदी आली भागीरथी पहा जवळ ॥७९॥

सी०— (पाहून आनंद पावते.)

रा०— (आनंदानें ह्मणतो.) वत्सा लक्ष्मणा ही सरयू नदी आणि ही अयोध्या पहा.

ल०— (आनंदानें ह्मणतो.) हे वसिष्ठ गुरुजी भरताला बरोबर घेऊन आपणाला अभिषेक करण्यासाठीं येऊन वाट पाहात बसले आहेत, तर आपण आतां पुष्पक विमानांतून खालीं उतरावें.

रा०— वत्सा अमळ थांब मी सूर्याला नमस्कार करतों. (हात जोडून ह्मणतो.)

---

१ अंधकार.

आर्या

पूर्वदिशामुखतिलका उदयाचलशेखरस्थरत्नातें॥
सकलजनाच्या नेत्रा नमितों मीं भास्कराख्य देवातें ॥ ८०॥

( पडद्यांत ) वत्सा रामचंद्रा

रा०– अहो कायहो हें आश्चर्य !

श्लोक

मंडळांतून ही आली सूर्याच्या भारती कशी ॥
विकसी आमच्या चित्ता कमळातें प्रभा जशी ॥ ८१ ॥

( पडद्यांत )

आर्या

विश्वांत कीर्ति पसरो वांच हजारों समा सुखें भोग ॥
सतत तुझ्या कीर्त्तिसुधापानें सानंद हें असो त्रिजग ॥८२॥

रा०– हे सूर्य नारायणा, हा माझ्यावर मोठा अनुग्रह केला.
( पडद्यांत ) आणखी काय पाहिजे तें माग.

सु०– बाबा, दिनकरा रामचंद्राचे सर्व मनोरथ पूर्ण झाले.

श्लोक

यानें सद्गुण पाळिले दशरथाज्ञा पाळिली राज्य ही
सुग्रीवास बिभीषणास हि दिलें केली जगीं कीर्ति ही ॥
केला रावण कीर्तिशेष समरीं बंधू सखे पाहिले
कांहीं ही रघुनायकास न पहा कर्तव्य हे राहिलें ॥८३॥

तथापि ही मात्र आशा आहे,

श्लोक

सर्वांच्या वदनांबुजीं भगवती वाक्‌देवता ही वसो
गोविंदीं शशिशेखरीं सुखकरीं अद्वैतबुद्धी असो ॥
लक्ष्मी आणि सरस्वती भगवती सर्वत्र नांदो सदां
आधि व्याधि नसो परस्पर असो सत्प्रेम ही सर्वदां ॥८४॥

रा०— तर मग चला, पुष्पक विमानांतून उतरून गुरूला बंधूला आणि नगरच्या लोकांला भेटूं.

( मग सर्वही विमानांतून उतरून निघून जातात. )

( सातवा अंक समाप्त. )

---

प्रसन्नराघनाटक समाप्त.

## आर्या

आहे प्रसन्नराघवनामक गीर्वाणनाटक सदर्थ ॥
त्याचा केला सुलभ प्राकृत भाषेंकरून गूढार्थ ॥१॥
पाळंदे हें ज्याचें उपनाम तसेंच नाम शिवराम ॥
त्या विप्रें रचिलें हें प्राकृत भाषें करून अभिराम ॥२॥
सत्रार्शे एकोनाशीति शकीं ग्रंथ पूर्ण हा झाला ॥
ईश्वर कृपें घडावी विद्वज्जन रसिकमान्यता त्याला ॥३॥
शोधून दोनवेळा अशुद्ध काढून टाकलें सकळ ॥
कठिण स्थळें फिरविलीं कीं व्हावा सर्व यत्न हा सुफळ ॥४॥